पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, डिसेंबर २०२५-फेब्रुवारी २०२६, खंड २४, अंक ९-११, पृष्ठे १२०

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ■ अस्वस्थ - अशांत
५ ■ जड झाले चिनी (कर्जाचे) ओझे!
१२ ■ एका नव्या (युवा) शक्तीचा उदय
१८ ■ कृत्रिम बुद्धिमत्तेच्या गैरवापराला निर्बंधाचा लगाम
२४ ■ भारतीय विद्यापीठांचा चढता आलेख
३० ■ अन्ननिर्मितीतील स्वयंपूर्णता
३५ ■ दोन कोटी ससे आणि चिनी प्रयोग


**विशेष लेख**


३९ ■ २१ वे शतक : पंचविशीतून पन्नाशीकडे सरकताना...


**पुरवणी**


८५ ■ 'पालखी कोणाचीही असो, तिचा गोंडा मराठीच हवा!'
९७ ■ सातारानगरीचा साहित्यिक - सांस्कृतिक वारसा


**उजळणी**


१०२ ■ विद्यमान लोकशाहीच्या यशस्वी कामकाजाच्या पूर्वावर्ती शर्ती


**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

**वार्षिक वर्गणी २००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/मनीऑर्डर/पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. **त्याबरोबर नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : ०२०-२५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेल : ispepune@gmail.com
www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड २४ (अंक ९-११)**
**डिसेंबर २०२५ - फेब्रुवारी २०२६**
**संपादक - अभय टिळक**
**सहयोगी संपादक - पराग पोतदार**

- **अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी ?**
- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

**अर्थबोधपत्रिकेचा हेतू**

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यत: इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी अनेक माहिती संदर्भासह पुरविणे.**

***अर्थबोधपत्रिका कशी साकारते ?***

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याल अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

- या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि / किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.
- अंकातील लेख आपण नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. **यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# अस्वस्थ – अशांत

पंचविशीचा टप्पा ओलांडून पन्नाशीकडे वाटचाल करणाऱ्या २१ शतकाच्या पहिल्या पाव शतकाची सांगता अस्वस्थतेत तर, दुसऱ्या पाव शतकी वाटचालीचा प्रारंभ अशांततेमध्ये घडून यावा, हा एक मोठाच विचित्र आणि असाधारण योग म्हणावयास हवा. ३१ डिसेंबर २०२५ या दिवशी २१व्या शतकाचा पहिला पाव शतकी प्रवास पूर्ण झाला तो अमेरिका आणि चीन यांच्यादरम्यानच्या व्यापारी युद्धाचे ढग माथ्यावर मिरवतच. तर, २०२६ सालातील दुसऱ्या, म्हणजे, फेब्रुवारी महिन्याचे पान कॅलेन्डरमधून उलटले जाण्याच्या दिवशीच अमेरिका आणि इस्रायल या दोघांनी इराणविरुद्ध युद्ध छेडले. मुख्यत: चीन आणि पर्यायाने उभ्या जगाविरुद्धच अमेरिकेने पुकारलेल्या व्यापारी युद्धापायी निर्माण झालेल्या अस्वस्थतेचे रूपांतर, २०२६ हे नवीन वर्ष सुरू होताहोताच, युद्धापायी उद्‌भवलेल्या अशांततेमध्ये घडून आले. या अस्थिरतेचे सर्वांगीण परिणाम जागतिक समुदायाला आता किती काळ भोगायला लागतील त्याचा काहीच अंदाज देता येत नाही. शीतयुद्धाच्या अंताअंती निर्माण झालेली जगाची अमेरिकाकेंद्री एकध्रुवीय सत्तारचना, जागतिक क्षितिजावर चीनचा उदय दमदारपणे घडून आल्यानंतर, पुन्हा एकवार द्विकेंद्री बनली. सोव्हिएत संघराज्याच्या विघटनाद्वारे वैश्विक सत्तापटलावरील रशियाची मुद्रा निस्तेज बनून मावळली. तिथे चांदणी चमकायला लागली चीनची. आर्थिक वाढविकासाचे निर्यातप्रधान प्रारूप अतिशय शांतपणे, कोणाच्याही डोळ्यांवर येणार नाही अशा बेताने, सतत राबवत चीनने स्वत:चे आर्थिक व सामरिक सामर्थ्य समांतर पद्धतीने बुलंद बनवले आणि जगाच्या पश्चिम गोलार्धाचा सत्ताध्रुव असलेल्या अमेरिकेशी समकक्ष असे विश्वाच्या पूर्व गोलार्धातील सत्ताध्रुवाचे स्थान पटकावले. त्यापायी अस्वस्थ बनलेल्या अमेरिकी मानसिकतेचा विद्रोही हुंकार प्रथम उमटला तो डोनाल्ड ट्रम्प यांनी २०१६ साली अमेरिकी अध्यक्षपदाची वस्त्रे पहिल्यांदा परिधान केल्यानंतर. त्या नंतर अमेरिकेच्या

अध्यक्षपदी विराजमान झालेल्या ज्यो बायडेन यांची कारकिर्द अगदीच सपक ठरली. त्यामुळे, २०२५ साली पुन्हा एकवार सत्तेवर आलेल्या ट्रम्प यांचा खाक्या, बराच काळ दाबून ठेवलेली स्प्रिंग एकदम उफाळून उसळावी, तशा धर्तीचा बनला. त्या मानसिकतेचे चटके आज उभा वैश्विक समुदाय सोसतो आहे. इराणमध्ये सत्तापालट घडवून आणण्याच्या मिषाने, इस्रायलला हाताशी धरून, अमेरिकेने उघडलेल्या या युद्धाच्या आघाडीचे मूळ रुजलेले आहे ते अमेरिकेची ऊर्जासुरक्षा जपण्याच्या आद्य हेतूमध्ये. ट्रम्प यांनी व्हेनेझुएलाच्या सत्ताधीशांची उचलबांगडी केली त्यांमागील हेतूही तोच. याला कारणही आहे अखेर चीनच. गेली सुमारे तीन दशके, चीनने अतिशय धोरणीपणे परराष्ट्रीय मुत्सद्देगिरीद्वारे आफ्रिकेतील अनेक देशांमधील ऊर्जासाधनांवर नियंत्रण प्रस्थापित केलेले आहे. दुर्मीळ खनिज घटकांचे उत्खनन, उत्पादन व व्यापार या क्षेत्रातही चीनने जागतिक स्तरावर स्वत:ची जणू एकाधिकारशाहीच प्रस्थापित केलेली आहे. आजची सगळीच उत्पादनप्रक्रिया कमालीची ऊर्जासघन बनलेली आहे. त्यांमुळे, चिनी विकासाच्या गेली सुमारे चार दशके उधळलेल्या वारूवर कुरघोडी करत अमेरिकी विकासाचा रथ पुढे दामटायचा तर हमीचे ऊर्जास्त्रोत आपल्या मुठीत हवेत, हे ट्रम्प अचूक जाणून आहेत. आखातातील तेलसाठ्यांवर अमेरिकेला नियंत्रण प्रस्थापित करावयाचे आहे ते मुख्यत: त्यासाठीच. आखातातील ही अमेरिकी साठमारी १९९०च्या दशकापासून सतत चालूच आहे.

परंतु, आता मात्र त्यांपायी उभ्या जगाचीच शांतता कमालीची धोक्यात आलेली आहे. 'कोविड-१९'च्या सावटाखालून बाहेर पडून जरा कोठे सावरू बघत असलेली वैश्विक अर्थव्यवस्था अमेरिका आणि इस्त्रायल यांच्या युध्यमानतेपायी पुन्हा एकवार आर्थिक अरिष्टाच्या फेऱ्यात मोकलली जाण्याची भीती आता सघन बनते आहे. ही अस्वस्थता, अस्थिरता आणि अनिश्चितता गेले पाव शतक, या ना त्या स्वरूपात, आपला पाठलाग करतेच आहे. त्या सगळ्या अस्थिरता पर्वाचा प्रदीर्घ मागोवा घेणारा एक विशेष लेख 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकाचा विशेष ठरावा.

संविधानाचा स्वीकार करून आज पाऊण शतक उलटून चालले आहे. आजच्या व्यवहारात लोकशाहीचे केवळ शरीर नांदते आहे की, त्यात प्रजासत्ताकाचा आत्मादेखील वास करतो आहे. याची चाचपणी करण्यास उपयुक्त ठरणारा या अंकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचारठेवा सगळ्यांनाच चिंतनप्रवृत्त निश्चितच बनवेल.

# आर्थिक

## जड झाले चिनी (कर्जाचे) ओझे!

'चीन'नामक सावकाराने जगभरातील अनेक देशांना आपल्या कर्जाच्या जाळ्यात अडकवलेले आहे. देशांतर्गत विकासकामांसाठी निधीची चणचण भासणाऱ्या देशांना, त्या वेळी, चीन म्हणजे आपल्या गरजेला धावून येणारा हितचिंतकच जणू भासला. विकासनिधीच्या गोंडस नावाखाली चीनने अदा केलेले कर्ज सुरुवातीला जरी गरजवंत देशांना गोड वाटले असले तरी त्याच्या भविष्यातील दुष्परिणामांचा अंदाज त्यांना तेव्हा आलेला नव्हता. आता मात्र त्या मदतीच्या बुरख्याखालील खरा चिनी चेहरा किती भेसू बनू शकतो, याची जाणीव सर्वांनाच होऊ लागली आहे. याचे कारण, चीनने जगभरातील १५० हून अधिक देशांना कर्जाच्या माध्यमातून आर्थिक मदतीचा हात दिला असून अनेक देशांच्या अर्थव्यवस्था आज त्या कर्जापायी आर्थिक कोंडीत सापडलेल्या आहेत. आजमितीला जगभरातील ८० टक्के देश हे चीनने दिलेल्या ७८ लाख कोटी डॉलर्सच्या कर्जाखाली बुडालेले आहेत, असे वास्तव या संदर्भातील आकडेवारीतून पुढ्यात उभरते.

जगातील अव्वल महासत्ता बनण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून असलेला चीन अन्य देशांवर कुरघोडी करण्यासाठी आणि त्यांना अंकित करून ठेवण्यासाठी सर्व प्रकारे प्रयत्न करीत आला आहे. या पार्श्वभूमीवर, २१ व्या शतकातील एक मोठा सावकार देश, म्हणून चीन आता जगाच्या क्षितिजावर उदयास आलेला आहे. अनेक देशांना आपल्या कर्जाच्या पाशात अडकवून त्यांच्या अर्थव्यवस्थांची कोंडी करण्याचे काम चीन अगदी नियोजनबद्ध रीतीने रेटत असल्याचे अभ्यासकांचे प्रतिपादन आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार जगाच्या पाठीवर आज १७४ देश असे आहेत की ज्यांचे एकूण सकल देशी उत्पन्न जितके आहे त्यापेक्षा अधिक रकमेचे कर्ज चीनने या देशांना दिलेले आहे. चीनच्या माध्यमातून हा एक नवीन प्रकारचा आर्थिक वसाहतवाद प्रस्थापित बनतो आहे, असे जाणकारांचे विश्लेषण आहे. पूर्वी ज्या

युरोपीय देशांनी आशियाई आणि आफ्रिकी देशांवर वसाहतवाद लादला त्यांना त्यासाठी, प्रसंगी, संघर्ष करावा लागला. परंतु चीनप्रणीत या नव्या आर्थिक वसाहतवादाचे प्रारूप असे आहे की, चिनी कर्जाच्या विळख्यात आपण कसे अडकलो आहोत, हे अनेक देशांना आजही नेमके कळलेलेच नाही. ज्या देशांच्या हे लक्षात येते आहे अथवा आलेले आहे त्यांना आपली चूक आता कोठे उमगते आहे. युगांडा. झांबिया या सारख्या देशांच्या अर्थव्यवस्था, चीनकडून उचललेल्या कर्जांपायी आता अडचणीत येत चालल्याने, चीनकडून कर्ज घेऊन मोठी घोडचूक घडली असल्याची कबुलीच त्यांच्या अर्थमंत्र्यांनी आता जाहीरपणे दिलेली आहे.

पूर्वीपासूनच जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणे निधी या दोन वैश्विक सावकारांकडून जगभरातील देशांना कर्ज दिले जात असे. या दोन्ही वित्तीय संस्था पश्चिम युरोपीय देशांच्या, विशेषत: अमेरिकेच्या प्रभावाखाली राहत आलेल्या आहेत. गरजू देशांना कर्जे देते वेळी त्यांच्याकडून कर्जदार देशांवर अनेक अटी लादल्या जात असत. या अटी आणि शर्ती अनेकदा जाचक आणि कर्जे उचलणाऱ्या देशांच्या पचनी सहजी न पडणाऱ्या अशा असत. परंतु गरजू अर्थव्यवस्थांना कर्जरूपाने अर्थसाह्याचा हात पुढे करण्याचे पाऊल जेव्हा चीनने उचलले तेव्हा अनेक देशांसाठी निधीपुरवठ्याचा एक नवा पर्याय खुला झाला आणि आपसूकच ते देश चीनकडे आकर्षित झाले.

या सगळ्या पर्वाची सुरुवात झाली ती २०१२ सालापासून. चांगल्या दमदार व सातत्यशील आर्थिक प्रगतीचा भरीव पल्ला चीनने तोवर साधलेला होता. चीनचे राष्ट्राध्यक्ष Xi Jinping यांनी सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली आणि चीनचा प्रभाव जगभर वाढवायचा जणू चंगच त्यांनी बांधला. त्यासाठी त्यांनी २०१३ मध्ये एक योजना आखली. त्या योजनेचे नाव होते, 'बॉर्डर अँड रोड इनिशिएटिव्ह' (बीआरआय). या योजनेअंतर्गत त्यांनी चिनी वर्चस्वाचे वर्तुळ जगभरात विस्तारण्याचे एक पद्धतशीर असे वेगळे धोरण आखले. आशियाई, आफ्रिकी आणि युरोपीय देशांमध्ये चीनचा विस्तार साध्य करण्यासाठी त्यांनी पायाभूत सुविधांचा विकास करणाऱ्या चांगल्या कंपन्यांना 'बॉर्डर अँड रोड इनिशिएटिव्ह' या प्रकल्पात एकत्र आणले. त्या प्रकल्पामध्ये जगभरातील १५० देश सहभागी झाले. विविध देशांना देशांतर्गत विकासासाठी व पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी पैशांची गरज होती तिथे चीनने धोरणीपणाने आर्थिक मदतीचा हात पुढे केला. 'विकास कर्जे' या नावाने त्यांनी अशा देशांना कर्ज देऊ केले. त्या त्या देशातील बंदरांचा विकास व्हावा, विमानतळ, रेल्वे

स्थानके तिथे साकारली जावीत, महत्त्वाच्या अन्य पायाभूत सुविधांचा विकास तिथे केला जावा असा मुख्यत्वे उद्देश त्यांमागे होता. हे करत असताना सामरिक आणि व्यापारवृद्धीच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरतील असे देश चीनने प्रथमत: हेरले. त्या त्या देशांच्या विकासविषयक गरजांशी सुसंवादी असे प्रकल्प तिथे प्रवर्तित करून भरधाव प्रगती त्यांना कशा प्रकारे साधता येईल याचा एक 'रोडमॅप'च जणू चीनने त्यांना तयार करून दिला आणि त्यासाठी कमी व्याजदर असलेल्या कर्जाचे आमीष दाखवण्यात आले. अर्थातच, अनेक देशांना ही सुवर्णसंधी वाटली असल्यास त्यात नवल काहीच नव्हते. पण खरी मेख तर पुढेच होती. अशी कर्जे देत असताना चीनने काही अटी घातल्या होत्या. त्यांचे गंभीर स्वरूप तेव्हा कर्जदार देशांच्या पुरेसे ध्यानात आले नाही. कर्जरूपाने अर्थसाहाय्य देते वेळी चीनने घातलेल्या अटी धोरणीपणाने आखलेल्या होत्या. ज्या विकासकामांसाठी ज्या देशाला चिनी बँका कर्ज उपलब्ध करून देतील त्यांद्वारे त्या त्या देशात जे बांधकाम हाती घेतले जाईल त्याची कंत्राटे केवळ आणि केवळ चिनी कंपन्यांनाच दिली जातील, अशी अट करारामध्ये घातली जाई. त्यासाठी फक्त चिनी कंपन्याच तिथे काम करतील आणि संबधित प्रकल्पांचे संपूर्ण व्यवस्थापनदेखील चिनी कंपन्यांच्या हातात राहील, अशा कलमाचाही त्यांत अंतर्भाव असे.

विकासकामांसाठी चीनकडून कर्जे घेणाऱ्या देशांनी संबंधित प्रकल्पांची कंत्राटे त्यांच्या देशातील कोणत्याही देशी कंपनीला अगर चीनव्यतिरिक्त अन्य कोणत्याही विदेशी कोणत्याही कंपनीला देता कामा नये, अशीही तरतूद कर्जविषयक करारमदारांमध्ये समाविष्ट केलेली असे. त्यामुळे 'कर्जही आमचेच आणि विकास प्रकल्पांच्या बांधकामांची कंत्राटेदेखील फक्त आम्हालाच' अशी योजना चीनने आखली. दगडाखाली हात अडकला असलेले ते ते देश त्या वेळी, मग, त्या चिनी जाळ्यात प्रथम ओढले गेले आणि नंतर अडकले!

विविध देशांसमवेत अर्थसाहाय्यविषयक असे करार करीत असताना किती टक्के व्याजदराने हे कर्ज उपलब्ध करून दिले जाते आहे, ही माहिती चीनने कधीही सार्वजनिकरीत्या जाहीर केली नाही. परंतु हे कर्ज उपलब्ध करून देताना चीन घालत असे अशी आणखी एक अट अधिक धोकादायक होती. समजा, हे कर्ज कोणत्याही देशाला कोणत्याही कारणामुळे फेडता आले नाही तर त्या देशाला त्याचा एक विशिष्ट भूभाग त्या थकबाकीखातर चीनला भाडेतत्त्वावर द्यावा लागेल, ही ती अट! या खेळातील सगळ्या मुख्य सोंगट्या चीनने आपल्याच हाती ठेवलेल्या होत्या, ही

बाब या सर्व चिनी खेळ्यांवरून लक्षात येते. मोठ्या प्रमाणावर कर्ज उपलब्ध होते आहे आणि त्यातून विकास साध्य करता येईल या आशेने अनेक देशांनी कर्जे घेतली खरी; परंतु त्या मागील चीनचे कावेबाज मनसुबे कर्जदार देशांना कालांतराने उलगडू लागले आहेत. चीनकडून उचललेल्या कर्जांद्वारे अनेक देशांमध्ये प्रवर्तित करण्यात आलेल्या विकास प्रकल्पांचे काम फक्त चिनी कंपन्यांकडेच दिलेले असल्याकारणाने त्यावर त्या देशातील सरकारांचे प्रत्यक्षात तसे नियंत्रण फारच कमी असे. चिनी कंपन्यांनी हाती घेतलेले काम अनेकदा लांबत जाते आणि त्यामुळे प्रकल्पाचा एकूण खर्च भरमसाठ वाढत जातो. प्रकल्पाच्या वाढीव खर्चाचा ताळमेळ बसवता यावा म्हणून संबंधित देशांना पुन्हा एकवार चिनी बँकांच्या पुढ्यात अर्थसाह्यासाठी झोळी पसरावी लागे व लागत राही. ते चिनी बँकांच्या पथ्यावरच पडत असे. मग बँका पुन्हा वाढीव कर्जे देत राहतात. अंतिमत: जेव्हा संबधित विकास प्रकल्प पूर्ण होतो अथवा होईल, तेव्हा त्या प्रकल्पाचा खर्च इतका वाढलेला असतो की त्याच्या उभारणीसाठी कर्जाऊ घेतलेल्या रकमांची परतफेड कशी करायची असा प्रश्न संबंधित देशापुढे उभा राहतो. परिस्थिती त्या टप्प्यावर येऊन ठेपली की मग चीन हळूच आपला हुकमी एक्का बाहेर काढतो. घेतलेल्या कर्जाची रक्कम नियोजित मुदतीत परत करणे ज्या देशांना शक्य नसते त्या देशातील जो एखादा विशिष्ट भूभाग सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा ठरू शकेल – उदाहरणार्थ, एखादे बंदर – संबंधित देशाकडून भाडेतत्त्वावर घेतला जातो आणि चीन तिथे आपले नियंत्रण प्रस्थापित करतो. अनेक उदाहरणांद्वारे ही बाब उघड झाली आहे. चिनी प्रभावाची कक्षा विस्तारण्यासंदर्भातील चीनच्या महत्त्वाकांक्षेचे हे धोरण यांमुळे असे धोकादायक शाबीत होत असल्याचे मत अनेक जाणकारांनी या संदर्भात व्यक्त केलेले आहे. चीन हे सगळे ज्या पद्धतीने घडवून आणतो आहे त्याची व्यवहारातील काही उदाहरणे प्रत्यक्षात पाहिली तरी त्यातून एकूण परिस्थितीचे गांभीर्य आणि उद्या निष्पन्न होऊ शकणारे भविष्यातील धोके लक्षात येतात.

श्रीलंका हा देश या चिनी जाळ्यात अलगद अडकला तो २००१–२०१० या दशकामध्ये. बंदरे, विमानतळ आणि इतर पायाभूत सुविधांच्या विकासासाठी चीनकडून मोठ्या प्रमाणावर कर्ज घेतले श्रीलंकेने. श्रीलंकेने उचललेले एकंदर कर्ज प्रत्यक्षात होते ८.९ अब्ज डॉलर्स इतके. Hambantota या बंदराचे काम त्या निधीद्वारे प्रत्यक्षात सुरूदेखील झाले. परंतु आर्थिकदृष्ट्या गणिते पुढे जुळली नाहीत. त्यामुळे खर्चाचा डोंगर वाढतच गेला. श्रीलंकेला हे कर्ज फेडता येणे शक्य होणार नाही अशी

परिस्थिती निर्माण झाली. बँकांच्या कर्जाचे हप्तेही श्रीलंकेला भरता येईनासे झाले. मग चीनने खरा डाव टाकला आणि सामरिक नियोजनाच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाचे असणारे Hambantota हे बंदर श्रीलंकेकडून ९९ वर्षांच्या भाडेकराराने घेतले! आज त्यावर चीनचे वर्चस्व प्रस्थापित झालेले आहे. त्या कराराद्वारे श्रीलंकेचा तब्बल १५ हजार एकर भूभाग चीनच्या ताब्यात आलेला आहे. त्या बंदरात चिनी पाणबुड्या तैनात असल्याने भारताच्या सागरी सुरक्षेला एक प्रकारे धोका निर्माण झालेला आहे. चीन केवळ व्यावसायिक अथवा आर्थिक तत्त्वांना अनुसरून कर्ज देत नसून त्यामागची छुपी उद्दिष्टे वेगळीच व गंभीर आहेत, असे विश्लेषण आंतरराष्ट्रीय राजकारणाचे अभ्यासक या सगळ्यांपायी आता मांडू लागलेले आहेत.

लाओसने असाच एक महत्वाकांक्षी रेल्वेमार्ग प्रकल्प साकारण्यासाठी चीनकडून मोठे कर्ज घेतलेले होते. Boten Vientiane Railway हा रेल्वे मार्ग उभारण्यासाठी Export-Import Bank of China ने कर्ज उपलब्ध करून दिले. मात्र, या प्रकल्पाची अंमलबजावणी लांबल्यामुळे, थोड्याच कालावधीत, लाओसच्या माथ्यावरील कर्जभार इतका वाढला की त्यामुळे देशाची अर्थव्यवस्थाच धोक्याच्या सावटाखाली आली. पायाभूत सुविधा आणि अन्य विकासकामांसाठी पाकिस्तानने देखील चीनकडून ५२ अब्ज डॉलर्स इतके कर्ज घेतले. परंतु, आता त्या देशाची अर्थव्यवस्था प्रचंड अडचणीत आलेली असून त्यातून बाहेर तरी कसे पडायचे, असा पेच पाकिस्तानच्या पुढ्यात उभा ठाकलेला आहे. केनियामध्ये विमानतळ बांधण्यासाठी चीनने कर्ज उपलब्ध करून दिले. पण केनियाला ते फेडता न आल्याने आता केनियातील विमानतळदेखील चीनने आपल्या ताब्यात घेतलेले आहेत. अशीच काहीशी परिस्थिती झांबियाचीदेखील आहे. चीनने आफ्रिका खंडातील देशांवर लक्ष केंद्रित करून तेथील देशांना मोठ्या प्रमाणावर कर्ज देण्यास सुरुवात केव्हाच केलेली आहे. आफ्रिकेमध्ये चीनने त्याचे हातपाय चांगले पसरले आहेत. इथिओपिया, नायजेरिया, कंबोडिया, दक्षिण आफ्रिका अशा देशांनी विकासकामे मार्गी लावण्यासाठी चीनकडून मोठे कर्ज घेतलेले आहे. आजघडीला १० हजार चिनी कंपन्या आफ्रिका खंडात कार्यरत आहेत. आफ्रिकेतील अनेक देश चिनी कर्जाच्या ओझ्याखाली दबलेले आहेत. कर्जाची परतफेड करण्याच्या परिस्थितीत नसलेल्या अनेक देशांतील खाणी, खनिजसंपत्ती यावर आपला दावा सांगायला आता चीनने सुरुवात केलेली आहे.

बांगला देश, इजिप्त, मंगोलिया, अर्जेन्टिना यांसारख्या देशांनीही चीनकडून कर्जे उचललेली आहेत. मालदिव, पाकिस्तान आणि श्रीलंका हे देश आज पूर्णत: चिनी

कर्जात अडकलेले आहेत. श्रीलंकेवर आठ अब्ज डॉलर्स इतका चिनी कर्जाचा बोजा आहे. वसाहतवादाचे हे नवीनच 'मॉडेल' चीनने आंतरराष्ट्रीय नकाशावर प्रस्थापित करून त्याच्या माध्यमातून सर्वत्र आपले पाय पसरायला सुरुवात केलेली आहे, असे या क्षेत्रातील जाणकारांचे निरीक्षण सांगते. या कोंडीतून मार्ग शोधण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून मूळच्या कर्जांची फेररचना करण्याबाबतची मागणीवजा विनंती २२हून अधिक थकबाकीदार देशांनी चीनच्या पुढ्यात सादर केलेली आहे. तर, चिनी कर्जांच्या विळख्यातून सुटका करून घेण्यासाठी चीनचे काही थकबाकीदार देश आता जागतिक बँकेचे दरवाजे ठोठावत आहेत.

अमेरिकेतील Johns Hopkins विद्यापीठात कार्यरत असलेल्या China Africa Research Initiative चे संचालक Deborah Brautigam हे या विषयाचा अनेक वर्षे सातत्याने अभ्यास करीत आहेत. त्यांच्या मते, पारदर्शकतेचा अभाव ही या सगळ्यांतील मोठी समस्या आहे. घेतलेले कर्ज किती वर्षांत फेडायचे, कर्जफेडीसंदर्भात काही मुदतवाढ मिळू शकते का किंवा समजा, घेतलेल्या कर्जाची


## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी– 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

परतफेड करताच आली नाही तर काय दंडात्मक कारवाई होऊ शकेल, या विषयीच्या तरतुदींसंदर्भात आवश्यक ती पारदर्शकता कर्जासंदर्भातील कोणत्याच कार्यपद्धतीमध्ये नसते, ही यांतील मुख्य गोम होय. कर्जे उचलणारे देशदेखील अनेकदा हे तपशील त्यांच्या नागरिकांच्या पुढ्यात उघडपणे मांडत नाहीत. कर्ज घेणाऱ्या देशाला परतफेड करतेवेळी व्याज, मुद्दल यांसह अन्य आनुषंगिक खर्चांच्या माध्यमातून एकूण किती रक्कम चीनला अदा करावी लागेल हे अनेकदा स्पष्टच नसते.

आंतरराष्ट्रीय संबंधांचे अमेरिकेतील एक अभ्यासक Lee Jones यांच्या मते, कर्ज घेण्याचे अंतिम निर्णय हे त्या त्या देशांचे सरकार घेत असते. त्यामुळे या संदर्भात सरसकटपणे चीनला जबाबदार धरणे योग्य नाही. हे कर्ज त्या त्या देशांनी स्वत:हून घेतलेले असल्याने त्याच्या परिणामांची जबाबदारीसुद्धा संबंधित देशांनीच घ्यावयास हवी. अल्पकालीन अथवा तात्कालिक राजकीय लाभ डोळ्यांसमोर ठेवून मोठमोठ्या प्रकल्पांसाठी अवाढव्य कर्जे घेतली जातात. परंतु, असे करत असताना सर्वच संलग्न बाबींसंदर्भात संबधित देशांमधील लोकाग्रणींनी अधिक जबाबदारीने पावले टाकणे गरजेचे आहे, असे काही अभ्यासकांचे म्हणणे दिसते. ते अगदीच अयोग्य आहे, असेदेखील म्हणता येत नाही. परंतु, Belt and Road Initiative या उपक्रमाच्या निमित्ताने चीनकडून दिली जाणारी कर्जे अवघ्या जगासाठीच एक प्रकारची डोकेदुखी बनलेली आहे, हे मात्र निर्विवाद. या विळख्यातून बाहेर कसे पडायचे या विवंचनेत आजमितीस अनेक छोटे देश अडकलेले आहेत. हा तिढा वाटतो तितका सोपा नाही आणि निखळ व्यावसायिक अथवा वित्तीय स्वरूपाचा तर नाहीच नाही. हा शुद्ध चिनी कावा आहे. अतिशय धोरणी आणि क्रूर!

**‘अर्थबोधपत्रिके’च्या या अंकातील लेखांचे संदर्भ :**

- https://x.com/EduMinOfIndia/status/1935543386955497479.
- https://www.topuniversities.com/world-university-rankings.
- https://support.qs.com/hc/en-gb/articles/4405955370898-QS-World-University-Rankings
- https://www.nature.com/articles/s43016-025-01173-4
- https://caribbeannewsglobal.com/guyana-is-the-only-nation-among-186-that-achieves-full-self-sufficiency-in-food-production-study-finds/.
- https://en.clickpetroleoegas.com.br/china-usa-12-milhao-de-coelhos-arvores-e-energia-solar-para-conter-desertificacao-transformar-dunas-em-solo-fertil-gerar-bilhoes-recuperar-agua-subterranea-ctl01/

***उर्वरीत संदर्भ पृष्ठ क्र. २९ वर पहावे.***

# सामाजिक

## एका नव्या (युवा) शक्तीचा उदय

विविध देशांमध्ये अलीकडील काळात ज्या काही राजकीय उलथापालथी घडून आल्या त्यांत प्रकर्षाने एक समान धागा स्पष्टपणे जाणवतो. अशा राजकीय फेररचनांच्या केंद्रस्थानी त्या त्या देशातील युवा शक्ती अर्थात, आजच्या आधुनिक भाषेत सांगायचे झाले तर, 'जेन-झी' विलक्षण सक्रिय असल्याचे दिसून येते, हा तो समान धागा. साहजिकच, जगभरात त्यांमुळे अशा 'जेन झी'ने छेडलेल्या अथवा तिच्या सहभागाद्वारे उफाळलेल्या आंदोलनांची चर्चा सुरू झाल्याचे जाणवते. अलीकडच्या काही वर्षांत अनेक देशांमध्ये 'जेन झी'च्या नेतृत्वाखालील आंदोलनांच्या ज्या प्रचंड लाटा निर्माण होऊन तेथील प्रस्थापित सत्ताकेंद्रांना हादरे बसले त्यांत, मुख्यत्वे, सत्ताधाऱ्यांचा भ्रष्टाचार, सरकारची अनुचित धोरणे, आर्थिक असमानता, पर्यावरण संरक्षणासंदर्भातील बेपर्वाई आणि संयंत्रणात्मक बदलांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर परिणामकारक तोड न निघणे यांसारखे मुद्दे केंद्रस्थानी राहिलेले दिसतात.

'सोशल मीडिया'वर तिथे जारी झालेले प्रतिबंध आणि सत्ताधीशांचा भ्रष्टाचार या विरोधात, २०२५ साली नेपाळमध्ये युवक मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरले. ते आंदोलन इतके प्रबळ आणि प्रभावी बनले की, पंतप्रधान आणि सरकारच्या विरोधातील जनाक्रोश टिपेला पोहोचला. परिणामी, पंतप्रधान KP Sharma Oli यांना राजीनामा द्यावा लागला. समाजमाध्यमांचे आयुध प्रभावीपणे वापरून 'चित्रफिती' आणि 'क्लिप्स्'च्या माध्यमातून जनमानसात वेगाने संदेश पसरवला गेला. One Piece सारख्या लोकप्रिय सांस्कृतिक प्रतिकांचा वापर करून सरकारच्या विरोधातील एकजूट जोमदारपणे प्रदर्शित केली गेली. पाणीपुरवठा तसेच वीजपुरवठ्यामधील मोठ्या अडचणींपायी गांजले गेल्यामुळे २०२५ सालीच, मादागास्करमध्ये सुरू झालेल्या आंदोलनाचे रूपांतर, अल्पावधीतच, व्यापक स्वरूपावरील राजकीय उठावात घडून आले. सरकारच्या विरोधातील निदर्शनांमध्ये, त्या देशातील काही प्रांतांत, हिंसक

कारवाया घडून आल्या आणि अखेर, तेथील एक बडे उद्योजक असलेल्या व राष्ट्राध्यक्ष म्हणून धुरा सांभाळणाऱ्या Andry Rajoelina यांना देश सोडून पळून जाणे भाग पडले. लष्कराला सगळी सूत्रे व सत्ता हाती घ्यावी लागली.

सिंहासनारूढ नेत्यांवर प्रभाव पाडून त्यांना सत्ताभ्रष्ट करण्याची क्षमता 'जेन झी'मध्ये आहे, हे या उदाहरणांनी स्पष्टपणे दाखवून दिले आहे. समाजमाध्यमांचा प्रभाव, प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात असणारा असंतोष, आपल्या न्याय्य मागण्यांसाठी प्रसंगी आक्रमक भूमिका धारण करण्याची मानसिकता, नागरी सुविधांसारख्या जिव्हाळ्याच्या समस्यांवर केंद्रित राहणारा असंतोषाचा रोख... अशी काही वैशिष्ट्ये या आंदोलनांमध्ये समान दिसून येतात. केवळ दक्षिण आशियाच नव्हे, तर मोरोक्को, केनिया, टोगो आणि नायजेरियासारख्या आफ्रिकी व मध्यपूर्वेतील देशांमध्येदेखील तेथील तरुणाई, अर्थव्यवस्थेचे गैरव्यवस्थापन, सार्वजनिक सेवा व संसाधनांच्या वापरातील असंवेदनशीलत्या यांसारख्या मुद्द्यांबाबत आवाज उठवताना दिसते. नव्याने साकारत असलेला हा बदल आताशा अनेक देशांमध्ये प्रकर्षाने दृग्गोचर होत देशोदेशींची तरुणाई आता आपल्या हक्कांसाठी जागरुकतेने व आक्रमकपणे व्यक्त होते आहे . आपल्या मागण्यांचे तितक्याच ताकदीने प्रगटीकरणही घडवते आहे. अनाठायी केल्या जाणाऱ्या सरकारी खर्चावर टीका करत मोरोक्को येथील 'जेन झी'ने, 'आम्हांला शिक्षण व आरोग्य प्राधान्याने हवे आहे', अशी मागणी आग्रहाने लावून धरली आहे. केवळ देशपातळीवरच नव्हे तर आता जागतिक पातळीवरील विषयांबाबतसुद्धा ही तरुणाई संघटितरीत्या आपली भूमिका मांडू लागली आहे. 'स्कूल स्ट्राइक फॉर क्लायमेट' हे पर्यावरण आणि हवामान बदलाशी निगडित आंदोलन जागतिक पातळीवर 'जेन झी'नेच घडवून आणले. जागतिक पर्यावरणविषयक धोरणांकडे लक्ष वेधण्यासाठी आणि त्या संदर्भातील राजकीय निर्णयांवर तसेच धोरणप्रणालीवर दबाव निर्माण करण्याच्या दृष्टीने ते आंदोलन विशेष प्रभावी ठरले असे जाणकारांचे मत आहे.

वादळे आणि भूकंपांसारख्या नैसर्गिक आपत्तींशी वर्षानुवर्षे झुंजणाऱ्या फिलिपिन्समध्ये सध्या एक वेगळ्याच स्वरूपाची समस्या राजकीय क्षितिजावर गडद झाली आहे. राष्ट्राध्यक्ष Ferdinand Marcos (Jr.) यांच्या प्रशासनाविरोधात तिथे देशव्यापी आंदोलन झाले. ते आंदोलन प्रामुख्याने भ्रष्टाचाराच्या विरोधाचे आहे. तेथील राजकीय आणि सामाजिक वातावरण या आंदोलनाने ढवळून काढले. 'भ्रष्टाचार थांबवा, राजकीय जबाबदारी निश्चित करा आणि सामान्य नागरिकांना न्याय द्या',

अशा काही आग्रही मागण्या घेऊन त्या देशातील तरुणाई रस्त्यावर उतरली होती. देशातील वाढती आर्थिक दरी, जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींनी घेतलेली उसळी, प्रशासनातील अपारदर्शकता आणि गैरव्यवहार यामुळे देशवासियांच्या सरकारवरवरील ढासळत्या विश्वासाची उद्रेकी अभिव्यक्ती या आंदोलनाच्या रूपाने झाली. फिलिपिन्समधील युवा वर्गानेच या आंदोलनाचे नेतृत्व केले, ही बाब इथे अधोरेखित करावयास हवी.

**‘जेन–झी’ म्हणजे नेमके कोण?**

‘जेन झी’ हे वर्णन नेमके कोणत्या तरूणाईला लागू पडते, हे आता स्पष्ट करावयास हवे. सन १९९७ ते २०१२ या कालावधीत जन्मलेल्या पिढीला ‘जेन झी’ असे म्हटले जाते. त्या आधीच्या पिढीची ओळख ‘जेन–वाय’ अशी केली जाते. तर, सन २०१२ नंतर जन्माला आलेली पिढी ही ‘जेन अल्फा’ म्हणून ओळखली जाते. ‘जेन झी’ म्हणून ओळखली जाणारी पिढी ‘इंटरनेट, स्मार्ट फोन’ आणि समाजमाध्यमे यांच्या बरोबरीने वाढलेली पिढी आहे. तंत्रज्ञानामध्ये अगदी निष्णात असणारी आणि वेगवान आयुष्य जगणारी अशी ही पिढी आहे. थेट, स्पष्ट आणि प्रामाणिक संवादावर तिचा अधिक भर आहे. जागतिक स्तरावर आज ज्या घडामोडी घडताना दिसत आहेत, त्यावरून असे स्पष्ट होते की ‘जेन झी’ ही केवळ समाजमाध्यमांवर प्रतिक्रिया व्यक्त करून स्वस्थ बसणारी पिढी नसून भविष्यासाठीचे धोरण ठरवणारी, सत्ताव्यवस्थेवर प्रभाव टाकणारी आणि समाजाची दिशा बदलणारी पिढी ठरणार आहे. बालपणापासूनच अंकीय माध्यमांत वाढलेली ही पिढी माहितीच्या प्रचंड धबधब्यातून जीवनाचा प्रवास करते आहे. त्यामुळे सत्ता, शासन, न्याय–अन्याय आणि आपले हक्क या सारख्या बाबींविषयी तिच्या जाणिवा या आधीच्या पिढ्यांपेक्षा अधिक तीव्र आणि जागतिक स्वरूपाच्या आहेत.

भविष्यात ‘जेन झी’ची राजकीय भूमिका पारंपरिक राजकारणापुरती मर्यादित राहणार नाही, असे या क्षेत्रातील अभ्यासकांचे विश्लेषणजन्य अनुमान सांगते. निवडणुका, पक्षीय राजकारण किंवा भाषणांपेक्षा जनआंदोलने आणि ‘सोशल मीडिया’च्या माध्यमातून व्यवस्थेवर दबाव टाकणे हे त्यांचे मुख्य शस्त्र असेल. आभासी (ऑनलाइन) मोहिमा, ‘हॅशटॅग’ आंदोलन, ‘व्हायरल’ चित्रफिती आणि जनमत घडवणारी अंकीय चळवळ यांद्वारे ते थेट सरकारांवर आणि संस्थांवर प्रभाव टाकतील. भविष्यात अनेक धोरणे संसदेत मांडली जाण्याआधीच ‘सोशल मीडिया’वर चर्चेचा विषय बनलेली असतील. आणि अशा या सगळ्या स्थित्यंतरांमध्ये ‘जेन

झी'चा वाटा खूप मोठा असणार आहे, असे अभ्यासकांचे प्रतिपादन आहे. 'जेन झी' ही अंकीय जगाच्या सोबतीने वाढलेली पहिली पिढी आहे. भवताल समजून घेण्याची, कोणत्याही माध्यमातून अथवा व्यासपीठांवर व्यक्त होण्याची तिची पद्धत वेगळी आहे. तिची भाषा वेगळी आहे. कालपर्यंत एखादी गोष्ट समाजमान्य होती म्हणून आज ती तशीच्या तशीच स्वीकारणारी ही पिढी नाही. परंतु, त्याच वेळी, दुसरीकडे, चटकन एखाद्या गोष्टीच्या प्रभावाखाली येणारी अशी हीच पिढी आहे. परंपरेचे अथवा पूर्वकालीन संचिताचे कोणत्याही प्रकारचे ओझे बाळगत बसण्याची तिची मानसिकता नाही. जागतिक युद्धांच्या, बेरोजगारीच्या, स्थलांतराच्या, 'ग्लॅमर'च्या, 'ब्रँडिंग'च्या चौफेर उसळलेल्या कोलाहलात, 'मी कोण आहे? आणि 'मी या जगात का व कशासाठी आहे?'... या व अशासारख्या प्रश्नांचा शोध घेणारी ही पिढी आहे. एकीकडे अंकीय जगात बुडून जाणारी आहे तर दुसरीकडे, 'आम्हाला कशाच्याही मागे धावत सुटायचे नाही', असे ठामपणे म्हणणारी ही पिढी आहे.' जेन झीच्या संदर्भातील अभ्यासक आताशा आवर्जून नोंदवत असणारी काही निरीक्षणे ही अशी आहेत.

**मोठा प्रभाव समाजमाध्यमांचा**

'जेन झी'वर सर्वांत मोठा प्रभाव दिसतो तो समाजमाध्यमांचा. 'जेन झी'च्या पुढाकाराने छेडल्या जाणाऱ्या आंदोलनांदरम्यान समाजमाध्यमांच्या संपर्कशक्तीचाच प्रभावी वापर केला जातो, असे अनेक उदाहरणांतून आजवर समोर आलेले आहे. अमेरिकेतील राज्यशास्त्राचे अभ्यासक Syed Rizwan Haider Bukhari यांच्या मते, 'हॅशटॅग' हे तरुणाईचे सर्वांत मोठे हत्यार आहे. एखादा विषय 'हॅशटॅग'च्या माध्यमातून सर्वत्र एका झटक्यात पसरतो. लोकांच्या मनातील भावनांना समाजमाध्यमे व्यासपीठ उपलब्ध करून देतात. 'मोबाइल'वरून संदेश पाठवून, समाजमाध्यमांवरील 'फेसबुक, इन्स्टा व्हिडिओ' यांसारख्या व्यासपीठांच्या माध्यमातून माहितीचे प्रसरण वेगाने घडवून आणत जनजागृती केली जाते. अलीकडच्या काळात जगभरात उसळलेल्या विविध आंदोलनांचा आढावा घेतला असता एक-दोन बाबी प्रकर्षाने ध्यानात येतात. त्या अशा की, तरुणांचा आवाज आता दुर्लक्षित राहिलेला नाही, तरुणाईच्या आशा-अपेक्षांची उपेक्षा करणे आता कोणालाही केवळ अशक्यच नव्हे तर परवडण्याजोगेही नाही. आजची तरूण ताकद राजकीय निर्णयप्रक्रियेत थेट प्रवेश करू पाहते आहे. या अशा नव्याने जागृत होत असलेल्या तरूण दबावाची उचित अशी दखल घेत अनेक सरकारांनी त्यांच्या धोरणांमध्ये बदल केले किंवा त्यांना ते

करावे लागले, याची अनेक उदाहरणे आजुबाजूला आज दिसतात. तरूणाईच्या उद्रेकापायी काही देशांमध्ये तर तेथील सरकारांना सत्तेवरून पायउतार होणे भाग पडले.

राजकीय सहभाग, जागरूकता, आणि सामाजिक उत्तरदायित्व यांची भावना आजच्या तरुणांमध्ये सर्वत्रच वाढलेली दिसते आहे. मात्र, याच चित्राची दुसरी बाजू काळजी वाढवणारी आहे. ती म्हणजे, भविष्यकालीन वाटचालीसंदर्भातील स्पष्ट धोरणदृष्टी लाभलेले प्रभावी नेतृत्व मात्र 'जेन झी'ला अजूनही लाभलेले नाही. तशा प्रकारची दीर्घकालीन धोरणात्मक दिशा अजून गवसलेली नसल्यामुळे, तात्कालिक बदलांवर या पिढीचा आणि तिच्या माध्यमातून छेडल्या जाणाऱ्या आंदोलनांचा भर आजमितीस दिसून येतो. आपले ईप्सित चळवळी व आंदोलनांच्या माध्यमातून साध्य करून घेण्यावर भर असल्याने, हिंसक कारवायांचे हत्यार 'जेन झी' प्रामुख्याने (निदान आज तरी) वापरात आणताना दिसते. आपले म्हणणे संबंधितांच्या गळी जबरदस्तीने उतरवण्याच्या तशा प्रयत्नांपायी, आपल्याच नागरी सुविधांचे नुकसान आपण करतो आहोत, याचे पुरेसे व उचित भान 'जेन झी'ला राहत नसल्याचे आजवर व्यवहारात अनेकदा व अनेक ठिकाणी दिसत आलेले आहे. लोकजीवनाप्रमाणेच अर्थव्यवस्थेवरदेखील 'जेन झी'च्या या कार्यपद्धतीचे विपरित परिणाम होताना दिसतात आणि आजवर होत आलेलेही आहेत.


मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी
यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत २१ व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणाऱ्या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक : नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

अशी ही घुसळण एकीकडे साकारत असतानाच, 'जेन झी'कडून विश्लेषकांना नानाविध अपेक्षादेखील आहेत. राजकारणात आज ना उद्या सक्रिय सहभाग घेत असताना पारंपरिक नेत्यांपेक्षा वेगळा दृष्टिकोन घेऊन ही नवी पिढी कामगिरी बजावेल, सत्तासंपादनापेक्षाही कारभारात पारदर्शकता जपण्यास, जबाबदारी निष्ठेने निभावण्यास 'जेन झी' अधिक महत्त्व देईल, असा आशावादवजा अपेक्षा अभ्यासक व्यक्त करतात. भ्रष्टाचार, सत्तेचा गैरवापर आणि लोकशाही संस्थांची मोडतोड...यांसारख्या अपप्रवृत्तींच्या विरोधात ही पिढी अधिक आक्रमक भूमिका घेईल. त्यामुळे, लोकनेते आणि नेतृत्त्व यांसंदर्भातील पठडीबद्ध संकल्पना व प्रतिमा भविष्यात बदलून तिची जागा 'सेवाभावी अथवा सेवक-नेतृत्व' (servant leadeership) असा भाव मनीमानसी जपणारे धुरीणपण अधिक महत्त्वाचे ठरेल, अशीही अपेक्षा जाणकारांकडून व्यक्त केली जाते आहे.

स्वित्झर्लंडमधील Geneva येथील Graduate Institute या संस्थेमधील समाजशास्त्रज्ञ व अभ्यासक Jean-Francois Bayart यांच्या मते, 'जेन झी' छेडत असलेली आंदोलने सामाजिक न्याय, स्वातंत्र्य अशांसारख्या काही मूलभूत मूल्यांची पाठराखण करणारी असली तरी अनुरूप अशी राजकीय संरचना, ती प्रत्यक्षात साकारण्यासाठी निकडीची असणारी निश्चित विचारधारा अजूनही लाभलेली नसल्यामुळे ही चळवळ भिन्न मार्गांनी वळण्याची अथवा भरकटण्याची भीती वाटते. जगभरातील अनेक उदाहरणांद्वारे हा धोका आजवर पुढ्यात आलेला आहे. प्रसंगी, अतिशय विपरित विचारसरणी बाळगणाऱ्या गटांमध्ये सहभागी होण्यातून ही तरुणाई देशाचे दूरगामी असे नुकसानसुद्धा घडवून आणू शकेल, अशी भीतीही काही अभ्यासक व्यक्त करतात. परिणामी, वैश्विक नकाशावर नव्यानेच उभरत असलेल्या या उमद्या शक्तीचे महत्त्व मान्य केले तरी तिच्या संभाव्य दिशाहीनतेपायी उद्‌भवणारे धोकेही आपण वेळीच लक्षात घेणे आवश्यक आहे, असा सावधगिरीचा इषाराही निरीक्षक आज देतात. 'जेन झी'च्या भूमिकांना आणि त्यांची अभिव्यक्ती घडविणाऱ्या आंदोलनांना व्यापक अशी धोरणात्मक दिशा मिळणे गरजेचे आहे. अन्यथा, 'केवळ रस्त्यावर आंदोलन करून तात्कालिक बदल घडवू पाहणारी शक्ती', इतपतच तिचे स्वरूप मर्यादित राहण्याची शक्यतादेखील नाकारता येत नाही. त्यांमुळे, या शक्तीला विधायक दिशा मिळाल्यास अनेक चांगल्या गोष्टी घडू शकतील, अशी भूमिका देशोदेशींचे अभ्यासक आजघडीला आग्रहाने मांडताना दिसतात.

# तंत्रज्ञान

## कृत्रिम बुद्धिमत्तेच्या गैरवापराला निर्बंधाचा लगाम

आजघडीच्या अंकीय (डिजिटल) युगात 'कृत्रिम बुद्धिमत्ता' ('एआय' – लेखात या पुढे सर्वत्र याच लघुरूपाचा वापर केलेला आहे) हे तंत्रज्ञानक्षेत्र वेगाने विकसित होत आहे. मानवी मेंदूप्रमाणे विचार करून शिकणे, अनुभवातून नवे निर्णय घेणे आणि समस्यांवर उपाय शोधणे ही क्षमता यंत्रांमध्ये कशी आणता येईल, या शोधदिशेने मानवी बुद्धी प्रवर्तित झाली आणि तिच्यातून 'एआय' या नव्या तंत्रज्ञानक्षेत्राचा उगम झाला. आरोग्य, शिक्षण, उद्योग, प्रशासन अशा अनेक क्षेत्रांमध्ये 'एआय' तंत्रज्ञानामुळे मोठी प्रगती होते आहे. मात्र, हे नवतंत्रज्ञान उपयुक्त असले तरी त्याचा गैरवापर समाजासाठी धोकादायक ठरू शकतो ही जाणीव आता समाजातील धुरीणांना होऊ लागली आहे. त्यामुळे हे तंत्रज्ञान जसजसे अधिकधिक लोकांपर्यंत पोहोचत जाईल तसतसे त्याच्या गैरवापराचे धोकेही वाढत जातील याची जाणीव समाजव्यवस्थेत तसेच शासनस्तरावर कार्यरत असणाऱ्या धुरीणांमध्ये आताशा मूळ धरते आहे. त्यामुळे कायदे, नियम, पारदर्शकता, मानवी नियंत्रण आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य अशांसारख्या माध्यमांतून विविध देश 'एआय'च्या गैरवापरावर नियंत्रण आणण्याच्या दिशेने आता पावले उचलू लागलेले आहेत. विशेषतः, समाजमाध्यमांत (सोशल मीडिया) या तंत्रज्ञानाचा गैरवापर अनेक ठिकाणी सुरू झालेला आहे. त्यामुळेच त्याच्या गैरवापराला रोखण्यासाठी आतापासूनच प्रतिबंधात्मक पावले उचलण्यास जगभरातील विविध देशांनी सुरुवात केली आहे. त्या दृष्टीने अनुरूप असे कायदे आणि नियम तयार करण्याच्या दिशेने पावले टाकली जात आहेत. हे नवे तंत्रज्ञान एका बाजूला मानवजातीसाठी वरदान ठरेल अशी अपेक्षा असताना त्या तंत्रज्ञानाचा चुकीच्या पद्धतीने वापर होत राहिल्यास त्यातून गंभीर नवे प्रश्न आणि नवी आव्हाने निर्माण होतील असे लक्षात येऊ लागले आहे. त्यामुळे त्याच्या अनुचित वापराला वेळीच निर्बंधाचा लगाम घालणे आवश्यक बाब बनली आहे.

'एआय'चा सर्वांत मोठा आणि धोकादायक विनियोग म्हणजे वैयक्तिक माहितीचा गैरवापर. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या या तंत्रज्ञानामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर माहितीचा साठ एकत्रित केलेला असतो. मोबाइलचा वापर, संग्रहित केलेली माहिती, माहितीजालावर शोधल्या गेलेल्या गोष्टी, समाजमाध्यमांद्वारे व्यक्तींचे अभिव्यक्त होणारे वर्तन, आर्थिक व्यवहार, आरोग्यविषयक माहिती... यांसारख्या विविध बाबींचा अभ्यास ही प्रणाली करीत असते. त्यामुळे ही सगळी माहिती चुकीच्या पद्धतीने वापरली गेली तर संबंधितांच्या व्यक्तिगत स्वातंत्र्यावर आणि गोपनीयतेवर गदा येऊ शकते. ओळख चोरणे, आर्थिक फसवणूक करणे, 'ब्लॅकमेलिंग', 'सायबर' गुन्हे यामध्ये अशाच रीतीने व्यक्तिगत स्वरूपाच्या माहितीचा सररास गैरवापर केल्याची अनेक उदाहरणे आजवर समोर आलेली आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेचा आणखी एक गैरवापर म्हणजे 'डीपफेक' तंत्रज्ञान! कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने एखाद्या व्यक्तीचा खोटा 'व्हीडिओ', आवाज किंवा छायाचित्र तयार करता येते. या तंत्रज्ञानाचा वापर करून कुणाचीही वैयक्तिक बदनामी करणे, सामाजिक तेढ निर्माण करणे, चारित्र्यहनन करणे, खोट्या बातम्या पसरवणे अशांप्रमाणे अनेक अनिष्ट गोष्टी केल्या जाऊ शकतात. 'सत्य' आणि 'असत्य' या मधील फरक ओळखणे भविष्यात लोकांना कठीण होऊन जावे, इतका या नव्या तंत्रज्ञानाचा धोका मोठा आहे, अशी भीती जाणकारांकडून आता व्यक्त केली जाते आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्रज्ञानाच्या गैरवापराचे आणखी एक मोठे उदाहरण म्हणजे 'हॅकिंग'. बनावट 'ई-मेल्स' पाठवून होणारी फसवणूक, दिशाभूल करणारे 'चॅटबॉट्स', आर्थिक घोटाळे हे अलीकडच्या काळातील या तंत्रशास्त्राच्या घातक वापराचे काही वाढते प्रकार आहेत. रोजगाराच्या क्षेत्रातही कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्रज्ञानाचा गैरवापर वाढू लागला आहे. अनेक औद्योगिक संस्थांमध्ये यंत्रांचा व संगणकीय आज्ञावलींचा वापर वाढतो आहे. यामध्ये योग्य ती दक्षता घेतली न गेल्यास सामाजिक असंतोष, आर्थिक विषमता आणि बेरोजगारीची गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते. म्हणूनच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर मर्यादित आणि गरजेपुरताच केला जावा अशी अपेक्षा जाणकारांकडून व्यक्त केली जाते आहे. साहजिकच, त्याच्या अनिर्बंध वापराला विरोध वाढतो आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या गैरवापराला रोखण्यासाठी युरोपीय महासंघाने जगातील पहिला कायदा तयार केला. 'एआय अॅक्ट' नावाचा कायदा तयार करून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रणालींना त्यांच्याशी संलग्न जोखमीच्या पातळीनुसार युरोपीय महासंघाने

वर्गीकृत केले आहे. जनतेवर पाळत ठेवण्यासाठी ‘एआय’चा वापर, व्यक्तिगत चारित्र्यहनन करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा चुकीच्या पद्धतीने वापर... अशांसारख्या प्रकारांवर या कायद्यान्वये बंदी घालण्यात आली आहे. तसेच या कायद्यानुसार आता पारदर्शकता आणि जबाबदारी यावर अधिक भर दिला जातो आहे. ‘एआय’ प्रणाली कशाप्रकारे निर्णय घेतात, त्यामागील माहितीचा स्रोत काय आहे हे स्पष्ट करणे संबंधित कंपन्यांना या कायद्यानुसार आता बंधनकारक केले जाते आहे. तसेच, महत्त्वाचे निर्णय ‘एआय’वर अवलंबून राहून न घेता त्यात मानवी सहभाग असणे केवळ अगत्याचेच नव्हे तर अनिवार्य ठरते, अशी या कायद्यामागची खरी भूमिका आहे. ‘डीपफेक’, खोटी माहिती, चुकीचा मजकुर यांचा प्रचार-प्रसार अशांसारख्या अनुचित बाबींवर नियंत्रण मिळवण्याच्या दृष्टीने हा कायदा प्रभावी ठरणार आहे. खोटे ‘व्हीडिओ’, आवाज किंवा प्रतिमा तयार करणाऱ्या ‘एआय’ तंत्रज्ञानाच्या वापरासंबंधात अनेक देशांनी आता कडक नियम लागू केले आहेत. कायद्याचे कवच पुरवून नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी अनेक देशांनी प्रयत्न सुरू केले आहेत. विशेषत:, नोकरी, कर्जवाटप, न्यायव्यवस्था यांसारख्या क्षेत्रांमध्ये या कायद्याचा व नियमावलीचा लाभ होणार आहे. ‘एआय’ तंत्रज्ञानाचा जगभरात वेगाने होणारा प्रसार लक्षात घेऊन अनेक देशांनी आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठीदेखील पुढाकार घेतला आहे. संयुक्त राष्ट्रे, ‘जी २०’ यांसारख्या संस्था-संघटनांमार्फत ‘एआय’ संदर्भात समान धोरणे आणि नैतिक मार्गदर्शक तत्त्वे तयार केली जावीत या दिशेनेही आता प्रयत्न जारी केले जात आहेत.

कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी स्वतंत्र असा एकच कायदा अमेरिकेमध्ये नसला तरी विविध क्षेत्रांनुसार तिथे आवश्यक असे नियम तयार करण्यात आले आहेत. पारदर्शकता, सुरक्षितता,माहितीच्या गोपनीयतेचे संरक्षण आणि नागरिकांच्या हक्कांचे रक्षण यावर अमेरिकेमध्ये भर दिला जातो आहे. तसेच काही राज्यांनी ‘डीपफेक’ आणि ‘एआय’च्या चुकीच्या वापराच्या विरोधात विशेष कायदे लागू केलेले आहेत. Take It Down Act हा कायदा अमेरिकेने २०२५ साली तयार केला आहे. ‘एआय’च्या वापराद्वारे निर्माण केलेल्या कायदाबाह्य बाबी किंवा संबंधित लोकांच्या संमतीशिवाय तयार केलेले ‘डीपफेक’ किंवा याच वर्गात समाविष्ट होणाऱ्या अन्य प्रकारच्या चुकीच्या गोष्टींचा प्रसार रोखण्यासाठी हा कायदा तयार करण्यात आला आहे. ‘एआय’ तंत्रज्ञानाच्या मदतीने तयार केलेला एखादे बनावट छायाचित्र किंवा ध्वनिचित्रफीत जर कुणी गैरहेतूने समाजमाध्यमांवर किंवा अन्यत्र प्रसारित केली

असेल तर त्या विरोधात तक्रार दाखल केल्यानंतर संबंधित छायाचित्र अगर ध्वनिचित्रफीत ४८ तासांच्या आत समाजमाध्यमांवरून काढून टाकणे बंधनकारक करणारी तरतूद या कायद्यात करण्यात आलेली आहे. चीननेसुद्धा हा धोका वेळीच ओळखून पावले टाकलेली आहेत. 'जनरेटिव्ह एआय'च्या वापरावर तिथे आता निर्बंध जारी करण्यात आलेले आहेत. त्यासाठी आखून दिलेल्या नियमांचे पालन करणे सगळ्यांवरच बंधनकारक आहे. सामाजिक मूल्यांशी सुसंगत असतील अशाच कृती कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीचा वापर करताना व्हावी अशी अपेक्षा संबंधित मार्गदर्शक तत्त्वांमध्ये मांडलेली आहे. कोणताही मजकूर प्रसारित केला जात असताना वास्तव ओळख पडताळणी अनिवार्य करण्यात आलेली आहे. त्यामुळे या तंत्रशास्त्राच्या गैरवापरावर अंकुश निर्माण झालेला आहे. बेकायदेशीररीत्या प्रसारित केलेली छायाचित्रे, मजकूर किंवा 'व्हीडिओ' समाजमाध्यमांवर आढळून आल्यास तातडीने शोध घेऊन संबंधितांवर कारवाई करण्याची कठोर भूमिका चीनने सुरुवातीपासूनच घेतलेली आहे.

विविध देशांमध्ये नानाविध दिशांनी व अनेकानेक पातळ्यांवर जसे प्रयत्न सुरू आहेत त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरावरही या संदर्भातील सहकार्य वाढवून भविष्यातील संभाव्य धोके कमी करण्यासाठी पावले उचलली जात आहेत. या संदर्भात अलीकडेच आयोजित करण्यात आलेल्या एका परिषदेमध्ये, 'एआय'च्या वापरासंदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावर लागू करता येईल अशा प्रकारची नियमांची चौकट निर्माण केली जावी यासाठी सुमारे ५०हून अधिक देशांनी सहमती दर्शवलेली आहे. लोकशाही व कायद्याच्या प्रचलित तत्वांशी सुसंगत राहत कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालींचा वापर केला जावा आणि चुकीची माहिती प्रसारित करण्यापासून संबंधितांना रोखण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरही काही ठोस नियम केले जावेत या दृष्टीने पावले पडत आहेत. अर्थात, हे सारे काही घडत असले तरी वास्तवात ज्या वेगाने या तंत्रज्ञानाचा प्रसार आणि वापर होतो आहे तो पाहता तातडीने काही उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्यासाठी देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पातळीवर ठोस आणि तातडीने पावले उचलली जाणे गरजेचे ठरते.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराबाबत सर्वच संबंधित घटकांची स्पष्ट जबाबदारी निश्चित होणे महत्त्वाचे आहे, या तंत्रशास्त्राच्या गैरवापराबाबत दंडात्मक तरतुदी ठरवणे आवश्यक आहे, उच्च जोखमीच्या 'एआय' प्रणालीसाठी परवाना प्राप्त करणे आवश्यक ठरवले जावे...अशा प्रकारची अपेक्षा या क्षेत्रातील जाणकारांकडून व्यक्त होते आहे. या क्षेत्राशी संलग्न असणाऱ्या सर्वांनीच पारदर्शकता जपावी तसेच

या तंत्रशास्त्राच्या वापरासंदर्भात प्रत्येकाचेच उत्तरदायित्व निश्चित केले जावे या दृष्टीने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराविषयांची मार्गदर्शक तत्त्वे व संकेत तयार करण्यात यावीत, त्यांचा अंमल चालू व्हावा आणि केवळ इतकेच नाही तर, त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या 'अल्गॉरिदम'ची वेळोवेळी तपासणी तटस्थ व्यक्तीकडून केली जावी, याबाबत सर्वसहमती निर्माण करण्यावर आता भर दिला जातो आहे. तसेच, एकदा अशी मार्गदर्शक तत्त्वे लागू झाल्यानंतर त्यांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यासंदर्भातील निर्णयप्रक्रिया अतिशय वेगवान असणे गरजेचे आहे, ही बाबदेखील आताशा आवर्जून मांडली जाते आहे. अशी खबरदारी घेतली गेल्यास कृत्रिम बुद्धिमत्तेच्या गैरवापराला नक्कीच आळा बसू शकेल, अशी अपेक्षावजा आशा या क्षेत्रातील तज्ज्ञ आताशा व्यक्त करताना दिसतात.

'एआय' तंत्रज्ञानाच्या गैरवापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक भासणारी जी उपाययोजना आज सुचविली जाते, तिचे काही पैलू पुढीलप्रमाणे :

**१) स्वतंत्र नियामक संस्था स्थापन करणे –** कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या नियमनासाठी प्रत्येक देशाने स्वतंत्र नियामक संस्था स्थापन करावी. कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालींची तपासणी करणे, प्रमाणपत्र देणे, तक्रारींचे निराकरण करणे आणि नियमांचे उल्लंघन झाल्यास कारवाई करणे अशांसारखे अधिकार या नियामक संस्थेला प्रदान केले जातील अथवा जावेत.

**२) साक्षरता आणि जनजागृती –** कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान नेमके काय आहे, त्याचे फायदे-तोटे काय आहेत, 'डीपफेक' किंवा खोटी माहिती कशी ओळखायची याचे शिक्षण नागरिकांना देणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक ती उपाययोजना तातडीने करणे गरजेचे आहे. शालेय व महाविद्यालयीन शिक्षणामध्येसुद्धा कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साक्षरतेसंदर्भात अभ्यासक्रम तयार करणे गरजेचे ठरते.


## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

## नियामक मंडळ

१. **प्रा. डॉ. एस. श्रीरामन** (अध्यक्ष)
२. **प्रा. डॉ. रवींद्र ढोलकिया**
३. **प्रा. डॉ. सुरिंदरसिंग जोधका**
४. **डॉ. रमानाथ झा**
५. **प्रा. डॉ. सुहास पळशीकर**
६. **प्रा. डॉ. अंजली राडकर**
७. **श्री. अभय टिळक** (मानद संचालक)

**३) माहितीच्या (डेटा) संरक्षणाचे कडक कायदे –** कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करताना मोठ्या प्रमाणात संबंधितांच्या वैयक्तिक माहितीचा वापर केला जातो. त्यामुळे एकंदरीनेच गोपनीयतेचे आणि नागरिकांच्या व्यक्तिगत माहितीचे संरक्षण करण्यासाठी कठोर कायदे आवश्यक आहेत. त्यांची प्रभावी अंमलबजावणीसुद्धा तितकीच गरजेची आहे.

**४) कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान प्रणालींचे नियमित 'ऑडिट' आवश्यक –** सरकार आणि खासगी क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रणालींचे नियमित तांत्रिक व नैतिक 'ऑडिट' करणे आवश्यक आहे. यामुळे त्यांचा गैरवापर होण्याची शक्यता खूप कमी होऊ शकते.

**५) 'डीपफेक' आणि चुकीच्या माहितीबाबत कडक शिक्षा –** खोटे 'व्हीडिओ', आवाज किंवा प्रतिमा तयार करून फसवणूक करणाऱ्यांसाठी कडक दंड व शिक्षा ठरवाव्यात. समाजमाध्यमांवर प्रसारित केल्या जाणाऱ्या अशा चुकीच्या मजकुरावर तातडीने व कठोर कारवाई होणे गरजेचे आहे.

**६) मानवी नियंत्रण बंधनकारक करणे –** न्यायव्यवस्था, भरती प्रक्रिया, आरोग्यसेवा आणि कर्जवाटप यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरावर मानवी नियंत्रण बंधनकारक करण्याच्या दृष्टीने निर्णय घेणे आवश्यक ठरणार आहे.

**७) कृत्रिम बुद्धिमत्तेच्या संशोधनपर आणि नैतिक वापराला प्रोत्साहन –** कृत्रिम बुद्धिमत्तेचा चुकीच्या पद्धतीने वापर न होता सुरक्षित, पारदर्शक शैलीनिशी या तंत्राचा वापर केला जावा, याचा विनियोग संशोधनासाठी व्हावा. या तंत्रज्ञानाच्या नैतिक वापरासाठी निधीपुरवठ्यासह प्रोत्साहन दिले जावे.

**८) आंतरराष्ट्रीय सहकार्य मजबूत करणे –** कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा गैरवापर देशाच्या सीमांपुरता मर्यादित नसतो. त्यामुळे इतर देशांबरोबर माहितीची देवाणघेवाण, समान धोरणे आणि संयुक्त करार ही देखील आवश्यक बाब आहे.

या संदर्भात फक्त कायदे बनवणे पुरेसे नाही, तर सर्वत्रच त्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि जनजागृती आवश्यक आहे. भविष्यातील धोक्यांची चाहूल आतापासूनच लागू लागली असल्यामुळे त्या दिशेने योग्य ती पावले टाकली जावीत अशी अपेक्षा जाणकार आता प्रकर्षाने व्यक्त करीत आहेत.

## शिक्षण

# भारतीय विद्यापीठांचा चढता आलेख

भारतीय ज्ञानपरंपरेचा वारसा सांगणाऱ्या नालंदा आणि तक्षशिला या भारतीय विद्यापीठांनी पूर्वी संपूर्ण जगात आपला एक वेगळा ठसा उमटवलेला होता. आज जी विद्यापीठे जगात नावारुपाला आलेली आहेत त्यांच्या किती तरी अगोदर ही विद्यापीठे जगाला ज्ञान देण्याचे काम करीत होती. जगभरातून लोक या विद्यापीठांमध्ये ज्ञानसंपादनासाठी येत असत. हळुहळू हे चित्र मात्र बदलत गेले. परकीय विद्यापीठांनी झपाट्याने छलांग मारत अग्रगण्य स्थान प्राप्त केले. साहजिकच ऑक्सफर्ड, केंब्रिज, हार्वर्ड, बॉस्टन या विद्यापीठांचा बोलबाला जगभरात सुरू झाला. अलीकडच्या काळात मात्र भारतीय विद्यापीठांची जागतिक स्तरावर चांगली प्रगती होत असल्याचे विधायक आणि आश्वासक चित्र दिसून आलेले आहे. 'क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग' या व्यवस्थेने जगभरातील विद्यापीठांच्या अलीकडेच प्रगट केलेल्या जागतिक क्रमवारीमध्ये भारतातील विद्यापीठांची कामगिरी उंचावत असल्याचे आश्वासक संकेत स्पष्टपणे मिळतात. या क्रमवारीत भारतातील ५४ विद्यापीठांचा समावेश झालेला आहे आणि विद्यापीठांच्या संख्येनुसार, या सूचीमध्ये भारत हा चौथ्या क्रमांकाचा देश बनला आहे. अमेरिका, ब्रिटन आणि चीन हेच तीन देश याबाबतीत भारताच्या पुढे आहेत. भारतातील आठ विद्यापीठांची या क्रमवारीमध्ये पहिल्यांदाच हजेरी लागलेली आहे. २०१५ साली भारतामधील केवळ ११ विद्यापीठेच काय ती 'क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग' या व्यवस्थेने मांडलेल्या जागतिक क्रमवारीमध्ये अंतर्भूत होती. परंतु, अवघ्या दशकभरामध्ये त्यात पाच पटीने प्रगती झालेली आहे. नवी दिल्ली येथील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' (आयआयटी) आणि बेंगळुरू येथील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स' (आयआयएससी) या दोन संस्था या क्रमवारीत आघाडीवर आहेत.

आधुनिक भारतीय विद्यापीठांची जागतिक स्थिती पाहिली तर त्यांचा दर्जा उंचावत असल्याचे दिसून येते आहे. हे एक आश्वासक चित्र म्हणायला हवे. 'क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग' या व्यवस्थेने तयार केलेल्या सूचीमध्ये भारतीय विद्यापीठांची संख्या ११ वरून ५४ झालेली असल्याचे दिसते आहे. अनेक विद्यापीठांनी आपल्या क्रमवारीत सुधारणा केली आहे. नवी दिल्ली येथील 'आयआयटी'ने या क्रमवारीत १२३ वे स्थान पटकावले आहे. २०२५ साली हीच संस्था या क्रमवारीत १५० व्या क्रमांकावर होती. भारतीय विद्यापीठांमधील पदवीधरांवर उद्योगजगताचा विश्वासदेखील वाढला आहे याचेही सूचन या क्रमवारीमध्ये घडते. भारतातील सर्वोच्च गणल्या जाणाऱ्या शिक्षणसंस्थांमधून शैक्षणिक अर्हता प्राप्त करून बाहेर पडणाऱ्या उमेदवारांना कोणत्या कंपन्यांत, उद्योगांत अथवा संस्थांमध्ये कारकिर्दीची संधी मिळते त्यांवरही संबंधित शिक्षणसंस्थेचे मानांकन करण्याचा एक परिपाठ 'क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग' या व्यवस्थेद्वारा सूची तयार करतेवेळी पाळला जातो. अनेक भारतीय संस्थांमधील यशस्वी पदवीधर ख्यातनाम संस्थांमध्ये अथवा उद्योगांत नियुक्त झाल्यामुळे या निकषानुसारही भारतीय शिक्षणसंस्थांना या क्रमवारीमध्ये चांगले मानांकन मिळाले आहे.

या संदर्भातील जागतिक क्रमवारीमध्येसुद्धा, जगातील सर्वोच्च अशा १०० संस्थांमध्ये भारतातील पाच शिक्षणसंस्थांनी स्थान प्राप्त केले आहे. उद्योगविश्वाला भारतीय पदवीधरांबद्दल वाटणारा विश्वासच यातून अधोरेखित होतो, असे या क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे. सर्वोत्तम गणल्या जाणाऱ्या शिक्षणसंस्थांमधील अध्यापकांनी तसेच संशोधकांनी लिहिलेल्या संशोधनपर निबंधांचा संदर्भोलेख किती ठिकाणी व किती वेळा केला जातो याचाही, या क्रमवारीमध्ये, संबंधित अभ्यासक अगर संशोधकनिहाय विचार केला जातो. त्याला, या प्रांतातील तांत्रिक परिभाषेत Citations per Faculty असे संबोधण्यात येते. या निकषानुसार करण्यात आलेल्या जागतिक क्रमवारीमध्येही, भारतातील आठ विद्यापीठांचा जगातील सर्वोच्च १०० संस्थांमध्ये समावेश झालेला आहे. त्यांचा सरासरी गुणांक जर्मनी, अमेरिका आणि ब्रिटन यांच्यापेक्षाही अधिक आहे, ही विशेष उल्लेखनीय अशी बाब ठरते, असे अभ्यासकांचे प्रतिपादन होय.

जगभरातील उच्च शिक्षण संस्थांच्या मूल्यांकनाच्या प्रांतात 'क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग' या प्रणालीने केलेले मानांकन हे सर्वाधिक विश्वासार्ह मानले जाते. तब्बल १ कोटी ६० लाखांपेक्षा अधिक शैक्षणिक व संशोधनपर लेखांची माहिती व विश्लेषण, तसेच १ लाख ५१ हजार शिक्षणतज्ज्ञ आणि अन्य एक लाख

कर्मचाऱ्यांच्या अभिप्रायावर हे मानांकन बेतलेले असते. प्राध्यापकांची पात्रता, त्यांच्या संशोधनाची प्रगल्भता, त्यांत अन्य शैक्षणिक घटकांचा असणारा सहभाग आणि त्या विद्याव्यासंगाचे विद्यार्थ्यांवर होणारे अथवा झालेले परिणाम अशा विविध घटकांचा ही क्रमवारी तयार करतेवेळी विचार केला जातो. या वर्षी हे मानांकन ठरवत असताना International Student Diversity असा एक नवा निर्देशांक त्यांत समाविष्ट करण्यात आला होता. भारतीय संस्थांमध्ये परदेशातून शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आणि असे परदेशस्थ विद्यार्थी ज्या देशातून येतात त्या देशांमधील विविधता या दोन बाबींचा विचार हा निर्देशांक निश्चित करतेवेळी प्रामुख्याने विचार करण्यात आला. 'क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग' प्रणालीने या वर्षी आपल्या मानांकन पद्धतीमध्ये काही गुणात्मक सुधारणा घडवून आणल्या. क्रमवारी तयार करतेवेळी विचार करण्यात आलेल्या प्रत्येक शिक्षणसंस्थेच्या कामगिरीचे वास्तव चित्र नजरेसमोर उमटण्यास त्यांमुळे मदत झाली. त्या त्या शिक्षणसंस्थेने संशोधन आणि विकास (रीसर्च ॲन्ड डेव्हलपमेन्ट) या संदर्भात हाती घेतलेले उपक्रम, त्या त्या शिक्षणसंस्थांमधून बाहेर पडणाऱ्या उमेदवारांची रोजगारक्षमता, त्या त्या शिक्षणसंस्थेमध्ये जागतिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा राहिलेला सहभाग, त्या त्या शिक्षणसंस्थेमधील विद्यार्थ्यांची आकलनक्षमता अशा विविध मुद्यांचा अंतर्भाव मानांकन तयार करण्यासाठी संबंधित कार्यपद्धतीमध्ये करण्यात आलेल्या सुधारणांमध्ये आहे.

हळूहळू का होईना पण, गेल्या काही वर्षांमध्ये जागतिक स्तरावरील विद्यापीठांमध्ये भारतातील विद्यापीठांचा दर्जा उंचावतो आहे. मात्र, ही प्रगती अचानक झालेली नसून तिच्यामागे वेळोवेळी घेतले गेलेले ठोस असे धोरणात्मक निर्णय, जारी करण्यात आलेल्या शैक्षणिक सुधारणा यांचे योगदान मुख्यत: आहे. त्याचप्रमाणे जागतिक पातळीवरचे बदलते वातावरणसुद्धा या प्रगतीला पोषक ठरले आहे. संशोधकांनी त्यांच्या संशोधनांसाठी संपादन केलेली 'पेटंट्स्', त्यांनी केलेले संशोधनपर लेखन व प्रवर्तित केलेल्या संशोधनप्रकल्पांची संख्या यांना जागतिक पातळीवरील महत्त्वाच्या मानांकनांमध्ये विशेष महत्त्व दिले जाते. गेल्या दहा वर्षांत भारतातील शिक्षणाच्या क्षेत्रात जे जे परिवर्तन घडून आले त्याचा एक परिणाम 'पेटंट्स्'च्या नोंदणीमध्ये झालेल्या लक्षणीय वाढीमध्ये प्रतिबिंबित होतो. नुकत्याच संपलेल्या २०२५ या एकाच वर्षात ६४ हजार 'पेटंट्स्' दाखल करून, सर्वाधिक 'पेटंट्स्'ची नोंदणी करणाऱ्या देशांच्या मालिकेत भारताने वैश्विक स्तरावर सहावा क्रमांक पटकावलेला आहे. भारतातील विद्यापीठे आणि शिक्षणसंस्था यांच्या माध्यमातून

सादर केल्या जाणाऱ्या 'पेटंट्स्'च्या संख्येमध्ये अवघ्या दोनच वर्षांत दुपटीने वाढ झाली आहे.

विद्यापीठे, तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्था आणि संशोधन केंद्रे आता ज्ञाननिर्मितीबरोबरच बौद्धिक स्वामित्वाचे संरक्षण व त्यांद्वारे पुढे त्या संशोधनाचे व्यावसायिकीकरण करण्यावर भर देत आहेत. त्यामुळे विविध क्षेत्रांत होणारे संशोधनही आपसूकच वाढत चालले आहे. संशोधनाभिमुख शिक्षणपद्धतीचा व्यापक प्रमाणावर केला जात असलेला स्वीकार हे या वाढीमागील प्रमुख कारण होय. उच्च शिक्षण संस्थांमध्ये संशोधन प्रयोगशाळा, नवशोधनाची केंद्रे आणि 'इन्क्युबेशन' संकुले स्थापना झाली आहेत. नवनवीन कल्पनांवर संशोधन करण्यास विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना प्रोत्साहन दिले जात असून त्यातून नवे तंत्रज्ञान, उपकरणे, संगणकाच्या आज्ञावली आणि प्रक्रिया विकसित होत आहेत. अशा प्रकारच्या संशोधनांद्वारे उत्क्रांत होणाऱ्या नाविन्यपूर्ण संकल्पनांचे 'पेटंट' घेण्याकडे संस्थांचा कल वाढू लागल्याचे एक आश्वासक चित्र सध्या भारतात दिसत असल्याचे या क्षेत्रातील जाणकारांचे निरीक्षण आहे.

देशात आता अंमलबजावणी होत असलेले राष्ट्रीय शिक्षणाचे नवीन धोरण हेसुद्धा 'पेटंट्स्'मध्ये वाढ होण्याचे एक महत्त्वाचे कारण ठरले आहे. या धोरणात नवोन्मेष, संशोधन आणि उद्योजकतेला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. बहुविषयक शिक्षण, संशोधनावर आधारित अभ्यासक्रम आणि उद्योगविश्व व शिक्षणसंस्था यांच्यादरम्यानचा संवाद व सहकार्यामुळे शैक्षणिक संस्थांमध्ये संशोधनपूरक वातावरण विकसित होण्यास मदत होते आहे. संशोधन करताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्यांच्या सोडवणुकीबाबत लगोलग मिळणारे मार्गदर्शन, अभिनव संशोधन प्रकल्प, 'स्टार्ट-अप्स्' आणि उत्पादनाभिमुख संशोधन करण्याच्या वाढत्या संधी यांमुळे अनेक कल्पक व होतकरू संशोधकांना प्रेरणा मिळते आहे. तसेच अंकीय शिक्षण (डिजिटल एज्युकेशन) आणि एकंदरीने सर्वत्रच जारी असलेला तंत्रज्ञानाचा वाढता वापर यामुळेही 'पेटंट्स्'मध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. 'ई-लर्निंग लॅटफॉर्म्स,' कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे उपलब्ध करून दिली जाणारी साधने, (एआय टूल्स) या शैक्षणिक 'ॲप्स्, ऑनलाइन' मूल्यांकन प्रणाली, आणि 'स्मार्ट' वर्गखोल्या यासारख्या सुविधांमुळे नवकल्पनांचा विकास आणि त्या दिशेने होणारे संशोधन यांना गती मिळते आहे.

'पेटंट्स्'च्या नोंदणीचे प्रमाण वाढल्यामुळे शिक्षण क्षेत्रातील बौद्धिक संपदेचे महत्त्वदेखील वाढले आहे. शासनस्तरावरील संशोधनपूरक योजना आणि वेळोवेळी

मिळणारे प्रोत्साहन हेदेखील या वाढीस कारणीभूत ठरले आहेत. ‘स्टार्ट-अप इंडिया, मेक इन इंडिया, इनोव्हेशन मिशन’ यांसारख्या उपक्रमांमुळे शैक्षणिक संस्थांमधील संशोधनाला आर्थिक व धोरणात्मक पाठबळ मिळाले आहे. विद्यार्थी व शिक्षकांमध्ये संशोधनाची गोडी निर्माण व्हावी व त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून अनेक विद्यापीठांनी स्वतंत्र ‘पेटंट्स्’ विभाग आणि बौद्धिक संपदा हक्क विभाग सुरू केले आहेत. उद्योगांसोबतचे सहकार्य वाढल्याने ‘पेटंट्स्’चे महत्त्व अधिक स्पष्ट झाले आहे. उद्योगांच्या गरजा लक्षात घेऊन त्या नुसार संशोधन केल्यामुळे त्यातून व्यावसायिकदृष्ट्या उपयुक्त तंत्रज्ञान विकसित होते आहे. अशा संशोधनाचे ‘पेटंट’ घेण्याचे प्रमाणही वाढते आहे, असेही अभ्यासकांचे निरीक्षण आहे.

या संदर्भात, World Intellectual Property Organization ने सादर केलेल्या अहवालानुसार २०२४ या वर्षामध्ये जागतिक स्तरावर ‘पेटंट्स्’ संदर्भातील अर्जांची संख्या ४० लाखांपर्यंत गेलेली आहे. World Intellectual Property Organization चे संचालक Daren Tang यांच्या मते, गेल्या दहा वर्षांत भारतातील शिक्षण क्षेत्रातून दाखल केल्या जाणाऱ्या ‘पेटंट्स्’च्या नोंदणीमध्ये झालेली वाढ ही ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थेच्या दिशेने उचलले जात असलेले महत्त्वाचे पाऊल म्हणावे लागेल. ही वाढ केवळ आकड्यांपुरती मर्यादित नसून, संशोधनाची गुणवत्ता, नवोन्मेषाची संस्कृती आणि जागतिक स्पर्धेत टिकून राहण्याची क्षमता यांचेही सूचन तिच्या माध्यमातून घडते. भविष्यात भारताने संशोधनामध्ये अधिक गुंतवणूक केली, आंतरराष्ट्रीय सहकार्य अधिक वाढवले आणि विद्यार्थ्यांमध्ये नवोन्मेषी दृष्टिकोन विकसित करण्यावरील भर सातत्यपूर्ण राखल्यास ‘पेटंट्स्’ची संख्या आणखी वाढत जाईल.

अर्थात, एका बाजूला प्रगतीचे हे चित्र समाधानकारक आणि आश्वासक असले तरीही भरून पावावे असे त्यांत काहीही नाही. आजमितीस, भारतातील ५४ विद्यापीठांनी जागतिक विद्यापीठांच्या मालिकेत स्थान मिळवले ही बाब समाधानकारक असली तरीदेखील वैश्विक स्तरावरील पहिल्या १०० विद्यापीठांमध्ये अगर संशोधन संस्थांमध्ये भारतातील एकही विद्यापीठ अजून स्थान मिळवू शकलेले नाही, ही वस्तुस्थिती डोळेझाक करता येण्यासारखी नाही. भारतातील संशोधनामध्ये दृग्गोचर होत असलेली वाढ अधिकतर संख्यात्मक दिसते. गुणात्मक पातळीवर त्या संशोधनांचा म्हणावा तसा प्रभाव जागतिक स्तरावर पडत नाही. त्या तुलनेत ऑक्सफर्ड, हार्वर्ड, केंब्रिज या विद्यापीठांमध्ये होणारे संशोधन जागतिक धोरणे, तंत्रज्ञान व उद्योगक्षेत्रे

यांच्यावर थेट प्रभाव टाकते. इथे भारतीय विद्यापीठांना सुधारणेला पुष्कळ वाव आहे, असे या क्षेत्रातील अभ्यासक आवर्जून नमूद करतात.

दीर्घकालीन आणि मूलभूत संशोधनाकडे विद्यार्थी कसे वळतील याकडे भारतीय विद्यापीठांनी लक्ष देणे गरजेचे आहे, असे, World Intellectual Property Organization चे संचालक Daren Tang यांनी व्यक्त केलेले मत दुर्लक्षिता येण्याजोगे अजिबातच नाही. हे संशोधन उच्च दर्जाचे असेल तर ते संशोधनाला वाहिलेल्या जागतिक स्तरावरील प्रकाशनांमध्ये प्रकाशित होते. विद्यापीठांचा दर्जा त्यातूनच उंचावत जातो. भारतीय विद्यापीठांची स्वतंत्र ओळख जागतिक अधिमान्यता लाभलेल्या विद्यापीठांच्या वर्तुळामध्ये त्यांद्वारेच प्रस्थापित होऊ शकेल. शिकण्यासाठी आवर्जून भारतीय विद्यापीठांत यावे असे परदेशी विद्यार्थ्यांना त्यांखेरीज वाटणार नाही. आजच्या घडीला हे प्रमाण खूप कमी आहे. त्या दृष्टीने परदेशी विद्यापीठांशी दीर्घकालीन सहकार्य, जागतिक परिषदांमध्ये भारतीय संशोधकांचे प्रतिनिधित्व आणि त्यांनी केलेल्या मूलभूत संशोधनांचे तिथे सादरीकरण, नामांकित परदेशी विद्यापीठांतील प्राध्यापकांना भारतीय विद्यापीठांशी जोडणे... अशांसारखे प्रयत्न सतत करत राहण्यानेच, भारतीय विद्यापीठांना आपला दर्जा अधिक उंचावता येऊ शकेल, असा या क्षेत्रातील जाणकारांचा सांगावा आहे.

*(पृष्ठ क्र. ११ वरून...)*

**'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकातील लेखांचे संदर्भ :**


- https://www.reuters.com/world/china/china-completes-3000-km-green-belt-around-its-biggest-desert-state-media-says-2024-11-29/
- https://cepr.org/voxeu/columns/rise-china-international-lender
- https://www.thehindu.com/data/over-80-nations-got-loans-from-china-in-the-last-two-decades/article70330289.ece
- https://www.sciencedirect.com/science/article/pii/S0022199621001197
- https://www.solaceglobal.com/report/gen-z-protest-movements/?utm_source=chatgpt.com
- https://www.cfr.org/article/how-global-gen-z-protests-have-shocked-and-transformed-governments
- https://imperfect.co.in/gen-z-crisis-potentials/
- https://artafinance.com/insights/gen-z-in-crisis-money-mental-health-and-the-fight-for-stability
- https://sccei.fsi.stanford.edu/china-briefs/chinas-overseas-lending
- https://www.imf.org/external/np/fin/tad/extrans1. aspx? member Key1=180&endDate=2099-12-31&finposition_flag=YES

## सामाजिक

# अन्ननिर्मितीतील स्वयंपूर्णता

आजच्या जागतिकीकरणाच्या युगामध्ये, स्वत:ला महासत्ता म्हणवून घेणारे देशही अन्नधान्याची निकड भागविण्यासाठी परस्परांवर अवलंबून आहेत. परंतु आजच्याच जगात एक देश असाही आहे की ज्याने अन्नपुरवठ्याच्याबाबतीत स्वयंपूर्णता प्राप्त केलेली आहे. तो देश म्हणजे दक्षिण अमेरिकेतील गयाना. या देशाचे वैशिष्ट्यच हे आहे की त्याच्या गरजेचे असणारे सर्व प्रकारचे अन्न त्या देशातच उत्पादन केले जाते. जगविख्यात अशा 'नेचर' या नियतकालिकाने अलीकडेच अन्नस्वयंपूर्णतेच्या–बाबतीत एक अभ्यास केला आहे. १८६ देशांचा समावेश या अभ्यासात केलेला आहे. गयाना हा देश अन्नाच्याबाबतीत कुणावरही अवलंबून नाही, हे वास्तव त्या अभ्यासाद्वारे पुढ्यात अवतरलेले आहे. अन्नधान्याची गयानाची गरज १०० टक्के देशातल्या देशातच भागविली जाते. स्वयंपूर्णतेचा हा टप्पा सर करणारा गयाना हा जगातील एकमात्र देश ठरला आहे. तांदूळ, मका, गहू यासारखी तृणधान्ये, कडधान्ये, फळे आणि भाज्या, दूध आणि दुग्धजन्य पदार्थ, मांस, मासळी आणि तेलबिया अशा महत्त्वाच्या सातही विभागांमध्ये या देशाला स्वयंपूर्णता प्राप्त करता आलेली आहे. विशेष म्हणजे, अमेरिकेसारखी महासत्तासुद्धा उपरोक्त सातपैकी केवळ चारच विभागांमध्ये स्वयंपूर्ण आहे. त्या पाठोपाठ चीन सहा विभागांत तर ब्रिटन केवळ दोनच गटांमध्ये हे यश पदरात पाडून घेऊ शकल्याचे वास्तव हा अभ्यास प्रगट करतो. या पार्श्वभूमीवर गयानाचे यश महत्त्वपूर्ण आणि उल्लेखनीय ठरते.

दक्षिण अमेरिकेच्या कॅरेबियन किनाऱ्यांवर वसलेले गयाना हे एक छोटेसे राष्ट्र. या देशाची आजची लोकसंख्या आहे आठ लाख. गयानाचे भौगोलिक क्षेत्रफळ २ लाख १४ हजार चौरस किलोमीटर इतके आहे. या देशाच्या सीमा ब्राझील, व्हेनेझुएला आदी देशांना लागून आहे. निसर्गाच्या अनुकूलतेची साथ लाभलेल्या गयानाने कृषीविकासाची उचित अशी धोरणे अंगीकारत हे यश संपादन केलेले आहे. हे यश

गयानाला एका दिवसात मिळालेले नाही. त्यासाठी गयानाने अनेक वर्षांपासून अगदी नियोजनबद्ध असे प्रयत्न केलेले आहेत. अन्नधान्याच्या संदर्भात स्वयंपूर्णता साध्य करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून तेथील सरकारने कृषी क्षेत्रामधील खर्चात धीम्या गतीने परंतु जवळपास पाच पट वाढ अलीकडील काही वर्षांत घडवून आणली. तांदूळ आणि साखर या पारंपरिक पिकांच्या जोडीनेच मका, सोयाबीन यांच्या उत्पादनासह आणि दुग्धव्यवसायालाही प्रोत्साहन दिले. मात्र केवळ उत्पादन वाढवून भागणार नाही तर, उत्पादनवाढ सातत्यशील राहावी यासाठी एक सुनियोजित व्यवस्था उभी करणे गरजेचे आहे हे लक्षात घेऊन सिंचनव्यवस्था, शेतकरी प्रशिक्षण, रस्ते व दळणवळण सुविधा आणि साठवण क्षमतेचा विकास करण्यावरही गयानाने त्याच्या कृषीविकासविषयक धोरणांमध्ये भर दिला.

**भात लागवडीवर लक्ष**

गयानाचा सुमारे ९० टक्के भूभाग वनांनी व्यापलेला असला तरी किनारपट्टीवरील सुपीक गाळयुक्त मैदाने शेतीसाठी अत्यंत उपयुक्त आहेत. Demerara, Essequibo, Berbice या नद्यांच्या त्रिभुज प्रदेशात मोठ्या प्रमाणावर भात आणि ऊस लागवड होते. गुलामगिरीच्या पर्वादरम्यान भारतातून तिथे नेण्यात आलेल्या मजुरांच्या श्रमांद्वारे तिथे भातशेतीचा प्रसार झाला. आज गयानातील लोकसंख्येचा मोठा हिस्सा भारतीय वंशाचा आहे आणि भात हे त्या देशातील प्रमुख अन्नधान्य आहे. अन्नस्वयंपूर्णतेच्या दिशेने वाटचाल करताना गयानाने सर्वप्रथम भाताच्या उत्पादनात मोठी झेप घेतली. कृषी मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, देशांतर्गत गरजा पूर्ण केल्यानंतरही गयानामधून दरवर्षी लाखो टन भात निर्यात केला जातो. आजच्या घडीला, 'भाताचा प्रमुख पुरवठादार' अशी उभ्या कॅरिबियन समुदायातील देशांमध्ये गयानाची ओळख प्रस्थापित झालेली आहे. भाताच्या उत्पादनामध्ये २०१९ नंतर तिथे सातत्याने वाढ होत असून सिंचनव्यवस्था, सुधारित बी-बियाणे, आणि यांत्रिकीकरण यामुळे भाताची दर एकक उत्पादकतादेखील वाढलेली आहे. Essequib, DeeefCe, Berbice या नद्यांच्या खोरे-प्रदेशातील शेतकऱ्यांनी जलनियोजन तंत्रज्ञानाचा प्रभावी अवलंब केल्यामुळे एकीकडे पूरस्थितीवर नियंत्रण प्रस्थापित करत असतानाच भाताचे उत्पादनदेखील स्थिर राखलेले आहे.

**ऊस आणि साखर उद्योग**

ऐतिहासिकदृष्ट्या पाहता, प्रथम डच आणि त्या नंतर ब्रिटिश वसाहतवादाच्या काळात गयानाने साखर उद्योगावर लक्ष केंद्रीत करत त्या दिशेने शेतीची पायाभरणी

केली. भाताप्रमाणेच गयानाच्या कृषी अर्थव्यवस्थेचा ऊस आणि साखर उद्योग हादेखील कणा गणला जातो. साखरेच्या जागतिक बाजारातील चढउतारांमुळे प्रसंगी अडचणी आल्या, तरीदेखील साखरेची देशांतर्गत गरज भागविण्याइतके उत्पादन कायम राखण्यात या देशाला नेहमीच यश आले आहे. तसेच भाजीपाला, डाळी, कंदमुळे आणि फळे यांच्या उत्पादनातही लक्षणीय वाढ झाली आहे. पूर्वी काही प्रकारच्या भाज्या आणि प्रक्रिया केलेले अन्न आयात करावे लागत होते; मात्र स्थानिक उत्पादन वाढवून आयातीवरील अवलंबन कमी करण्याचा प्रयत्न गयानामध्ये जाणीवपूर्वक करण्यात आला.

**मासेमारी आणि पशुपालन**

गयानाच्या लेखी अन्नस्वयंपूर्णतेसाठी मासेमारी आणि पशुपालन हे महत्त्वाचे विभाग होते. त्यावरही विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावरील सागरी संसाधनांचा योग्य व कल्पक वापर करून मासे आणि कोळंबी यांच्या उत्पादनात वाढ करण्यात आली. २०२३ सालामध्ये सागरी मासेमारीत आधीच्या वर्षाच्या तुलनेत जवळपास ३८ टक्के वाढ झाली आणि एकूण उत्पादन ३६ हजार ३९६ मेट्रिक टन इतके झाले. मासेमारी उद्योगातून ५४ दशलक्ष अमेरिकी डॉलर्स इतके उत्पन्न मिळाले. त्याच्या जोडीला मत्स्यपालनाच्या व्यवसायानेही गती घेतली. या माध्यमातून गयानाने निर्यातीवरही विशेष लक्ष दिले आहे. परिणामी, निर्यातीद्वारेही परकीय चलन गयानाला मिळते. कुक्कुटपालन, वराहपालन आणि गोपालन क्षेत्रात सुधारित प्रजातींचा वापर करून मांस आणि दुग्धोत्पादनातही वाढ करण्यात गयानाला यश आले आहे. वेळोवेळी लसीकरण आणि पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिल्यामुळे या क्षेत्रातही चांगली प्रगती करणे या देशाला शक्य बनले.

**तेलसंपत्तीचा हातभार**

अलीकडील काळात गयानाच्या अर्थव्यवस्थेला मोठा आधार लाभला तो तेलसंपत्तीच्या शोधामुळे. २०१५ सालानंतर किनारपट्टीजवळ मोठ्या प्रमाणावर गयानाला तेलसाठे सापडले आणि २०२०सालापासून व्यावसायिक तत्त्वांवर तेलाचे उत्पादन तिथे सुरू झाले. तेलउद्योगामुळे देशाचे सकल राष्ट्रीय उत्पादन झपाट्याने वाढले. मात्र, सरकारने केवळ तेलावर अवलंबून न राहता कृषी क्षेत्रात गुंतवणूक वाढविण्याचा निर्णय घेतला. 'फूड सिक्युरिटी अँड न्यूट्रिशन स्ट्रॅटेजी – २०२२–२०३०' या राष्ट्रीय धोरणांतर्गत स्थानिक अन्नउत्पादन वाढवणे, हवामान बदलाशी

जुळवून घेणे आणि लहान शेतकऱ्यांचे सक्षमीकरण साध्य करणे यावर तिथे आता भर देण्यात आला आहे.

**नियोजनबद्ध स्वयंपूर्णता**

स्वयंपूर्णता साध्य करण्यासाठी गरजेचे असलेले नियोजन मात्र गयानाने अतिशय काळजीपूर्वक केले. गयाना हा कॅरेबियन देशांच्या समुदायाचा सदस्य देश आहे. त्या देशसमुदायाचे अध्यक्षपद २०२२ सालामध्ये गयानाने भूषविले. कॅरेबियन प्रदेशातील अन्नधान्याची आयात २५ टक्क्यांनी कमी करण्याचा संकल्प या देशाने केला व त्या दिशेने महत्त्वाची भूमिका बजावली. सुपीक जमीन असलेल्या आणि जलसंपत्ती विपुल प्रमाणात लाभलेल्या या देशाचा तो निर्धार महत्त्वाचा ठरला. स्वयंपूर्णतेकडे प्रवास करण्याचे कालबद्ध नियोजन करून गयानाने शेजारील देशांबरोबर सहकार्य वाढवत तांदूळ, मका, सोयाबीन आणि पशुखाद्य उत्पादन चांगल्या रीतीने वाढवता येईल अशी सगळी आखणी केली व राबविली.

**सर्वांत मोठे आव्हान**

गयानाचा बहुतेक किनारी भाग समुद्रसपाटीखाली किंवा समुद्रसपाटीला समकक्ष असल्याने पूर आणि चक्रीवादळांचा धोका तिथे कायम असतो. हवामान बदल हा गयानाच्या जणू पाचवीलाच पुजलेला आहे. त्या संभाव्य संकटांचा फटका बसू नये यासाठी आवश्यक त्या ठिकाणी सागरी बांध बांधण्याचे लक्ष्य गयानाने निर्धारित केले, पंपिंग स्टेशने उभी केली आणि कालव्यांचे जाळेदेखील मजबूत बनविले. शेतीच्या पद्धतीमध्ये आवश्यक असणारे सगळे बदल केले. जलसंधारण आणि पर्जन्य व्यवस्थापन साध्य करणाऱ्या उपाययोजनांची जोड या सगळ्याला पुरविली. कृषी संशोधन संस्थांमार्फत संशोधनावर विशेष लक्ष गयानाने केंद्रित केलेले असून सुधारित आणि हवामानबदल-प्रतिरोधक बियाण्यांचा विकास आता तिथे करण्यात येतो आहे.

**रोजगारनिर्मितीला हातभार**

अन्नधान्याच्याबाबतीत स्वयंपूर्णता संपादन करण्याच्या दिशेन उचललेल्या या पावलांचा तिथे घडून येत असलेला सामाजिक परिणामदेखील लक्षणीय असाच आहे. या संदर्भातील विविध उपाययोजनांद्वारे गयानाच्या ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती झाली असून त्यांमुळे स्थलांतराचा वेगही काही प्रमाणात कमी झाला आहे. महिलांच्या स्वयं-साहाय्य गटांच्या सक्रियतेद्वारे भाजीपाला उत्पादन आणि प्रक्रिया उद्योग वाढीस

लागले आहेत. शालेय पोषण कार्यक्रमांसाठी स्थानिक अन्नधान्याचा वापर वाढविल्याने बालपोषण सुधारले आहे.

**अन्य आव्हाने**

अन्नधान्याच्याबाबतीत गयानाने स्वयंपूर्णता प्राप्त केलेली असली तरी अद्याप काही आव्हाने तिथे कायम आहेतच. कृषी क्षेत्रात पायाभूत सुविधांची कमतरता, बाजारपेठेतील अस्थिरता आणि कृषीमालाच्या जागतिक बाजारपेठेत बाजारभावांमध्ये घडून येणारे चढउतार यांचा प्रतिकूल परिणाम शेतकऱ्यांवर होतो. तसेच, तेलउद्योगाच्या वाढत्या प्रभावामुळे कृषी क्षेत्राकडे दुर्लक्ष होऊ शकेल आणि आज जे यश प्राप्त झालेले आहे त्याला आच लागेल, अशी चिंता जाणकारांकडून व्यक्त केली जाते आहे. त्यामुळेच या पार्श्वभूमीवर कृषी-आधारित विविधीकरण आणि शेतमालाचे मूल्यवर्धन घडवून आणणाऱ्या उद्योगांना चालना देण्याचे धोरण आता गयानामध्ये साकारण्यात येते आहे.

पूर्वापारच भात आणि साखर उत्पादनाच्या आधारावर उभ्या असलेल्या अर्थव्यवस्थेला आधुनिक तंत्रज्ञान, सिंचन व्यवस्था, प्रादेशिक सहकार्य आणि सुस्पष्ट दृष्टीने केलेल्या धोरणात्मक गुंतवणुकीच्या मदतीने अधिक मजबूत करण्यात गयानाने यश संपादन केलेले आहे. देशांतर्गत अन्नगरजा पूर्ण करत असतानाच अन्नधान्यघटकांचा निर्यातक्षम अधिशेष (surplus) निर्माण करण्याची क्षमता गयानाने आता हस्तगत केलेली आहे. हवामान बदलासारख्या आव्हानांवर मात करत, शाश्वत शेती आणि प्रादेशिक अन्नसुरक्षा या उद्दिष्टांकडे वाटचाल करणारा गयाना हा देश आजच्या घडीला विकसनशील देशांसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरावा.

# जिकडे-तिकडे

## दोन कोटी ससे आणि चिनी प्रयोग

झपाट्याने वाळवंटीकरण होण्याच्या गंभीर संकटाचा मुकाबला आज उभे जग करते आहे. अविरत होणारी वृक्षतोड, गवताळ प्रदेशांचा ऱ्हास, मातीतील सेंद्रिय कर्बोदकांचा विनाश आणि पाणी व अन्नधान्याच्या टंचाईमध्ये या सगळ्याची घडून येणारी अपरिहार्य परिणती, हे चित्र आता केवळ एखाद्या विशिष्ट भूभागापुरते मर्यादित राहिलेले नसून ते सार्वत्रिक बनते आहे. भारतासह अनेकानेक देशांना त्याचा सामना करावा लागतो आहे.चीनसारख्या विशाल देशालाही या समस्येचा सामना करावा लागला. मात्र, या संकटावर उपाय शोधण्याचा असा प्रयत्न चीनने केला की ज्याचा कदाचित कुणी पूर्वी कधी विचारसुद्धा केला नसेल. कोणत्याही समस्येबाबत उपाययोजना करीत असताना त्या उपायाचे होणारे दूरगामी परिणाम सकारात्मक राहतील आणि त्याबरोबरच पर्यावरणाचाही समतोल राखला जाईल याचे भान राखले जाणे आवश्यक ठरते. त्यामुळेच वेगाने विस्तारणाऱ्या वाळवंटीकरणाच्या समस्येबाबत तोडगा शोधत असताना चीनने विविध पर्यायांचा प्रथम सखोल अभ्यास केला. हवामानात घडून येत असलेले बदल, मातीच्या पोतात होत असलेला फरक अशा विविध बाबींसंदर्भात भूस्तरतज्ज्ञ, पर्यावरणतज्ज्ञ, निसर्गाभ्यासक अशा विविध परंतु परस्परांशी संलग्न क्षेत्रांतील अभ्यासकांचा एक गट त्या विषयी अभ्यास करण्यासाठी मग नियुक्त केला गेला.त्या सगळ्या मंथनातून एक अफलातून असा मार्ग पुढ्यात अवतरला. वाळवंटीकरण विस्तारत असलेल्या प्रदेशात सशांसाठी अधिवास निर्माण करण्याचा एक आगळावेगळा तोडगा त्या समस्येवर सुचविला गेला आणि चीनने चक्क त्या पर्यायाची अंमलबजावणी सुरूदेखील केली!

जगातील यशस्वी आणि आगळ्यावेगळ्या प्रयोगांपैकी एक प्रयोग म्हणून याकडे पाहिले जाते आहे. चीनमधील Kubuqi हे जगातील सातवे सर्वांत मोठे वाळवंट आहे. हे वाळवंट मंगोलियाच्या प्रदेशात असून १८ हजार ४०० चौरस फूट क्षेत्रफळात

ते पसरलेले आहे. या भागात पूर्वी गवताळ प्रदेश होता. भटक्या मंगोल जमाती येथे पशुपालन करीत असत. कालांतराने, हवामानबदल, अति-चराई, जंगलतोड यामुळे येथील भूमी हळूहळू वाळवंटीकरणाकडे झुकत गेली. अतिरिक्त प्रमाणात केलेली शेती आणि लोकसंख्येत होत गेलेली वाढ यामुळे जमिनीचा पोत खराब होत गेला. कालांतराने हा प्रदेश मृत वाळवंट म्हणून ओळखला जाऊ लागला. या वाळवंटात अनेकदा वाळूची वादळे येत असत. शेजारीच असलेल्या चीनमधील बीजिंगसारख्या शहरांवरही त्याचा परिणाम होत असे. १९८० सालापर्यंत या वाळवंटामुळे सर्वच पातळ्यांवर फक्त नुकसान होत होते. अखेर, १९९० सालानंतर मात्र चीनने या समस्येवर तोडगा शोधायचे ठरवले.

त्या दिशेने प्रयत्नशील होताना चीन सरकारने खासगी कंपन्यांना सोबतीला घेतले आणि वृक्षलागवडीचे तसेच पर्यावरणीय संगोपनाचे अन्य प्रकल्पही सुरू केले. ELION Resources Group या कंपनीने Kubuqi वाळवंटात मोठ्या प्रमाणावर झाडे लावण्याची मोहिम हाती घेतली. तसेच, वाळू स्थिर करण्यासाठी Straw Checkerboard Method हे विशेष तंत्रज्ञान वापरण्यात आले. तसेच त्या परिसरात भव्य असे सौरऊर्जा प्रकल्पही उभारण्यात आले. त्यामुळे पर्यावरणपूरक विकासाला भवताली चालना मिळाली. तरीसुद्धा वाळवंटीकरणाची प्रक्रिया चालूच राहिली. ती समस्या हटण्याचे नाव काही घेईना. या वाळवंटीकरणामुळे दरवर्षी पाच लाख एकर इतके सुपीक क्षेत्र नापीक बनत चाललेले होते. तिथून आसमंतात उडणाऱ्या वाळू आणि धुळीमुळे गावेच्यागावे ओसाड होत होती. वाऱ्याचा वेग इतका मोठा असे की, त्यामुळे वाळू उडून कित्येक किलोमीटर अंतरावर जाऊन पसरत असे. हे केवळ पर्यावरणावरचेच नव्हे तर, त्या भागात वास करणाऱ्या मोठ्या आकारमानाच्या चिनी लोकवस्तीला हानीकारक ठरणारे असेच संकट होते. त्यामुळे त्यांवर परिणामकरक अशी उपाययोजना तातडीने शोधणे ही चीनची निकड होऊन बसली.

त्या समस्येचा निपटारा करण्यासाठी चीनने अनेक प्रयत्न करून बघितले. त्यांतील अनेक प्रयोगांत अपयशसुद्धा आले. १९५०-६० च्या दशकामध्ये चीनने त्या परिसरात प्रतिबंधात्मक असे अनेक प्रकल्प सुरू केले.या भागांत Sand Control Stations चीनने उभी केली. मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवडसुद्धा करून पाहिली. वाळवंटात कृत्रिम अडथळे तयार करून पाहिले. पण वाळवंटीकरणाच्या विस्ताराची समस्या 'जैसे थे' राहिली. वाळूमुळे झाडे जगत नव्हती. अनेक प्रयोग फसत होते. या सगळ्या पार्श्वभूमीवर एक अफलातून कल्पना पुढे आणली. तिचा उद्भव झाला तो

Wang Wenbiao या एका चिनी गृहस्थाच्या कल्पकतेद्वारे. Wang Wenbiao हे चीनमधील हे एक पर्यावरणसुधारक आणि उद्योगपती. ते रुढार्थाने वैज्ञानिक किंवा संशोधक नव्हते. पण त्यांच्याकडे शोधक दृष्टी मात्र होती. विस्तारणाऱ्या वाळवंटीकरणाला पायबंद घालण्याचा आटोकाट प्रयत्न आतापर्यंत आपण केला; आता वाळवंटीकरण आपली पाठ सोडणारच नसेल तर इथून पुढे आपण वाळवंटासोबत जगायचा प्रयत्न आता करू, अशी भूमिका त्यांनी पहिल्यांदा मांडली आणि त्यातून जन्माला आला एक अभिनव प्रयोग!

अफाट बुद्धी चालवून Wang Wenbiao यांनी वाळवंटात Straw Chekerboard अर्थात झुडुपांची चौकोनी लागवड करण्याची पद्धत सुरू केली. काही वनस्पतींची सुकी झुडुपे चौकोनी आकारात जमिनीत लावायला त्यांनी सुरुवात केली. हा एक विलक्षण प्रयोग ठरला. कारण त्याच्यामुळे अनेक फायदे होताना दिसू लागले. या प्रकारच्या रोपांमुळे वाळू उडण्याचे प्रमाण कमी झाले. जमिनीतील ओलावा टिकून राहू लागला. त्यांच्या जोडीलाच आणखी एका विशेष वनस्पतीची लागवड वाळवंटात अन्य झाडांच्या जोडीनेच केली गेली. त्या वनस्पतीचे नाव होते Willow/Desert Shrub. निसर्गाचा 'सुपरहीरो' गणले जाणारे वाळूचे झाड, हा त्याचा अर्थ! या वनस्पतीचे वैशिष्ट्य म्हणजे ती पाण्याशिवायसुद्धा जगू शकते. या वनस्पतीची मुळे जमिनीत तब्बल ३०० फूट खोल जातात. ती मग वाळू घट्ट धरून ठेवतात. कागद आणि फर्निचर निर्मितीसाठीसुद्धा या झाडांचा उपयोग होतो. मात्र या झाडांच्याबाबतीत एकच काळजी घ्यावी लागते आणि ती म्हणजे त्या झाडाच्या फांद्या वेळच्या वेळी कापाव्या लागतात. अन्यथा, अस्ताव्यस्त वाढणाऱ्या फांद्या मूळ झाडच कमकुवत बनवतात. वेळेवर फांद्या छाटण्याचे काम माणसांवर सोपवणे अधिक खर्चिक व अधिक मेहनतीचे ठरते. तसे करणे व्यवहार्य नाही हे लक्षात आल्यानंतर त्याला काय पर्याय असू शकतो याचा विचार सुरू झाला आणि कुणाच्याही डोक्यात सहजासहजी येणार नाही अशा एका अफलातून कल्पनेचा जन्म झाला.

या प्रकल्पात जीव ओतून झटत असलेले Wang Wenbiao या किमयागाराने एक आगळीवेगळी शक्कल लढविण्याचे निश्चित केले. त्यांनी त्या वाळवंटात हजारो ससे सोडले. संपूर्ण वालुकामय अशा त्या भागात अक्षरश: हजारोंच्या संख्येने आणून सोडले जाणारे ससे पाहून अनेकांनी Wang Wenbiao यांना वेड्यात काढले. त्यांची ती कल्पना हास्यास्पद ठरवली गेली. तिची कुचेष्टादेखील लोकांनी मनमुराद केली. पण Wang Wenbiao हार मानायला तयार नव्हते. त्या विशिष्ट वनस्पतीच्या लागवडीद्वारे वाळवंटीकरण रोखायचे तर त्यांवर त्या भागात ससेपालन हाच प्रभावी

उतारा ठरतो, असा त्यांचा ठाम विश्वास होता. लागवडीनंतर त्या वनस्पतीच्या वाढणाऱ्या फांद्या सशांनी खायला सुरुवात केली. त्यामुळे त्या कामासाठी माणसे न नेमताच ते काम सशांकडून आपसूकच होऊ लागले. सशांनी फांद्या फस्त करण्याचा तडाखा लावल्याने झाडांचे मुख्य खोड अधिक मजबूत होऊ लागले आणि दुसरीकडे सशांच्या आहाराचा प्रश्नही निकालात निघाला. सशांच्या विष्ठेतून झाडांना लागणारे पोषक खतही मिळू लागले. या जगावेगळ्या प्रयोगाला यश येऊ लागले. परिणामी, वाळवंटीकरण हळूहळू कमी होत असल्याचे आशादायक चित्र यथावकाश दिसू लागले. या प्रयोगातील यश लक्षात घेऊन Wang Wenbiao इथेच थांबले नाहीत. त्यांनी आसपासच्या भागातील मोठ्या टेकड्या सपाट करून घेतल्या आणि तिथे हा अभिनव प्रयोग राबविणे चालू केले. लाखो झाडे तिथे लावली. ही झाडे चांगली जगू लागल्यानंतर विस्थापित झालेले अनेक लोक पुन्हा या भागांत येऊन राहू लागले. चिनी सरकारनेही या प्रयोगात लक्ष घातले. प्रत्येक कुटुंबाला सांभाळण्यासाठी ससे दिले. त्यामुळे त्या परिसरातील प्रत्येक घर जणू एक 'फार्महाउस'च बनले.

आजमितीला हा प्रयोग इतका यशस्वी ठरला आहे की, एकूण १८ हजार ६०० चौरस किलोमीटर क्षेत्रापैकी ३३ टक्के भाग आता हिरवागार झाला आहे. या प्रयोगात सहभागी झालेल्या शेतकऱ्यांना दर महिन्याचे निश्चित उत्पन्न त्यांतून सुरू झाले. त्याच्याच जोडीने, सरकारने सौरऊर्जा व तिच्यावर आधारित उपक्रमांनाही पाठबळ दिले आणि शेतकऱ्यांना उत्पन्नाचे आणखी एक साधन मिळवून दिले. त्यामुळे या अभिनव प्रयोगातून हजारो लोकांना नव्याने रोजगारही प्राप्त झाला. Wang Wenbiao यांच्या या प्रयोगाचे आजमितीला जगभरात कौतुक होते आहे. Eco-Economic Revolution म्हणून हा प्रयोग सगळीकडे वाखाणला गेला आहे. निसर्गावर विजय मिळवण्याचा आटापिटा करू नका तर, निसर्गासोबत जगण्याचा प्रयत्न करा, असा संदेश त्यातून सर्वांनाच मिळाला आहे.

Kubuqi वाळवंटात राबवलेला हा प्रयोग 'वाळवंट ते हिरवळ' या यशस्वी परिवर्तनाचे उत्तम उदाहरण मानले जाते. चीनने पर्यावरणीय संतुलन सुधारण्यासाठी आणि वाळवंटात हिरवळ आणण्यासाठी या सशांचा वापर 'नॅचरल इंजिनिअर' म्हणून केला आहे. चीनने असाच प्रयोग Dalai Bner Desert वाळवंटात केला. तिथे 'फ्रेंच हेक्स' या प्रजातीचे सुमारे १२ लाख ससे सोडण्यात आले. पर्यावरणीय व्यवस्थापनाबाबत प्रामाणिक आस्था, सरकारी धोरणे आणि खाजगी सहभाग हे सारे एकत्र आल्यावर व्यवहारात कसे प्रभावी बदल घडू शकतात याचे हे बोलके उदाहरण ठरले आहे.

विशेष लेख

# सिंहावलोकन

## २१ वे शतक

## पंचविशीतून पन्नाशीकडे सरकताना...

वयाच्या पंचविशीचा टप्पा पार करत असलेल्या २१व्या शतकाचे पहिले पाव शतक प्रचंड घटनामय शाबीत झाले, ही बाब कोणीही अमान्य करू शकणार नाही. लष्करी, राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा सगळ्यांच क्षेत्रांत सन २००० ते २०२५ या २५ वर्षांत अनेकानेक लक्षणीय घडामोडी साकारल्या. या घटना जिथे घडल्या त्या देशाच्या अथवा भूभागाच्याच केवळ नव्हे तर, उभ्या वैश्विक समुदायाच्याच जगण्याचा पोत पार आरपार बदलून टाकत भवतालाकडे बघण्याची त्याची दृष्टीच निर्णायकपणे बदलून टाकणाऱ्या घटितांचा गेल्या २५ वर्षांत आकार घेतलेल्या घटनामालिकेमध्ये अंतर्भाव राहिला. जगण्याची रीत अंतर्बाह्य पालटून टाकणाऱ्या घटनांची रेलचेल अनुभवणारी गेली अवघी अडीच दशके, अलीकडील ज्ञात इतिहासामध्ये तरी, एकमात्रच ठरावीत. अगदी संपूर्ण शतक जरी नाही, तरी गेल्या २५ वर्षांतील घटनाक्रम येत्या पाव शतकाचा तोंडवळा निश्चित करणारा ठरेल, यांबद्दल तरी वाद नाही. साधारणपणे २०५० सालातील जग कसे असेल अथवा कसे दिसेल याबाबतचे बरेचसे आडाखे इतिहासाचा भाग बनत असलेल्या गेल्या पाव शतकाने निश्चित केलेले आहेत, असे म्हणण्यास कोणताही प्रत्यवाय नसावा आणि नाहीदेखील! त्यांमुळे, सन २००० ते २०२५ या कालावधीदरम्यान जगाच्या रंगमंचावर सादर झालेल्या काही प्रयोगांद्वारे निष्पन्न झालेले नवीन प्रवाह, त्यांच्या मुळाशी गतिमान राहिलेल्या सूक्ष्मातिसूक्ष्म अंत:प्रवाहांसह, पुन्हा एकवार न्याहाळून, त्यांमधून नजीकच्या भविष्यात निपजणाऱ्या संभाव्य नवप्रवाहांचा काही एक आलेख चितारणे काळाच्या या टप्प्यावर उपयुक्त ठरावे.

परंतु, हा खटाटोप करत असताना, एखाद्या फळाचा एखादाच काप बाजूला काढावा तसा, सन २००० ते २०२५ या २५ वर्षांचा कालखंड अधांतरीच आपल्याला भिंगाखाली धरता येणार नाही. त्याला कारण अगदी सरळ व सोपे आहे. काळ

अखंड वाहतच असतो. वर्तमानकाळ हा भूतकाळाच्या खांद्यावर उभा असतो. त्यांमुळे, सरत्या पाव शतकाची वाटचाल न्याहाळत असतानाच, त्या काळातील अनेकानेक घटितांमागील कार्यकारणभाव नीटपणे उमजण्यासाठी आपल्याला डोकवून बघावे लागते ते सन २००० ज्याच्या कुशीतून जन्माला आले त्या सन १९९० ते १९९९ या दशकभराच्या कालखंडात. खरे म्हणजे, गेल्या पाव शतकादरम्यान जे सगळे नाट्यमय प्रसंग जगाच्या रंगमंचावर साकारले त्यांपैकी बहुतेकांची पाळेमुळे रुजलेली सापडतील ती, साधारणत:, १९७०चे दशक काळाच्या उदरात गडप होत असताना जे एक प्रगाढ स्थित्यंतर विश्वपटलावर अवतरले त्याच्या उदरात. त्यांमुळे, प्रथम सुरुवात करणे भाग आहे ती, त्या स्थित्यंतराचे रंगरूप आणि त्याची जडणघडण होण्यास कारणभूत ठरलेल्या घटकांचे रूपस्वरूप जाणून घेण्यापासून. त्यांमुळे, प्रारंभी आपल्याला नजरेखालून घालणे भाग आहे १९७०च्या दशकाचा उत्तरार्ध.

परंतु, त्याच्यासाठीदेखील आपल्याला मागे जावे लागते ते १९४०च्या दशकाच्या मध्यार्धापर्यंत. दुसरे महायुद्ध संपले १९४४ साली. त्या महासंगरामध्ये बेचिराख झालेल्या अथवा, अगदी बेचिराख जरी नाही तरी, भरपूर क्षती पोहोचलेल्या राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था सावरण्याचे आव्हान वैश्विक समुदायाच्या पुढ्यात मग साहजिकच उभे ठाकले. त्यासाठी आवश्यक होता मुबलक निधी. त्याची तरतूद करण्यासाठी जागतिक बँक (मूळ नाव – इंटरनॅशनल बँक फॉर रिकन्स्ट्रक्शन अॅन्ड डेव्हलपमेन्ट) आणि आंतरराष्ट्रीय नाणे निधी (इंटरनॅशनल मॉनिटरी फंड) या दोन वैश्विक सावकारांची मग निर्मिती करण्यात आली. युद्धाची झळ पोहोचलेल्या देशांच्या अर्थकारणाने कात टाकावी यासाठी अत्यावश्यक असणारा वित्तपुरवठा सौम्य व्याजदराने व सवलतींच्या अटीशर्तींनिशी कर्जरूपाने करण्याची जबाबदारी त्या दोन संस्थांकडे सोपविण्यात आली. परंतु, केवळ पैसा उभा राहिल्याने सगळे होत नसते. त्यासाठी तितक्याच सक्षम व्यवस्थापन व संघटन कौशल्याचीही गरज असते. ते पुरविण्याची क्षमता असणारी एकमात्र संस्था त्या वेळी देशोदेशी होती आणि ती म्हणजे शासनसंस्था. मुळात, अगदी विकसित देशांमध्येसुद्धा त्या काळात खासगी कॉर्पोरेट विश्वाचा पसारा आजच्याइतक्या कोठेच वाढलेला नव्हता. त्यांमुळे, अर्थकारणाच्या पुनर्उभारणीमध्ये शासनसंस्थेलाच मोठ्या भावाची भूमिका निभावणे क्रमप्राप्त होते व ठरेलदेखील तसेच.

व्यावहारिक स्तरावरील त्या अपरिहार्यतेला, त्याच काळात, सज्जड असे सैद्धान्तिक पाठबळही मिळत होते ते त्या आधी केवळ २७ वर्षेच काय ते, सोव्हिएत संघराज्याने

यशस्वीपणे राबविलेल्या सर्वंकष केंद्रीभूत नियोजनप्रधान विकासाच्या प्रारूपाद्वारे. मर्यादित मात्रेने उपलब्ध असणाऱ्या साधनसामग्रीचा विनियोग, बलवान अशा केंद्रीय सत्तेने आखलेल्या सर्वंकष नियोजनाच्या माध्यमातून, उत्पादक पद्धतीने घडवून आणत सातत्यशील विकास सक्षमपणे साकारता येतो, याचा वस्तुपाठ सोव्हिएत संघराज्याच्या रूपाने जागतिक समुदायाच्या पुढ्यात त्या काळात रोकड्या स्वरूपात होताच. या सगळ्याचा परिपाक म्हणजे, दुसऱ्या महायुद्धानंतर जगभरात सर्वत्रच, थोड्याफार फरकाने, प्रस्थापित झाले ते शासनसंस्थाप्रणित आर्थिक विकासाचे 'मॉडेल' (मॉडेल ऑफ स्टेट-लेड डेव्हलपमेन्ट). १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतानेही नियोजनप्रधान अर्थविकासाच्या प्रारूपाचा १९५० साली अंगीकार केला तेव्हादेखील तत्कालीन राजकीय धुरिणांच्या पुढ्यात आदर्श होता तो सोव्हिएत 'मॉडेल'चाच. फरक इतकाच की, अनादी काळापासून भारतीय व्यवस्थेत उद्योगव्यवसायांचे खासगी क्षेत्र सर्वदूर झिरपलेले असल्यामुळे समाजवादी विचारसरणीच्या पठडीबद्ध पुस्तकी अवताराचे एक 'डेरिवेटिव्ह' गणल्या जाणाऱ्या 'फेबियन समाजवादा'ची सैद्धान्तिक विचारचौकट विकासदृष्टी म्हणून इथे स्वीकारली गेली.

शासनसंस्थाप्रणित आर्थिक विकासाची विचारधारा, दुसऱ्या महायुद्धानंतर, या कार्यकारणभावाद्वारे जगभरात बहुतेक ठिकाणी प्रस्थापित बनली. तिची सद्दी पुढील सुमारे तीन दशके अबाधित राहिली. आर्थिक विकासविषयक सैद्धान्तिक भूमिकेचा लंबक शासनसंस्थाप्रणित विकास प्रारूपाच्या भोज्यापाशी पक्का स्थिरावलेला होता. यथावकाश, बिरबल आणि बादशहाच्या कथेतील तीन प्रश्नांची भावंडे शोभावीत असे अनेक प्रश्न त्या स्थितिशीलतेमधून निर्माण होऊ लागले. 'घोडा का अडला?, भाकरी का करपली?' आणि 'विड्याची पाने का सडली?', या, बादशहाने विचारलेल्या तीन प्रश्नांना, 'फिरवली नाही म्हणून...', हे जसे एकच उत्तर बिरबलाने दिले, तशातलीच काहीशी ती गत होती. शासनसंस्थाप्रणित केंद्रीभूत नियोजनप्रधान विकासप्रणालीत मुरलेल्या अक्षमता, त्रुटी, अकार्यक्षमता, अ-पर्याप्तता, अपव्यय प्रकर्षाने दृग्गोचर होऊ लागले. प्रशासकीय कार्यप्रणालीच्या वरचष्म्यापायी बलवत्तर बनणारा लाल फितीचा कारभार जलद व लवचीक निर्णयांची मागणी करणाऱ्या विकासप्रक्रियेचा दावेदार शाबीत होऊ लागला. त्यांतच, १९७३ साली पहिल्यांदा आणि १९७९ साली दुसऱ्यांदा तेल उत्पादक आणि निर्यातदार देशांच्या संघटनेने कच्च्या खनिज तेलाची एकतर्फी दरवाढ जारी केली आणि वैश्विक अर्थकारणाला, केवळ आठ वर्षांत, दोन जोरदार दणके बसले (ऑइल शॉक्स्). अनेक देशांमध्ये

त्याची झळ पोहोचली विकासाच्या सरासरी वार्षिक दराला. तेल तापल्याने सर्वसाधारण महागाईचा तेवर चढला. बेरोजगारीची कमान चढती भाजणी दर्शवू लागली... आणि, अर्थविकासासंदर्भात तिथवर सद्दी जारी असलेल्या धोरणदृष्टीबाबत मुळापासून फेरविचार होण्याची गरज देशोदेशी मूळ धरू लागली. शासनसंस्थाप्रणित विकासाच्या धोरणप्रणालीशी स्थिरावलेला धोरणविषयक दृष्टीचा लंबक त्याच भोज्यावर अधिक काळ स्थिरावू देणे हे कितपत हितकारक आहे, याबाबतची साशंकता तिथून हळूहळू सार्वत्रिक बनू लागली.

त्या लंबकाला निर्णायक धक्का लावला तो कम्युनिस्ट चीनने. ते वर्ष होते १९७८. हंगेरी, युगोस्लाव्हिया, चिली यांसारख्या काही देशांनी त्या संदर्भात चीनच्याही आधी पावले उचलायला सुरुवात केलेली होती. परंतु, लोकसंख्या आणि आकारमान अशा दोन्ही बाबतींत महाकाय असणाऱ्या देशात अर्थधोरणाच्या दिशेबाबतीत पुनर्विचाराचा उगम घडून येण्यात आघाडी घेतली ती चीनने. अर्थात, चीनलादेखील ते भान एका रात्रीत आलेले नव्हते. पुनर्विचाराच्या बीजाचे रोपण चिनी भूमीमध्ये घडवून आले ते, ‘परराष्ट्रविषयक मुत्सद्देगिरीच्या वैश्विक नकाशावरील कुटील चाणक्य’, अशी प्रतिमा गाजणाऱ्या हेन्री किसिंजर यांनी १९७१ सालातील जुलै महिन्यात चीनला दिलेल्या गुप्त भेटीद्वारे.

तो काळ होता अमेरिकेमध्ये रिचर्ड निक्सन यांच्या अध्यक्षीय कारकिर्दीचा. किसिंजर होते निक्सन यांचे परराष्ट्रमंत्री. १९७०च्या दशकाखेरीस ज्या पद्धतीचा वैश्विक सत्तातोल साकारत आलेला होता, त्यांत चीन कोठेच दिसत नव्हता व नसेही. माओ यांनी प्रवर्तित केलेल्या सांस्कृतिक क्रांतीच्या पर्वापासून चीन तसा वैश्विक समुदायापासून अलगच पडलेला होता. त्या निद्रिस्त ताकदीला जागे करून वैश्विक व्यवस्थेच्या मध्यप्रवाहात आणण्याची गरज निक्सन यांना पटवून दिली ती किसिंजर यांनी. निक्सन यांना ती पटली आणि त्यांच्या चीनभेटीची पूर्वचाचपणी करण्यासाठीच किसिंजर चिनी भूमीवर दाखल झाले १९७१ सालातील जुलै महिन्यात. चीनचे सर्वेसर्वा माओ झेडाँग आणि चौ एन् लाय यांच्याशी गाठीभेठी होऊन चर्चा झाल्यावर किसिंजर मायदेशी परतले आणि २१ फेब्रुवारी १९७२ या दिवशी रिचर्ड निक्सन चीनमध्ये दाखल झाले. त्या आधी तब्बल २० वर्षे एकही पाश्चिमात्य नेता चीनकडे फिरकलादेखील नव्हता! लंबकाला धक्का देण्याची नितांत निकड चीनला जाणवली ती निक्सन यांच्या त्या भेटीनंतर.

निक्सन यांची ती चीन भेट हा त्या देशाच्या दृष्टीने खरोखरच 'टर्निंग पॉइंट' ठरला. विज्ञान-तंत्रज्ञान, औद्योगिक प्रगती, अत्याधुनिक तंत्रशास्त्राचा उद्योगव्यवसायांतील वापर व उपयोजन, आर्थिक प्रगती अशा जवळपास सगळ्यांच बाबतीत पाश्चिमात्य जग आपल्या किती पुढे गेलेले आहे, याची तीव्र व बोचरी जाणीव चिनी धोरणकर्त्यांना निक्सन यांच्या त्या भेटीदरम्यान प्रकर्षाने झाली. चिनी नेतृत्वाचे जणू डोळेच खाडकन उघडले. जणू ससा आणि कासव यांची गोष्टच होती ती! ती दरी भरून काढायची तर 'फास्ट फॉरवर्ड' करण्याखेरीज गत्यंतर नाही, हे चीनला उमगले. चिनी उत्पादनव्यवस्थेचे आधुनिकिकरण साध्य करायचे तर अत्याधुनिक तंत्रशास्त्र हाताशी हवे, हे लक्षात आलेले चिनी धोरणकर्ते मग त्याच्या शोधाला लागले. ते सारे तंत्रशास्त्र होते पश्चिमी राष्ट्रांकडे. ते प्रगत तंत्रशास्त्र आपल्याला कोणीही सुखासुखी देणार नाही, हे हेरण्याइतपत चिनी धुरीण चाणाक्ष होते. ते विकत घ्यायचे म्हणले तर त्याला हवा बख्खळ पैसा. त्या टप्प्यावर चीनला जबर वानवा होती ती या दोन्ही बाबींची. त्यासाठी पश्चिमी कॉर्पोरेट विश्वाला चीनमध्ये आवतण देण्याखेरीज पर्याय नव्हता. चिनी राजवट होती कम्युनिस्ट पक्षाच्या एकतंत्री कारभाराच्या पोलादी मुठीत पकडबंद. तंत्रशास्त्रात प्रवीण असणारे पश्चिमी देश होते लोकशाहीप्रधान. आता, लोकशाही कारभाराला सरावलेले पश्चिमी उद्योग हुकुमशाही राजवटीमध्ये पाऊल का व कसे घालतील? कम्युनिस्ट पक्षाला तर त्याची पोलादी मूठ सैल करण्याची इच्छा अजिबातच नव्हती. मग, हा तिढा सोडवण्यासाठी चिनी राज्यकर्त्यांनी मध्यम मार्ग शोधला. 'विशेष आर्थिक क्षेत्रांची' निर्मिती (स्पेशल इकॉनॉमिक झोन्स - एस्ईझेड्स्) हा होता तो मध्यम पर्याय. चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या हुकुमशाही राजवटीत खुल्या कारभारासाठी काही बेटे तयार करणे, हा होता विशेष आर्थिक क्षेत्रांच्या निर्मितीमागील धोरणी विचार.

खुल्या व्यावसायिक पर्यावरणाचा परिपोष करणाऱ्या अशा त्या बेटांवर परदेशी उद्योगांसाठी खास निराळे असे व्यावहारिक पर्यावरण चीनने निर्माण केले. चिनी उद्योगांना लागू होणाऱ्या (जाचक) अटीशर्तींपासून 'विशेष आर्थिक क्षेत्र' म्हणून निर्देशित केलेल्या भूभागांवर कारभार उभारणाऱ्या उद्योगांना मुक्तता बहाल करण्यात आली. चिनी भूभाग, मुबलक आणि तुलनेने स्वस्त असणारे चिनी मनुष्यबळ आणि पश्चिमी प्रगत तंत्रशास्त्र व व्यवस्थापनप्रणाली यांच्या मिलाफाद्वारे विशेष आर्थिक क्षेत्रांमध्ये तयार केली जाणारी उत्पादने पश्चिमी बाजारपेठांमध्येच विकायची, असे, आर्थिक विकासाचे निर्यातप्रधान 'मॉडेल' चीनने १९७८ सालापासून पुढे मोठ्या मेहेनतीने साकारले. वैश्विक अर्थविश्वातील सामर्थ्यवान आर्थिक सत्ता म्हणून उदयाला

आलेल्या आजच्या बलशाली चीनच्या उत्क्रांतीचा १९७८ सालानंतरचा इतिहास हा असा आहे. या 'मॉडेल'चे चीनला मुख्यत: दोन लाभ झाले. एक म्हणजे, 'वस्तुनिर्माण उद्योगाचे जागतिक केंद्र' म्हणून चिनी अर्थव्यवस्था प्रस्थापित झाली. आणि दुसरे म्हणजे, निर्यातप्रधान अर्थविकासाच्या प्रारूपाचा अंगीकार केल्यामुळे चीनकडे परकीय भांडवलाची सज्जड गंगाजळी जमा झाली. आजमितीस, आंतरराष्ट्रीय चलन गणल्या जाणाऱ्या अमेरिकी डॉलर्सचा जगभरात सर्वाधिक साठा चीनकडे आहे. वस्तुनिर्माण उद्योगाचे वैश्विक केंद्र म्हणून आपले स्थान बळकट केल्यामुळे जागतिक स्तरांवरील पुरवठा साखळ्यांमध्ये (सप्लाय चेन्स) चीन आज अव्वल भिडू म्हणून गणला जातो. केवळ ग्राहकोपयोगी अशी उपभोग्य उत्पादनेच नव्हेत तर पोलाद, अनंत प्रकारची यंत्रसामग्री, संगणकांसाठी अनिवार्य असणाऱ्या 'चिप्स्'... अशांसारख्या उत्पादक घटकांच्या पुरवठा साखळ्यांमध्येही चीनचा वरचष्मा असल्याने, त्यांच्या पुरवठ्याच्या नाड्या आखडून उभ्या जागतिक समुदायाला आपण गुडघ्यावर आणू शकतो ही बाब, चीनने, आता परवापरवा दुर्मीळ खनिज घटकांची अमेरिकेला केली जाणारी निर्यात रोखून अधोरेखित केली.

हे चिनी उदाहरण जगाच्या नकाशावर उगवल्यानंतर, १९८०च्या दशकात जवळपास सर्वत्रच, शासनसंस्थाप्रणित आर्थिक विकासाच्या धोरणप्रणालीशी तिथवर खिळून राहिलेल्या लंबकाला धक्का देण्याची प्रक्रिया जगातील अनेक देशांमध्ये आकार घ्यावयास लागली. दक्षिण कोरिया, तैवान, सिंगापूर, मलेशिया, थायलंड, इंडोनेशिया यांसारख्या आशियाई देशांनी त्यांत आघाडी घेतली. दरम्यान न्यूझीलंड, ब्रिटन व अमेरिकेमध्येदेखील लंबक त्याच्या शासनसंस्थाप्रणित विकासधोरणाच्या भोज्यापासून स्थानभ्रष्ट होण्याची प्रक्रिया चालू झालेली होती. १९८०च्या दशकाचा मध्यबिंदू ओलांडल्यानंतर, त्या प्रक्रियेमध्ये दोन महाकाय भिडूंची भर पडली. त्यांतील एक म्हणजे भारत आणि दुसरा म्हणजे सोव्हिएत संघराज्य.

म्हणजेच, १९७०च्या दशकाचा उत्तरार्ध आणि १९८०चे संपूर्ण दशक हे ठरते आर्थिक पुनर्रचना पर्वाचे उदयपर्व. या पर्वाचेच बारसे 'रीफॉर्म्स् एरा' असे केले जाते. परंतु, 'रीफॉर्म्स्'पेक्षाही 'आर्थिक पुनर्रचना' हीच या स्थित्यंतराचे वर्णन तटस्थ नेमकेपणाने करणारी उचित शब्दप्रणाली होय. त्याला कारणही तसेच आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये 'शासनसंस्था' आणि 'बाजारपेठ' हे दोन मुख्य भागीदार होत. दुसऱ्या महायुद्धानंतरची जवळपास ३० वर्षे, जगात सर्वत्रच कमी-अधिक प्रमाणात, सद्दी चालली ती शासनसंस्थाप्रणित आर्थिक विकासाची. कारणपरत्वे,

१९८०च्या दशकादरम्यान त्या कार्यप्रणालीमध्ये बदल घडवून आणण्याची निकड बव्हंश अर्थव्यवस्थांना जाणवू लागल्याने पुनर्रचनेकडे प्रवास चालू झाला. अर्थविकासाच्या प्रक्रियेत आणि पर्यायाने अर्थकारणाच्या व्यवस्थापनात, तिथवर, शासनसंस्थेचा असलेला वरचष्मा क्रमाने घटवून, आर्थिक वाटचालीच्या प्रक्रियेत 'बाजारपेठ'नामक दुसऱ्या भिडूला अधिकाधिक सक्रिय सहभाग घेता यावा यासाठी सुधारित, बदललेली कार्यप्रणाली अवलंबण्याकडे देशोदेशी प्रवृत्ती वाढू लागली. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, अर्थविकासाच्या प्रक्रियेत 'शासनसंस्था' आणि 'बाजारपेठ' या दोन भागिदारांच्या तिथवर राहिलेल्या कार्यकक्षांचे पुनर्रेखांकन करण्यासाठी सर्वत्र पावले उचलली जाऊ लागली. ही प्रक्रिया स्वरूपत: अर्थकारणाच्या 'पुनर्रचने'ची होय. दुसरे म्हणजे, 'रीफॉर्म्स्' या संज्ञेला मराठीमध्ये 'सुधारणा' हा जो प्रतिशब्द सरसहा योजला जातो तो निखळ सकारात्मक अर्थवत्ता ल्यालेला असा आहे.

कोणत्याही एका व्यवस्थेच्या जागी लागू केल्या जाणाऱ्या दुसऱ्या व्यवस्थेची निष्पत्ती केवळ आणि केवळ उपकारक, लाभदायक आणि म्हणूनच सकारात्मक असेल, असा दावा कोणीच करू शकणार नाही आणि करूही नये. हेदेखील एक प्रकारचे समुद्रमंथनच! त्यांतून अमृत जसे निपजते तसेच विषही. पुन्हा, त्या घुसळणीमधून वर येणाऱ्या विषामृताची विभागणी संबंधित देशांमधील विविध समाजघटकांमध्ये कशा प्रकारे होते त्यांवर त्या पुनर्रचनेला मिळणाऱ्या प्रतिसादाचे रूप–स्वरूप निर्भर राहते. समाजातील सर्वच घटकांच्या मुखात विषामृत समसमान प्रमाणात पडेल याची हमी कधीच देता येत नाही. कारण, पुनर्रचनेच्या लाभालाभांचे वाटप त्या त्या समाजांतर्गत तिथवर नांदत आलेले सत्तासोपान, त्या व्यवस्थेत उपलब्ध असणाऱ्या साधनसामग्रीचे वाटप, उत्पादक साधनांवर विविध समाजघटकांचे नांदणारे नियंत्रण, तिथले संस्थात्मक जीवन, श्रमविभागणी... अशांसारख्या अनंत घटकांवर अवलंबून राहते. इथे सर्वांत कळीचा ठरणारा विषय म्हणजे प्रत्येकच समाजव्यवस्थेत आणि पर्यायाने अर्थव्यवस्थेत पूर्वापार नांदणाऱ्या बहुविध असमानतेचा. अर्थकारणाच्या पुनर्रचनेला हात घातल्यानंतर त्या प्रक्रियेची परिणती त्या त्या व्यवस्थेत रुजलेल्या असमानतेची तीव्रता घटविते की अधिक वाढवते त्यांवर सगळे अवलंबून राहते. किंबहुना, बाजारपेठेवर निर्भर अर्थविकासाच्या भोज्याकडे अर्थव्यवस्था सरकायला लागली की, बाजारपेठीय अर्थकारणाच्या गतिविधींद्वारे गतिमान बनणाऱ्या विकासप्रवाहाचे लाभार्थी बनण्याची क्षमता अंगी नसणाऱ्या समाजघटकांचे सक्षमीकरण घडवून आणणे, हे मग शासनसंस्थेचे मुख्य कर्तव्य शाबीत होते. अन्यथा, बाजारपेठीय

अर्थकारणाच्या फलनिष्पत्तीचे वाटप त्या त्या व्यवस्थेतील 'आहे रे' आणि 'नाही रे' वर्गांमध्ये विषम प्रकारे घडून येऊन पुनर्रचनेच्या तत्त्वज्ञानालाच तिथे कडवा विरोध उभा राहण्यास सुरुवात होते.

'आर्थिक सुधारणा' ही शब्दसंहती 'रीफॉर्म्स्' या संज्ञेची रास्त व यथार्थ पर्याय का ठरू शकत नाही, याचे गमक इथे गवसते. बाजारपेठेच्या गतिविधींनुसार प्रवाहित होणाऱ्या अर्थप्रगतीच्या प्रक्रियेपासून वंचित राहणाऱ्यांचे रूपांतर, उचित अशा सक्षमीकरणाद्वारे, लाभार्थींमध्ये घडवून आणण्यात शासनसंस्था पुरेशी परिणामकारक ठरली नाही तर, त्या पुनर्रचनेच्या फळांचे वाटप विषम पद्धतीने घडून येते. पुनर्रचनेचे लाभार्थी ठरणाऱ्या समाजघटकांना ते बदल 'सुधारणा' म्हणून स्वागतार्ह वाटतात; तर, पुनर्रचनेच्या लाभांपासून वंचित राहणाऱ्या समाजघटकांना ते बदल जणू 'शाप' भासू लागतात! १९८०सालानंतर 'रीफॉर्म्स्'ना हात घातलेल्या जगभरातील अनेक देशांमध्ये हेच चित्र दिसून आलेले आहे. परिणामी, 'रीफॉर्म्स'ना देशोदेशी मिळणारा प्रतिसाद हा एकसारखा अजिबात नाही. किंबहुना, एकाच देशातील विविध समाजघटकांचा निरनिराळ्या 'रीफॉर्म्स'ना निरनिराळ्या टप्प्यांवर निरनिराळा प्रतिसाद लाभत असल्याचे वास्तवही आजपर्यंत पुढ्यात अवतरलेले आहे. त्यामुळे, 'इकॉनॉमिक रीफॉर्म्स' या इंग्रजी संज्ञेची 'आर्थिक पुनर्रचना' ही अधिक रास्त, यथार्थ व तटस्थ अशी पर्यायी शब्दरचना ठरते.

आर्थिक पुनर्रचनेच्या प्रेरणेने १९८०च्या दशकापासून जगभरात जवळपास सर्वत्रच वेग घेतला. १९९१ हे वर्ष जरी भारतीय संदर्भात पुनर्रचना पर्वाचा आरंभबिंदू मानले जात असले तरी, अनेक अभ्यासकांच्या विश्लेषणानुसार, जनता पक्षाच्या अल्पकालीन सरकारच्या पतनानंतर १९८०साली इंदिरा गांधी पुन्हा एकवार सत्तेवर आल्यापासूनच आर्थिक विकासाच्या धोरणदिशेमध्ये स्थित्यंतराच्या पाउलखुणा दिसण्यास सुरुवात झालेली होती. 'गरिबी हटाव'सारख्या घोषणा आणि ग्रामीण विकासावरती तिथवर राहिलेला काँग्रेस पक्षाच्या आर्थिक धोरणांचा झोत, १९८०सालानंतर हळूहळू, त्या वेळी मोठ्या नगरा-महानगरांमध्ये नव्याने निर्माण होऊ लागलेल्या मध्यमवर्गाच्या आशाअपेक्षांची पूर्तता करण्याकडे वळायला लागलेला होता. त्या प्रक्रियेला, १९८५ साली सत्तेवर आलेल्या राजीव गांधी यांच्या नेतृत्त्वाखाली सरकारच्या कारकिर्दीत अधिक वेग आला. आणि, नरसिंहराव यांच्या धुरिणत्वाखाली १९९१ साली सत्तेवर आलेल्या आघाडी सरकारच्या अमदानीत त्या वेगाचे रूपांतर झपाट्यामध्ये घडून आले. परंतु, भारतीय आर्थिक पुनर्रचना पर्वाच्या वाट्याला आलेले भागधेय

जगभरातील ज्या मोठ्या देशांनी १९८०च्या दरम्यान आर्थिक पुनर्रचना पर्वाला हात घातला त्यांपैकी एकाही देशाच्या वाट्याला आलेले नाही. १९८९ सालापासूनच भारतीय राजकीय व्यवस्थेमध्ये एकपक्षीय सरकारांची सद्दी ओसरणीला लागत होती. केंद्रात तसेच राज्यांमध्येही युत्या-आघाड्यांची सरकारे राज्यशकट हाकत होती. एका अर्थाने, युत्या-आघाड्यांच्या सरकारांची कारकिर्द राजकीय व्यवस्थेमध्ये स्थिरावण्याद्वारे, आर्थिक पुनर्रचनेबरोबरच राजकीय पद्धतीच्या पुनर्रचनेचे पर्व भारतीय राजकारणात गतिमान बनू लागलेले होते. राजकीय आणि आर्थिक पुनर्रचना प्रक्रियेच्या हातात हात घालूनच, भारतामध्ये, त्या काळात तिसरे पुनर्रचना पर्व आकार घेत होते आणि ते म्हणजे सामाजिक व्यवस्थेच्या पुनर्रचनेचे. विश्वनाथप्रताप सिंग यांच्या सरकारने, मंडल आयोगाच्या अंमलबजावणीद्वारे अन्य मागासवर्गीयांसाठीच्या आरक्षणाची तरतूद व्यवहारात लागू करणे, हा ठरला त्या तिसऱ्या पुनर्रचनेचा आरंभबिंदू. १९८० म्हणा, १९८५ म्हणा अथवा १९९१ म्हणा, भारतीय व्यवस्थेमध्ये राजकीय, आर्थिक आणि सामाजिक अशा तीनही प्रांतांतील पुनर्रचनेचे पर्व तेव्हापासून आजतागायत गतिमान राहिलेले आहे. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या भारतीय अनुभवाचे तौलनिक विश्लेषण अन्य देशांनी राबविलेल्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमांच्या पार्श्वपटावर करत असताना या वास्तवाचे पुरेसे भान राखले जाणे गरजेचेच केवळ नव्हे तर, अगत्याचेदेखील ठरते.

दुसऱ्या महायुद्धापासून वैश्विक व्यवस्थेमध्ये स्थिरावलेल्या शासनसंस्थाप्रणित आर्थिक विकासाच्या प्रारूपाचा अंमल आणि आकर्षण १९७०च्या दशकापासून ओसरण्यास प्रारंभ हा असा झाला. अर्थविकासाच्या प्रक्रियेमध्ये शासनसंस्था आणि बाजारपेठ यांचे परस्परनाते नेमके कसे असले पाहिजे, या संदर्भातील कोणतेही सुविहित असे प्रारूप वा आकृतिबंध तेव्हापासून आजवर उत्क्रांत झालेला नाही. किंबहुना, आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या वाटचालीदरम्यान शासनसंस्था आणि बाजारपेठ या दोन संस्थांची सांगड सुसंवादी पद्धतीने न बसण्यामुळेच निर्माण झालेले अनेकानेक पेचप्रसंगच १९९०च्या दशकात प्रथम पृष्ठभागावर येऊ लागले. २००० सालानंतर, थोड्याफार फरकाने, त्याच पेचांना अन्य परिमाणे लाभत राहून त्यांचे रंगरूप अधिकच व्यामिश्र आणि म्हणूनच जटिल बनत राहिले. गेल्या पाव शतकाची वाटचाल निर्देश करते ती नेमक्या याच वस्तुस्थितीकडे. मुदलात आर्थिक विश्वात पाळेमुळे रुजलेल्या विविध आव्हानांना, प्रसंगवशात, राजकीय-सांस्कृतिक-सामाजिक-सामरिक अशी परिमाणे मग वेळोवेळी जोडली गेली. त्या सगळ्या

प्रक्रियेचेच, एक प्रकारे, पडसाद २००० ते २०२५ या विलक्षण घटनामय पाव शतकादरम्यान उमटत राहिले. या अर्थाने, १९७०च्या दशकाच्या उत्तरार्धात पायरव घडून आलेल्या अर्थव्यवस्थापना संदर्भातील एका अतिशय मूलभूत स्थित्यंतरामध्येच, २१व्या शतकाच्या पहिल्या पाव शतकातील घुसळणीची बीजे खोलवर रुजलेली होती, असे म्हणण्यावाचून प्रत्यवाय नाही. त्यांमुळे, १९९०चे संपूर्ण दशकही भिंगाखालून निरखणे क्रमप्राप्त ठरते.

मानवी जीवन स्वरूपत:च मुळात एकपदरी नसते. त्यांमुळे, जीवनाच्या एखाद्या अंगाची फेरमांडणी चालू झाली की, जीवनाच्या अन्य अंगांमध्ये तिचे पडसाद उमटून पुनर्मांडणीच्या प्रेरणांना तिथेदेखील भरती येते. १९८०चे दशक सरतासरता नेमके तसेच जागतिक रंगमंचावर घडले एकंदर तीन देशांमध्ये तीन प्रकारे. ते वर्ष होते १९८९. जर्मनी, सोव्हिएत संघराज्य आणि चीन अशा तीन देशांमध्ये तीन निर्णायक घटना त्या एकाच वर्षात साकारल्या. बर्लिनची भिंत जमीनदोस्त झाली, सोव्हिएत संघराज्याच्या विघटनाचा प्रारंभ झाला आणि बीजींगमधील तिआनमेन चौकात चिनी विद्यार्थ्यांनी आंदोलन पुकारले त्या एकाच वर्षात. अर्थकारणात घुमू लागलेल्या पुनर्रचनेच्या वाऱ्यांच्या राजकीय व्यवस्थेच्या प्रांगणात प्रवेशलेल्या लहरी, असेच या तीन घटनांचे वर्णन करणे सर्वार्थाने सार्थ ठरावे. अनुक्रमे पुनर्रचना आणि खुलेपणा यांचे ऐलान सोव्हिएत संघराज्याच्या बंदिस्त व्यवस्थेमध्ये करणाऱ्या 'पेरेस्त्रोइका' आणि 'ग्लासनोस्त' या दोन संकल्पनांची व्यवहारातील परिणती सोव्हिएत संघराज्याच्या विघटनाद्वारे जगाने अनुभवली. तर, १९७८ सालापासून नेटाने राबविलेल्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाला राजकीय खुलेपणाचीदेखील जोड लाभावी, अशी प्रेरणा मनीमानसी जागलेल्या चिनी नवमध्यमवर्गातील तरुणाईने प्रजासत्ताक राजवटीची मागणी करत बीजिंगमधील तिआनमेन चौकात धरणे धरले. तिसरीकडे, भांडवलशाही अर्थकारणाच्या पर्यायाचा स्वीकार करून अर्थविकासाच्याबाबतीत भरारी मारलेला पश्चिम जर्मनी आणि कम्युनिस्ट विचारसरणीला अनुसरणारी आर्थिक धोरणे अनुसरणारा पूर्व जर्मनी या दोहोंदरम्यानच्या एकंदर विकासातील रुंदावणारी दरी असह्य बनून, एकाच देशाची दोन शकले करणारी अशी, बर्लिन शहरात दुसऱ्या महायुद्धानंतर उभारली गेलेली भिंत उत्स्फूर्त लोकचळवळीद्वारे अगदी अवचितच जमीनदोस्त झाली.

अर्थकारणाच्या प्रांतातील पुनर्रचना पर्वाचे पडसाद समाजजीवनाच्या राजकीय प्रांगणातदेखील कसे उमटतात, त्याचे सघन दर्शन या तीन घटनांनी घडविले. आर्थिक

पुनर्रचना पर्वाची उण्यापुऱ्या दशकभराची वाटचाल पुरती होते न होते तोच राजकीय व्यवस्थेच्या पुनर्रचनेच्या मागण्यांनी तीन निरनिराळ्या देशांत तीन निरनिराळ्या पद्धतींनी उचल घ्यावी, ही बाब विलक्षण लक्षणीयच केवळ नव्हे तर, अभ्यसनीय ठरते. त्याच प्रेरणांचा आविष्कार पुढे जवळपास दोन दशकांनी जागतिक समुदायाने पुन्हा एकवार अनुभवला. आर्थिक व्यवहारांच्या धाग्यांनी परस्परांत गुंफण होत असलेल्या विलक्षण स्पर्धात्मक अर्थविश्वात समर्थपणे पाय रोवून उभे ठाकायचे तर, आर्थिक सामर्थ्य बुलंद बनवावयास हवे, याची जाणीव, याच दरम्यान सर्वत्र अंकुरू लागली. 'युरोपीय महासंघ'नामक (युरोपीय युनियन) व्यासपीठाने १९९३ साली अधिकृत आकार धारण करावा, हे त्याच जाणिवेचे द्योतक ठरते. तर, त्या नंतर सहा वर्षांनी, म्हणजे, १९९९ साली युरोपीय महासंघाने 'युरो' या सामाईक चलनाचा स्वीकार करून समुदायातील सदस्य देशांच्या पैसाधोरणांचीदेखील एकमेकांतील गुंफण सुसंवादी बनवण्याच्या दिशेने पुढील पाऊल उचलले. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खासगीकरण या तीन प्रक्रियांचा अंतर्भाव, अगदी ढोबळ मानाने, 'आर्थिक पुनर्रचना' कार्यक्रमामध्ये होतो अथवा केला जातो. देशोदेशींच्या बाजारपेठांची व्यापाराच्या माध्यमातून परस्परांशी घनिष्ठ गुंफण घडून येणे, हा 'जागतिकीकरण' या संकल्पनेचा सोपा व मूलभूत अर्थ. वस्तू व सेवा, तंत्रज्ञान, भांडवल, मनुष्यबळ, परकीय चलन अशांसारख्या बाजारपेठांची जागतिक स्तरावर एकमेकांतील गुंफण इथे अभिप्रेत आहे. अशी गुंफण सखोलपणे व सहजरीत्या घडून यावी यासाठी १ जानेवारी १९९५ या दिवशी एक अतिशय महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आणि ते म्हणजे 'जागतिक व्यापार संघटने'ची (वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन) स्थापना. परंतु, वैश्विक स्तरावर, काळाच्या ओघात पुढे, असे काही प्रवाह–अंत:प्रवाह गतिमान बनले की ही जागतिक व्यापार संघटना तिच्या स्थापनेनंतर अवघ्या तीन दशकांतच पुरती निष्प्रभच नव्हे तर अप्रस्तुतदेखील शाबीत झाली!

देशोदेशी अंमलबजावणी सुरू झालेल्या आर्थिक पुनर्रचना पर्वाच्या कुशीतून निपजलेला आर्थिक विकास चांगल्यापैकी दणकट होता. विकासाचा तो तेवर तसाच अबाधित राखायचा तर त्यासाठी सगळ्यांच देशांना ऊर्जासुरक्षेची निकड वाढत्या तीव्रतेने भासू लागली. कारण, आर्थिक विकासाची ती सारीच प्रक्रिया प्रचंड ऊर्जासघन अशीच होती व आहे. त्यांमुळे, ऊर्जास्रोतांवर नियंत्रण प्रस्थापित करण्याची निकड सगळ्यांच देशांना तीव्रतेने भासू लागली. कुवेतमध्ये इराकने केलेल्या घुसखोरीबद्दल त्याला दंड करण्याच्या निमित्ताने १९९० सालातील ऑगस्ट महिन्यात अमेरिकेने

अन्य देशांची आघाडी बांधून कुवेतमुक्तीसाठी जी लष्करी चढाई केली तिच्या रूपाने ऊर्जास्त्रोतांवरील नियंत्रणाची ती निकड आक्रमकपणे प्रगट झाली. पुढे दोन दशकांनंतर, ऊर्जासुरक्षेची तीच आघाडी बुलंद बनविण्यासाठी चीननेदेखील आक्रमक पावले उचलली परंतु त्यांचे स्वरूप लष्करी अथवा सामरिक नव्हते इतकेच. आखाती देशांमधील अशांततेचे तेव्हापासून चालू झालेले पर्व आजही अशांतीने धगधगतेच आहे. पुढे ३० वर्षांनंतरही त्याच आघाडीवर अमेरिकाच सक्रिय असल्याचे दृश्य जागतिक समुदायाने पुरते अनुभवले.

जागतिकीकरणाच्या आद्य पर्वादरम्यान, उत्पादन घटकांच्या प्रांतात, तुलनेने प्रथम व अधिक चल व गतिज बनले ते भांडवल. उदारीकरणाच्या प्रक्रियेद्वारे खुल्या झालेल्या अथवा होत असलेल्या बाजारपेठांचा लाभ उठविण्याच्या दृष्टीने सिंगापूर, हाँगकाँग, दक्षिण कोरिया आणि तैवान या चार आशियाई अर्थव्यवस्थांनी १९९०च्या दशकादरम्यान निर्यातप्रधान आर्थिक विकासाचे 'मॉडेल' हिरिरीने राबविले. या चार देशांमधील एकतंत्री राजकीय हुकुमतीचा त्या प्रारूपाला धोरणात्मक पाठिंबादेखील चांगला लाभला. मुळात, या चारही देशांमध्ये देशी बचतीचे त्या त्या देशांच्या ठोकळ उत्पन्नाशी असणारे प्रमाण चांगल्यापैकी बाळसेदार होते. त्यांतच, परकीय भांडवल आकर्षित करण्याच्या हेतूने या चारही देशांनी अनुकूल धोरणे नेटाने राबविली. त्या बाबतीत या देशांच्या शासनसंस्थांनी अतिशय पूरक व प्रेरक भूमिका बजावली. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेने देऊ केलेल्या आर्थिक मदतीचे लाभार्थीदेखील हे चार देश होतेच. परकीय भांडवल घेऊन येणाऱ्या कंपन्यांना करविषयक बाबींमध्ये सवलती देणे, अनुदाने उपलब्ध करून देणे, निर्यातप्रधान वस्तू व सेवांची निर्मिती करणाऱ्या देशी उद्योगांना सुलभ व नरम व्याजदरांनी कर्जे उपलब्ध करून देणे, कामगारांच्या आघाडीवर कोणत्याही प्रकारचे तंटे अथवा संपांसारखे असंतोषाचे प्रसंग उद्‌भवू नयेत म्हणून बंदोबस्त करणे, कामगारांच्या वेतनाचे सरासरी मान तुलनेने निम्न स्तरावर राखणे... अशा प्रकारच्या धोरणांची अंमलबजावणी या चार देशांमध्ये जाणीवपूर्वक करण्यात आली.

आपली भूमी उत्पादनासाठी वापरायची व तयार झालेला माल जगभरात (प्रामुख्याने, पश्चिमेकडील विकसित देशांमध्ये) विकायचा, असे ते दमदार आर्थिक विकासाचे निर्यातप्रधान 'मॉडेल' होते. १९७८ सालानंतर चीननेदेखील नेमक्या याच धोरणदिशेचा अवलंब केलेला होता. परकीय कंपन्यांची भांडवली गुंतवणूक तिच्यासह परकीय तंत्रज्ञान, व्यवस्थापनप्रणाली, नवीन बाजारपेठा अशांसारख्या अन्य आनुषंगित

बाबीदेखील घेऊन येत असते. या सगळ्या 'पॅकज'चा उदंड लाभ या चारही आशियाई अर्थव्यवस्थांनी उठवला. आर्थिक प्रगतीच्याबाबतीत या चारही देशांनी जी छलांग मारली ती बघता, 'आशियाई वाघ' असा या चार अर्थव्यवस्थांचा आदरपूर्वक निर्देश प्रचलीत झाला.

या चार 'आशियाई वाघां'ची आगेकूच १९९०च्या दशकाखेरीपर्यंत अप्रतिहत चालू राहिली... आणि अवचितच त्यांचे आर्थिक भागधेय पालटले. ते वर्ष होते १९९७-९८. तो साराच घटनाक्रम मोठा विलक्षण होता. परकीय भांडवल आकर्षित करण्यासाठी या चार देशांनी त्यांच्या त्यांच्या देशी चलनांचा अमेरिकी डॉलरबरोबर असणारा विनिमय दर एका विशिष्ट पातळीवर गोठवून स्थिर राखलेला होता. एकंदर सर्वत्रच, आंतरराष्ट्रीय स्तरावर भांडवलाचे चलनवलन वाढल्यानंतर अमेरिकी डॉलरला असणारी मागणी सरासरीने वाढू लागली. साहजिकच, डॉलरची किंमतही त्यांद्वारे वाढती राहू लागली. या चार आशियाई देशांनी त्यांच्या देशी चलनाचे अमेरिकी डॉलरबरोबरचे विनिमय मूल्य एका विशिष्ट पातळीवर गोठविलेले असल्याने, अमेरिकी डॉलरच्या मूल्यवर्धनाबरोबर, आपातत:, या अर्थव्यवस्थांच्या देशी चलनांचा मूल्यऱ्हास अपेक्षित होता. परंतु, देशी चलनांचे डॉलरबरोबरचे विनिमय मूल्य गोठवून ठेवलेले असल्याने, डॉलरच्या वाढत्या किमतींचा प्रभाव या चार अर्थव्यवस्थांच्या देशी चलनांवरही जाणवून परिणामी या अर्थव्यवस्थांमध्ये उत्पादन होऊन जागतिक बाजारपेठेत निर्यात होणाऱ्या वस्तू व सेवांची स्पर्धात्मकता खालावली. त्याचा फटका या अर्थव्यवस्थांमधून केल्या जाणाऱ्या निर्यातीला बसून निर्यातीद्वारे होणाऱ्या कमाईला कसर लागू लागली. परिणामी, या अर्थव्यवस्थांच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या चालू खात्यावरील तुटीत वाढ घडून येऊ लागली. ती तूट भरून काढायची तर या अर्थव्यवस्थांच्या देशी चलनांचे अवमूल्यन घडवून आणणे, हाच ताबडतोबीचा उपाय ठरला असता. परंतु, अमेरिकी डॉलरशी असणारा देशी चलनांचा विनिमय दर ठरावीक अशा स्थिर पातळीवर गोठविलेला असल्याने देशी चलनाचे आवश्यक तेवढे अवमूल्यन करता येईना. हा ताण अखेर किती काळ सहन करणार?

अखेर, पार टेकीला आलेल्या थायलंडने, निरुपायाने, आपल्या देशी चलनाचे अवमूल्यन घडवून आणले. तिथून एकदम सगळीच घसरगुंडी चालू झाली. ती केवळ थायलंडपुरती सीमित राहिली नाही. ती वणव्यासारखी एकदम फोफावली. अर्थकारणाची भरधाव चलती होती त्यांवेळी या चारही अर्थव्यवस्थांमधील अनेकानेक बड्या उद्योगांनी अमेरिकी डॉलरच्या रूपातील भरभक्कम कर्जे उभारलेली होती.

त्यांतील बहुतांश कर्जे होती अल्पमुदतीची. थायलंडने त्याच्या देशी चलनाचे अवमूल्यन घडवून आणल्यानंतर, ज्या थायी उद्योगांनी भलीभक्कम कर्जे (डॉलरमधील) उभारलेली होती त्यांच्या परतफेडीचे देशी चलनाच्या स्वरूपातील मूल्य एकदम प्रचंड फुगले. डॉलरमधील कर्जांवरील देय असणारे व्याज आणि मुद्दलाची परतफेड मग बनली डोईजड आणि दुस्तर. परिणामी, अनेक उद्योग एकाएकी अडचणीत आले तर कित्येक बंद पडले! चलतीच्या काळात देशी बँका, शासनसंस्था आणि कॉर्पोरेट्स् यांचे चांगल्यापैकी गुळपीठ जमलेले होते. अनेक बँकांनी, पुरेशी दक्षता व काटेकोर चिकित्सेकडे काणाडोळा करत, अनेक उद्योगांना कर्जांचे वाटप केलेले होते. परिणामी, 'रिअल इस्टेट'सारख्या क्षेत्रांमध्ये दिखाऊ भरभराटीचे फुगे टरारलेले होते. शेअर बाजारही तेजीत होते. ते सगळेच समीकरण देशी चलनाच्या अवमूल्यनानंतर पार विसकटून गेले.

थायलंडने त्याच्या देशी चलनाचे (अमेरिकी डॉलरच्या तुलनेत अथवा डॉलरच्या सापेक्ष) अवमूल्यन घडवून आणल्यानंतर एकदम सावध झाले ते परदेशी गुंतवणुकदार. कॉर्पोरेट विश्व आणि शासनसंस्था यांचे साटेलोटे जमून थायलंडमध्ये प्रस्थापित झालेल्या 'क्रोनी कॅपिटलिझम'पायी बेगडी वर्ख चढलेल्या अर्थकारणाचा लाभ उठवण्यासाठी आपल्याजवळील गुंतवणूकयोग्य भांडवल, अल्प मुदताने, तात्पुरते 'पार्क' करून ठेवलेल्या परदेशी गुंतवणुकदारांनी आपली अल्पकालीक गुंतवणूक काढून घेण्याकडे मोहरा वळवला. परिणामी, देशी चलनाचे अवमूल्यन अधिकच गहिरे बनून थायलंडची आर्थिक स्थिती लक्षणीयरीत्या खालावली. परदेशी गुंतवणुकदारांच्या मनात निर्माण झालेला अविश्वास केवळ थायी अर्थव्यवस्थेपुरताच मग सीमित राहिला नाही. अन्य आशियाई देशांमध्ये 'पार्क' करून ठेवलेली गुंतवणूकदेखील काढून घेण्याचा सपाटा त्यांनी मग लावला आणि, यथावकाश, ते लोण सार्वत्रिक बनून सिंगापूर, हाँगकाँग, दक्षिण कोरिया यांसह इंडोनेशिया यांसारख्या देशांतही पसरले. परदेशी भांडवलाने एकाएकी घाऊक प्रमाणावर पाय काढून घेतल्याने या देशांच्या अर्थव्यवस्था एकदम आक्रसल्या.

शासनसंस्थेने अनुकूल धोरणांचा टेकू पुरविल्यामुळेच केवळ भरभराट दाखवणाऱ्या उद्योगांची चलती, फारशी चिकित्सा व काटेकोर मूल्यमापन न करताच उद्योगांना केले गेलेले कर्जवाटप, मुख्यत: निर्यातप्रधान आर्थिक धोरणाचा पाठपुरावा करत देशी अर्थव्यवस्थेची केलेली उपेक्षा, तात्कालिक लाभ उठविण्यासाठी परदेशी गुंतवणूकदारांनी निव्वळ 'पार्क' करून ठेवलेल्या अल्पमुदतीच्या भांडवलाची बहुलता...

यांवर पोसत राहिलेला आर्थिक विकास, प्रसंगी, किती ठिसूळ ठरू शकतो, याचा १९९७-९८ या वर्षात 'आशियाई वाघांची' घडून आलेली ससेहोलपट जणू वस्तुपाठच ठरला. परंतु, वैश्विक समुदायाने त्यावरून उचित असा बोध फारसा घेतला नसावा, याचा एक दाखला, पुढे, २०१०च्या दशकात चीनने त्याच्या देशी चलनाचे अमेरिकी डॉलरबरोबरील विनिमय मूल्य ज्या कृत्रिम पद्धतीने निम्न स्तरावर दाबून ठेवले, त्यांवरून मिळाला. चीनच्या त्या धोरणापायी अमेरिका, युरोपातील अन्य देश व चीन यांच्यादरम्यान चलनयुद्ध (करन्सी वॉर) चालू असल्याचे बयान अमेरिकेला त्या दरम्यान करणे भाग पडले. २१व्या शतकाचा प्रारंभ जगाच्या नकाशावर होत असताना वैश्विक अर्थकारणाच्या रंगमंचावर साकारत आलेले नाट्य हे असे होते.

त्याच वेळी, १९९०च्या दशकातच, आणखी एक नाट्यप्रयोग समांतर पद्धतीने रंगला होता अमेरिकी अर्थरंगभूमीवर. अर्थरंगभूमीवर, त्या दरम्यान, तिथे खेळ बहरला होता तो इंटरनेटवर आधारित तंत्रशास्त्रीय उपयोजने घडवणाऱ्या कंपन्यांचा. त्या कंपन्यांचा एकत्रित निर्देश, त्या काळी, केला जात असे 'डॉट कॉम कंपन्या', असा. इंटरनेटआधारित नाना प्रकारची उपयोजने बाजारात आणणाऱ्या 'स्टार्ट अप्' कंपन्यांचे अमेरिकेत मग फुटले पेव. इंटरनेट आणि त्याच्या आधारे करता येणारी व्यावसायिक उपयोजने (ॲप्लिकेशन्स्) यांचे अभूतपूर्व असे आकर्षण अमेरिकी अर्थकारणात एकदम फोफावले. या क्षेत्रात कार्यरत बनलेल्या 'स्टार्ट अप्स्'ना उद्यम भांडवलाचा (व्हेन्चर कॅपिटल) पुरवठा करण्यासाठी चढाओढ लागली. अनेक 'स्टार्ट अप्स्'नी अमेरिकी शेअर बाजारात नोंदणी करून भक्कम भांडवल उभारणी केली. भविष्यात इंटरनेटचा आणि त्यावर आधारित उपयोजनांचा विस्तार अप्रतिहत होत राहील, त्यांतून या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या उद्योगांना सुगीचे दिवस येतील, त्यांची नफाप्रदता चांगली सणसणीत राहील... अशा सगळ्या तर्कशास्त्राला अनुसरत या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर भांडवली गुंतवणूक होत राहिली. परिणामी, इंटरनेटवर बेतलेल्या उपयोजनांच्या व्यवसायक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या 'डॉट कॉम' कंपन्यांच्या समभागांच्या किमती सतत चढत्या राहिल्या. त्यांतून, भान हरपल्यासारखे अनेक गुंतवणूकदार या समभागांच्या खरेदीकडे ओढले गेले. तारतम्य पार लयाला गेले!

ती एक प्रकारची सट्टेबाजीच होती. इंटरनेटसारख्या नवतंत्राचा चौफेर विस्तार अव्याहत चालू राहून त्यांद्वारे या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कंपन्यांच्या अविरत चलतीद्वारे निर्माण होणाऱ्या सुबत्तेपासून आपण वंचित राहता कामा नये, या ऊर्मीपायी प्रचंड भांडवली गुंतवणूक अशा 'डॉट कॉम' कंपन्यांमध्ये संपूर्ण १९९०च्या

दशकादरम्यान जारी राहिली. सगळ्या 'डॉट कॉम' कंपन्या भरघोस नफा कमावतील, ही धारणा त्यामागे होती. त्या वारूवर स्वार झालेल्या अनेक 'डॉट कॉम' कंपन्यांनादेखील वित्तीय शिस्तीचा जणू मग विसरच पडला. जाहिरातबाजीवर त्यांपैकी अनेक कंपन्यांनी धुवांधार खर्च केला. आता, सगळ्यांच 'डॉट कॉम' कंपन्यांच्या सेवा व उत्पादने काही अद्वितीय अथवा खास नव्हती व नसतातच. त्यांमुळे, स्पर्धेमध्ये टिकण्यासाठी आक्रमक जाहिरातींवर, काही कंपन्यांनी तर, त्यांच्या अंदाजपत्रकातील एकूण तरतुदींच्या ९० टक्के रक्कम उधळली! अमेरिकी अर्थव्यवस्थेतील व्याजदरांची सरासरी पातळी त्या सगळ्या काळात नरम राहिल्याने भांडवलाची चणचण 'डॉट कॉम' कंपन्यांना भासली नाही. कर्जे स्वस्त होती. या सगळ्यांतून 'डॉट कॉम' कंपन्यांच्या चलतीचा फुगा १९९८ सालापासून फुगायला लागला. अमेरिकी शेअर बाजारातील निर्देशांक उसळ्या घेत २००० सालातील मार्च महिन्यात शिगेला पोहोचला. भांडवल बाजारात खेळणाऱ्या मुबलक रोखतेपायी अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये महागाईचा तेवर जाणवू लागला.

महागाईला पायबंद घालण्याच्या उपायांचा एक भाग म्हणून अमेरिकी फेडरल रिझर्व्हने व्याजदरांत वाढ घडवून आणण्याकडे पैसा धोरणाचा मोहरा वळवण्यास २००० सालापासून प्रारंभ केला. साहजिकच, कर्जे महागली. त्याचा प्रभाव जाणवू लागला 'डॉट कॉम' कंपन्यांकडे वाहणाऱ्या भांडवलाच्या प्रवाहांवर. व्याजदरांमधील वाढीचा ताप त्या कंपन्यांनादेखील जाणवू लागला. कारण त्यांनी उभारलेल्या कर्जांवरील व्याजभरणा वाढू लागला. ज्या 'डॉट कॉम' कंपन्या मुळातच ढिसूळ पायावर उभ्या होत्या, ज्यांच्या सेवा व उत्पादने बाजारात तगली नाहीत व तगत नव्हती, ज्या कंपन्यांनी मुळात काही सेवा वा उत्पादने बाजारात आणलेलीच नव्हती अशा सगळ्यांची मग कोंडी सुरू झाली. अपेक्षेइतकी तर सोडाच, परंतु, किमान नफाप्रदतादेखील दृष्टिपथात येईना. कृत्रिम हवेच्या झुल्यांवर झुलणाऱ्या 'डॉट कॉम' कंपन्या, मग, एका पाठोपाठ एक अशा, बंद पडू लागल्या. त्यांबरोबर, या क्षेत्रात पैसा गुंतवलेल्या भांडवलदारांच्या विश्वासाला एकदम खिंडारे पडली. 'डॉट कॉम' कंपन्यांकडे वाहणारे भांडवलाचे ओघ वेगाने आटू लागले. त्यांमुळे अनेक कंपन्या अधिकच अडचणीत आल्या. 'डॉट कॉम' कंपन्यांच्या विश्वातील या बदलत्या वाऱ्यांचा वेध घेणाऱ्या गुंतवणुकदारांनी त्या विश्वात केलेली गुंतवणूक तिथून काढून घेण्याला प्रारंभ केला. 'डॉट कॉम' कंपन्यांच्या समभागांची मग दणादण विक्री चालू झाली. गुंतवणूकदारांमधील अविश्वासाचे पडसाद 'डॉट कॉम' कंपन्यांच्या समभागांच्या

किमतींमध्ये उमटू लागले. 'डॉट कॉम' कंपन्यांच्या फुग्यातील हवा सरण्याचे, साधारणपणे २००० सालाच्या प्रारंभी सुरू झालेले पर्व पुढील दोन वर्षांत शिखराला पोहोचले आणि 'डॉट कॉम' कंपन्यांचा अमेरिकी अर्थव्यवस्थेतील तो फुगा २००२ सालातील ऑक्टोबर महिन्यात धाडकन फुटला!

परंतु, विस्मयकारक बाब म्हणजे, फुटलेल्या त्या फुग्याने, त्या नंतर अवघ्या दोन ते तीन वर्षांनंतरच आणखी एका फुग्याच्या निर्मितीचे बीजारोपण घडवून आणले. 'डॉट कॉम' कंपन्यांचा फुगा फुटल्यानंतर अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये मंदीचे मळभ दाटले व त्यांपायी अस्वस्थता पसरली. अनेक 'डॉट कॉम' कंपन्या बंद पडल्या, कित्येक दिवाळखोरीत निघाल्या. परिणामी, अनेकांच्या नशिबी बेरोजगारी आली. शेअर बाजारातील पडझडीपायी वित्तीय मालमत्तेची हानी घडून आली. गुंतवणुकदारांच्या विश्वासाला तडा गेलेला होताच. हे सगळे सावरण्यासाठी, अमेरिकी मध्यवर्ती बँकेला, २००१साली पुन्हा एकवार उदार आणि विस्तारक पैसाधोरणाची अंमलबजावणी करणे भाग पडले. योगायोग असा की, त्याच वर्षी, म्हणजे, २००१ साली जॉर्ज बुश (ज्युनिअर) यांनी अमेरिकी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली होती. त्यांची निवडणूक ठरली होती विलक्षण वादग्रस्त. त्यांतच, २००० साली 'डॉट कॉम' कंपन्यांचा फुगा फुटल्यामुळे उद्भवलेल्या मंदीपायी सर्वसामान्य अमेरिकी नागरिक अस्वस्थ होता. बेरोजगारी सगळ्यांनाच त्रस्त करत होती. तिसरीकडे, प्रगत तंत्रशास्त्राचा अवलंब अर्थव्यवस्थेच्या निरनिराळ्या क्षेत्रांत झिरपण्यास प्रारंभ झालेला होता. अत्याधुनिक व उच्च प्रतीच्या तंत्रज्ञानाचा अवलंब केला जाणाऱ्या व्यवसायउद्योगांत ज्या रोजगार संधी उपलब्ध होत्या त्यांचा लाभ अनुरूप शिक्षण-प्रशिक्षण-कौशल्ये आत्मसात केलेल्या उमेदवारांच्या पदरात पडत होते. त्यांना मिळणारा मेहेनताना चांगल्यापैकी दमदार होता व त्यांतील वेळोवेळची वाढदेखील तशीच सज्जड राहत असे. दुसरीकडे, निखळ मानवी कौशल्यांवरच पूर्णपणे बेतलेल्या क्षेत्रांत रोजगार आणि मेहेनताना वाढत होता. स्वयंपाकी, वकील, डॉक्टर, शिक्षक, उत्तम बागकाम जाणणारे माळी, चित्रकार, अभिनयाच्या क्षेत्रातील रंगकर्मी, लेखक..अशांचा समावेत या गटात होता. या दोन्हींपैकी कोठेच नसलेल्यांच्या रोजगार संधी आणि मेहेनतान्यातील वाढ मात्र खुंटत-खुरडत चालली होती.

अमेरिकी रोजगारी-बेरोजगारीच्या या चित्राचे सामाजिक स्तरावर उमटणारे पडसाद, यथावकाश, वैशिष्ट्यपूर्ण ठरू लागले. अत्याधुनिक तंत्रशास्त्र हाताळण्याचे कौशल्य उचित अशा शिक्षणाद्वारे पदरात पाडून घेतलेले असे अमेरिकी समाजाच्या उतरंडीमध्ये

शीर्षस्थानी असणारे मोजके घटक आणि यंत्रतंत्र ज्यांच्या मानवी कौशल्यांची जागा घेऊ शकत नाहीत अशी कुशलता अंगी बाणवलेले कुशल समाजघटक वगळता, या दोहोंच्या सापटीत गवसलेल्या अमेरिकी श्रमदलातील घटकाची कुचंबणा क्रमाक्रमाने जीवघेणी शाबूत होऊ लागली. अमेरिकी समाजातील तो घटक मुख्यत: होता पांढरपेशा नोकरदार मध्यमवर्गीयांचा. त्या अस्वस्थतेची जाणीव असलेले अमेरिकी नेतृत्त्व ती कोंडी फोडून घुसमटीवर उपाय शोधण्याच्या मार्गावर असतानाच, ११ सप्टेंबर २००१ या दिवशी अमेरिकेला अकल्पित असा जबर तडाखा बसला तो इस्लामी दहशतवादाचा. जागतिक व्यापार संघटनेच्या न्यूयॉर्क येथील जुळ्या मनोऱ्यांवर इस्लामी मूलतत्त्ववाद्यांनी घडवून आणलेल्या आत्मघातकी हल्ल्यापायी २१व्या शतकाची सुरुवातच अतर्क्य अशा निराळ्या वळणाने झाली. त्या घटनेने, उभ्या जगाचीच, 'इस्लामी जग' आणि 'इस्लामेतर जग' अशा दोन भागांत अदृश्य परंतु चिरकालीक विभागणी घडवून आणली. वास्तविक पाहता, अमेरिकाकेंद्री पश्चिमेच्या जगभरात विविध ठिकाणी बळजोर होत आलेल्या सांस्कृतिक-सामरिक-आर्थिक प्रभुसत्तेच्या विरोधात साचत आलेल्या असंतोषाची ११ सप्टेंबर २००१ रोजीचा हल्ला ही, तीव्र अशी हिंसक प्रतिक्रिया होती. त्या जखमेचे व्रण आजही टिकून आहेत. वैश्विक समूहाच्या मनावर त्या घटनेचा उठलेला ओरखडा इतका सघन व सखोल आहे की, एकंदर इस्लामी जगाकडे बघण्याची उर्वरित जगाची नजरच त्यांपायी बाधित झालेली आहे. इस्लामी विश्वाच्या मानसिकतेबद्दल २००१ साली निर्माण झालेल्या भीतीयुक्त साशंकतेचे सावट त्या नंतर पुऱ्या दीड दशकानंतरही तितकेच सघन असल्याचा प्रत्यय पुढे प्रकर्षाने आला.

जागतिक व्यापार संघटनेच्या जुळ्या मनोऱ्यांवरील हल्ला आणि त्या नंतर वर्षभरातच फुटलेला 'डॉट कॉम' कंपन्यांचा फुगा या दोहोंपायी वैश्विक अर्थकारणाचे केंद्र गणल्या जाणाऱ्या अमेरिकी अर्थव्यवस्थेचा कणा पार ढिला होण्याची पाळी येऊन ठेपली. शेअर बाजारातील पडझड, बुडालेल्या आणि/अथवा बंद झालेल्या 'डॉट कॉम' कंपन्यांपायी निर्माण झालेली बेरोजगारी आणि दहशतवादाच्या उग्र प्रगटनाद्वारे सर्वत्र दाटून राहिलेले भययुक्त अनिश्चिततेचे वातावरण अशा तिहेरी पेचात घुसमटणाऱ्या अमेरिकी अर्थव्यवस्थेला आणि त्यांतही पुन्हा, अधिक प्राधान्याने, हडबडून गेलेल्या नोकरदार मध्यमवर्गीय अमेरिकी कुटुंबांना स्थैर्याचे आश्वासन देणे अमेरिकी राजकीय नेतृत्त्वाच्या दृष्टीने अतिशय कळीचे ठरत होते. अर्थव्यवस्थेत प्रवर्तलेली मंदी, शेअर बाजारातील आपटीपायी झालेली मालमत्तेची हानी, बंद

पडलेल्या उद्योगांमुळे पसरलेली बेरोजगारी अशा सगळ्या कोंडीचा फटका बसत होता तो अमेरिकी अर्थव्यवस्थेतील मागणीला. प्रगाढ अशा आर्थिक अनिश्चिततेपायी सर्वसामान्य अमेरिकी नागरिक खर्चाबाबत हात आखडता घेत होता. अर्थव्यवस्थेतील मागणीच पार मलूल होऊन पडल्यामुळे तिचे चटके अर्थकारणातील गुंतवणूक–रोजगारनिर्मिती–उलाढाल–नफाप्रदता अशा सर्वच प्रांतांना पोळत होते. अमेरिकी अर्थव्यवस्थेतील मागणीला घाऊक उठाव आल्याखेरीज अर्थव्यवस्थेची चाके गतिमान बनणार नाहीत, अशी खुणगाठ पटलेल्या अमेरिकी धोरणकर्त्यांमध्ये त्या दिशेने उचलावयाच्या पावलांबाबत विचारविनिमय जारीने चालू झाला. अमेरिकेचे अध्यक्षपद त्या वेळी होती जॉर्ज बुश (ज्यूनियर) यांच्याकडे तर, अमेरिकी मध्यवर्ती बँकेची (फेडरल रिझर्व्ह) धुरा होती ॲलन ग्रीनस्पॅन यांच्या खांद्यावर. त्या सगळ्या चर्वितचर्वणांती, अमेरिकी अर्थव्यवस्थेतील कोंडी फोडण्यासाठी जो उतारा निष्पन्न झाला त्याने तर आगीतून निघून फुफाट्यात पडण्यासारखी अवस्था झाली – एकट्या अमेरिकी अर्थव्यवस्थेची नव्हे तर, उभ्या वैश्विक अर्थव्यवस्थेचीच!

'सब्प्राइम क्रायसिस' ही शब्दसंहती त्या सगळ्या कल्लोळातून जन्माला आली. अर्थव्यवस्थेमध्ये चांगल्या दर्जाचा व उत्पादक स्वरूपाचा रोजगार पुरेशा मात्रेने निर्माण होत नाही, ज्यांना नोकऱ्या आहेत अशांना त्या टिकण्याबाबतची शाश्वती वाटत नाही... अशा आर्थिक पर्यावरणात सर्वसामान्य नागरिक एकंदरीने हात राखूनच खर्च करतो. परिणामी, अर्थव्यवस्थेतील एकूण एकत्रित मागणी मलूल होते. त्याचा फटका बसतो अर्थचक्राला. अशा वेळी, नागरिकांनी संभाव्य/कल्पित/वास्तव आर्थिक अनिश्चिततेपायी उपभोगाला कात्री लावू नये, म्हणून शासनसंस्थेने काही तरी उपाययोजना करणे अपेक्षित असते व आवश्यकही. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, अर्थव्यवस्थेमध्ये सगळे जरी काही आलबेल नसले तरी आम्ही (म्हणजे शासनसंस्था) तुमच्या उपभोगाला आच लागू देणार नाही, असे आश्वासन नागरिकांना व्यवहारत: देणारा कृतिकार्यक्रम राबविणे धोरणकर्त्यांना अत्यावश्यक ठरते. अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये, साधारणपणे, २००४–०५ सालानंतर तोच प्रयोग चालू झाला. त्यासाठी उपकरण वापरले गेले ते सुलभ कर्जांचे.

उपभोगासाठी, आणि मुख्यत: घरबांधणी आणि/अथवा घरखरेदीसाठी सुलभ पद्धतीने कर्जे उपलब्ध करून देण्याचे धोरण तिथे हिरिरीने राबविले गेले. त्या काळात, घरांच्या किमतींची सरासरी पातळी अमेरिकी अर्थव्यवस्थेत चढता कल दर्शवित होती. सुलभ अटींवर बँकांकडून उपलब्ध होत असलेले कर्ज उचलायचे,

त्यांतून घर घ्यायचे, काही वर्षांनी त्या घराच्या भांडवली मूल्यामध्ये वाढ घडून आली की ते विकून टाकायचे, ही कार्यपद्धती अमेरिकी समाजात व्यापक प्रमाणावर २००५-०६ सालानंतर रुजू लागली. सुलभ अटींवर आणि सुकर कार्यप्रणालीद्वारे कर्जे उपलब्ध होत आहेत, असे लक्षात आल्यावर अमेरिकी नागरिकांनी बँकांकडून कर्जे घेऊन घरे खरेदी करण्याचा धडाका चालविला. कर्जांची वाढती मागणी स्वत:च्या निधीद्वारे पुरी करणे शक्य होत नसल्याचे ध्यानात येताच बँकांनी, कर्जे देण्यासाठी, स्वत:च कर्जे उभारण्याचा पर्याय चोखाळला. अशी कर्जे बँकांनी परस्परांकडून तसेच भांडवल बाजारातील अन्य वित्तसंस्थांकडून उचलणे चालू केले. अशी कर्जे घेतेवेळी, त्या त्या बँकांनी कर्जांचे वाटप ऋणकोंना ज्या करारपत्रांच्याद्वारे केलेले होते अथवा केलेले असे अशी करारपत्रे दुसऱ्या बँकेकडे तारण स्वरूपात गहाण ठेवून कर्जे उभारली व त्या रकमा पुन्हा कर्जाऊ वितरित केल्या. ही एक प्रकारची साखळीच अशा व्यवहारांद्वारे विणली गेली. त्यांत अन्य देशांतील काही बँका व वित्तसंस्थादेखील सामील झाल्या. अमेरिकी घरबांधणी उद्योगाला व एकंदरच बांधकाम व्यवसायाला या सगळ्यांद्वारे एकदम तरतरी आली. बांधकाम क्षेत्र हे अर्थव्यवस्थेतील एक मूलभूत व्यवसायक्षेत्र गणले जाते. सीमेन्ट, पोलाद, रंग, अन्य बांधकाम साहित्य, वास्तुरचना, वाहतूक... अशांसारख्या अन्य आनुषंगिक अर्थोद्योग क्षेत्रांना बांधकाम क्षेत्रातील चलनवलनाद्वारे चालना मिळते. तोच न्याय लागू होऊन, परिणामी, अमेरिकी अथव्यवस्थेतील गळाठा दूर होऊ लागला. साहजिकच, सुलभ कर्जवाटपाचे धोरण राबवत अमेरिकी अर्थव्यवस्थेत जान फुंकण्याचे ते धोरण तसेच चालू ठेवण्यात अमेरिकी धोरणकर्त्यांना रस निर्माण झाला.

अशी कर्जे वाटत असताना कर्जदाराच्या पतधारणाची तसेच घेतलेले कर्ज फेडण्याच्या त्याच्या क्षमतेची काटेकोर पडताळणी संबंधित बँकेने डोळ्यांत तेल घालून करणे अपेक्षित असते व आहे. परंतु, या किमान मार्गदर्शक तत्त्वालादेखील तिथे मग हरताळ फासला गेला. कर्जाची परतफेड करण्याची ज्यांची क्षमता नव्हती अशा कर्जदारांनादेखील बँकांनी कर्जवाटप केले. अशा कर्जांचा निर्देश, त्या काळी, 'निन्जा लोन्स' अशा शब्दसंहतीने केला जात असे. 'निन्जा लोन्स' हे होते लघुरूप 'नो इन्कम-नो जॉब-नो ॲसेट्स्' या शब्दसंहतीचे. ज्यांच्यापाशी कोणत्याही प्रकारच्या उत्पन्नाची आश्वस्तता नव्हती (नो इन्कम), ज्यांना कोणताही रोजगार नव्हता (नो जॉब), ज्यांच्यापाशी कोणतीही (तारण ठेवण्याजोगी) मालमत्ता नव्हती (नो ॲसेट्स्) अशा ऋणकोंना अमेरिकी बँकांनी कर्जे दिली होती. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर,

बँकेकडून उचललेल्या कर्जाची परतफेड करण्याची क्षमता ज्यांच्यापाशी नव्हती, अशांनाही अमेरिकी बँकांनी त्या काळात कर्जे दिली. घेतलेले कर्ज सव्याज परत करण्याची क्षमता बाळगणाऱ्यांची गणना, बँकेच्या दृष्टीने, 'प्राइम' म्हणजे, 'अस्सल' अथवा 'उत्तम' (म्हणजेच, खात्रीचे अथवा हमीदार) ऋणकोंमध्ये केली जाते. घेतलेले कर्ज परत करण्याची ज्यांची क्षमता संशयास्पद अथवा/आणि क्षीण असते अशा ऋणकोंचा निर्देश 'सब्प्राइम' अशा विशेषणाने केला जातो. 'दुय्यम प्रतीचे' अथवा 'कमअस्सल' असे ऋणकोंच्या 'सब्प्राइम' या वर्गात मोडणाऱ्यांचे वर्णन करता येईल.

कर्जांची परतफेड करण्याची ज्यांची क्षमता क्षीण आणि/अथवा संशयास्पद आहे अशा ऋणकोंना कर्जवाटप करण्याद्वारे अमेरिकी बँकांनी अतिशय मोठी जोखीम पदरात घेतलेली होती. हा सिलसिला साधारणपणे २००६ सालाच्या आगेमागे जोराने चालू झाला. अमेरिकी अर्थव्यवस्थेत आणि खास करून अमेरिकी बँकिंग व्यवसायात काही तरी अनुचित घडते आहे आणि त्याचा परिपाक आर्थिक अरिष्टामध्ये घडून येईल, अशी साशंकता काही मूठभर अर्थतज्ज्ञांना तेव्हा वाटू लागलेली होती. भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डॉ. रघुराम राजन यांचा समावेश त्या मूठभरांमध्ये होता. त्या संदर्भातील सावधगिरीचे इषारेदेखील त्यांनी मुखर केलेले होते. परंतु, त्या अनुचित कार्यप्रणालीची संभाव्य परिणती ज्या वित्तीय अरिष्टामध्ये घडून येईल त्याची लांबी-रुंदी-खोली नेमकी किती असेल, याचा अंदाज मात्र त्या वेळी कोणालाच नव्हता. हे सगळे एकीकडे असे घडत असताना, साधारणपणे, २००८ सालातील एप्रिल-मे महिन्यापासून कच्च्या खनिज तेलाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तेलाचे भाव चढायला लागलेले होते. त्या वर्षातील ऑगस्ट महिन्यात तर, तेलाचे बाजारभाव दर बॅरलमागे १५३ डॉलर्सपर्यंत वाढले. तेलाच्या या दरवाढीपायी अमेरिकी अर्थव्यवस्थेत एकंदर भाववाढीला चालना मिळाली. महागाईला लगाम घालण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून अमेरिकी मध्यवर्ती बँकेने (फेडरल रिझर्व्ह) व्याजदरांमध्ये वाढ घडवून आणण्यास सुरुवात केली.

घरखरेदीसाठी सुलभ हप्त्यांनी कर्जे मिळत असल्यामुळे घरांच्या मागणीला आणि साहजिकच, घरबांधणीला अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये वेग आलेला होता. बँकेकडून कर्ज घेऊन घर विकत घ्यायचे, काही काळ थांबायचे, घरांच्या बाजारपेठेत किंमती वाढल्या की ते घर वाढीव किंमतीला विकून टाकायचे आणि बँकेकडून घेतलेले कर्ज फेडायचे, असा परिपाठ तिथे स्थिरावलेला होता. परंतु, त्या सगळ्या कारभारात घरांच्या बाजारपेठेत मागणीच्या तुलनेत घरांचा पुरवठा वाढल्याने घरांच्या

किंमतींमधील वाढ मंदावली. दुसरीकडे, अमेरिकी मध्यवर्ती बँकेने व्याजदरांमध्ये वाढ घडवून आणण्यास प्रारंभ केल्याने ज्या ऋणकोंनी तरत्या व्याजदरांनी कर्जे उचलली होती त्यांच्या व्याजभरण्यात वाढ होऊ लागली. दोन्हीकडून चिमटीत सापडलेले कर्जदार, मग, हळूहळू कर्जे थकवू लागले. साहजिकच त्यांपायी बँका अडचणीत येऊ लागल्या. घेतलेल्या कर्जांखातर ज्या ऋणकोंनी, त्या कर्जांद्वारे खरेदी केलेली घरेच, बँकांकडे तारण ठेवलेली होती ती तारण घरे विकून टाकून थकित कर्जांची वसुली करण्याचा पर्याय बँकांपुढे होता. परंतु, तो पर्याय अंमलात आणणेदेखील दुष्कर शाबीत होऊ लागले. कारण, घरांच्या अमेरिकी बाजारपेठेत घरांच्या किंमतींमधील वाढ घरंगळल्याने तारण घरे विकूनदेखील थकित कर्जांची भरपाई होण्यासारखी परिस्थिती उरली नव्हती. मुळात, बँकांनी वाटप केलेल्या कर्जांमध्ये 'निन्जा' कर्जांचे प्रमाण मोठे असल्याने तशा कर्जांची वसुली होण्याची शक्यता मुदलातच नव्हती.

अखेरीस, अशा थकित कर्जांचा बोजा वाढत राहिला आणि अमेरिकी बँका घोर अडचणीत लोटल्या गेल्या. १५ सप्टेंबर २००८ या दिवशी, 'लेहमन ब्रदर्स' या १८५० साली स्थापन झालेल्या विख्यात आणि प्रस्थापित अशा वित्तीय कंपनीने तिचे दिवाळे अधिकृतपणे जाहीर केले आणि 'सब्प्राइम' कर्जांचा तो अमेरिकी फुगा धाडदिशी फुटला! लेहमन ब्रदर्स ही जागतिक स्तरावर गुंतवणूक करणारी बडी वित्तीय संस्था होती. 'सब्प्राइम' कर्जांच्या उलाढालीत तिचा चांगला मोठा हिस्सा होता. साहजिकच, लेहमन ब्रदर्ससारख्या बलदंड वित्तीय संस्थेने नादारी जाहीर केल्यानंतर 'सब्प्राइम' कर्जांच्या पायावर साधारणपणे २००५-०६ सालापासून उभारणी होत आलेला वित्तविस्तार पुरता ढासळला. हस्ते-परहस्ते का होईना पण, या व्यवहारांत अमेरिकेव्यतिरिक्त अन्य देशांतील वित्तीय संस्थांनीदेखील सहभाग घेतलेला असल्यामुळे, लेहमन ब्रदर्सने जाहीर केलेल्या दिवाळखोरीनंतर अमेरिकी अर्थव्यवस्थेत ज्या वित्तीय अरिष्टाचा जन्म झाला त्याचा व्याप, साहजिकच, अन्य देशांतही यथावकाश पसरला. ऋणकोंनी परतफेड न केलेल्या कर्जांच्या भारापायी संबंधित वित्तीय संस्था अडचणीत आल्या. बँकांचा भांडवली पाया खचला. २००९ सालातील जानेवारी महिन्यात अमेरिकी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतलेल्या नवनिर्वाचित अध्यक्ष बराक ओबामा यांना सत्तेवर येताच पहिले कोणते अतिशय महत्त्वाचे काम प्राधान्याने हाती घ्यावे लागले असेल तर ते होते भांडवली पाया खचलेल्या अमेरिकी बँकांच्या पुनर्भांडवलीकरणाचे!

देशोदेशींच्या बाजारपेठांची परस्परांमधील सघन गुंफण, हा 'जागतिकीकरण' या संज्ञेचा व्यवहारातील अर्थ. परिणामी, जगाच्या कोणत्याही एका कोपऱ्यातील एखाद्या देशामधील एखाद्या बाजारपेठेत उद्भवलेल्या लाटांचे पडसाद विविध देशांच्या बाजारपेठांमध्ये कमी-अधिक फरकाने व तीव्रतेने उमटतात. अमेरिकी अर्थव्यवस्थेतील 'सब्प्राइम' कर्जांच्या फुटलेल्या त्या फुग्यामधून प्रसविलेल्या वित्तीय अरिष्टाने उभ्या वैश्विक अर्थकारणालाच लपेटून घेतले. देशोदेशींच्या शेअर बाजारांत तसेच बांधकाम व्यवसायांत त्या हादऱ्याचे पडसाद उमटू लागले. तिथवर जगाचे आर्थिक केंद्र गणली जाणारी अमेरिकी अर्थव्यवस्था मंदीच्या फुफाट्यात लोटली गेली. ती कारणमीमांसा मोठी रोचक होती. ती होती एक साखळी-प्रक्रिया. अमेरिकी बांधकाम क्षेत्र अडचणीत आल्याचे पडसाद सीमेन्ट, पोलाद, रंग, लाकूडकाम, फर्निचर... यांसारख्या अन्य आनुषंगिक उद्योगक्षेत्रांतही उमटू लागले. ते क्षेत्र अडचणीत आल्याचा फटका त्या त्या क्षेत्रांतील रोजगाराला बसला. दुसरीकडे, तेल महागल्याने त्याचे चटके वाहतूक क्षेत्रालाही जाणवू लागले. विविध क्षेत्रांतील रोजगारावर घडू लागलेले विपरित परिणाम आणि खनिज इंधनाचे तापलेले बाजारभाव यांचा एकत्रित फटका बसू लागला तो मोटरगाड्यांची निर्मिती करणाऱ्या उद्योगांना. त्याचा प्रभाव जाणवू लागला तो मोटरींच्या वापराला आणि पर्यायाने मोटरींच्या मागणीला. त्यापायी प्रभावित झाले मोटरनिर्मिती उद्योग. मोटरनिर्मिती उद्योगाच्या विकासाद्वारे पूरक उद्योगांच्या विविधांगी साखळीला बळ मिळत राहते. मुळात, मोटरनिर्मितीच्या मागणीवरच आच आल्याने अशा मोठ्या उद्योगांवर अवलंबून असणाऱ्या पूरक उद्योगांनाही त्या मंदीचा चटका बसू लागला. या सगळ्यांद्वारे एकंदरच अमेरिकी अर्थव्यवस्थेत बेरोजगारी आणि अर्ध-बेरोजगारीचे पर्व सघन बनले.

त्या वित्तीय भूकंपाचे धक्के लोकव्यवहाराच्या केवळ आर्थिकच नव्हे तर, सामाजिक अंगालाही बसले. त्या धक्क्यांचे उग्र असे संघटित प्रगटनही घडून आले. व्यापक स्तरावरील बेरोजगारी आणि एकंदरच आर्थिक अस्थिरता यांपायी अमेरिकी लोकमानसात धुमसत असलेल्या घुसमटीला तोंड फुटले ते २०११ साली. तसे बघितले तर, सरासरीने, २०११ हे वर्ष सर्वत्रच अस्थिरतेचे ठरले. ज्या अमेरिकी बँकांनी व वित्तव्यवस्थांनी ऋणकोंची झाडाझडती पुरेशी न घेताच कर्जवाटप केले होते त्या वित्तसंस्था अडचणीत आल्या. परंतु, अशा वित्तसंस्थांमधील उच्चपदस्थ अधिकारी वर्गाचे वेतन, भत्ते यांना मात्र आनुषंगिक कायदेकानू व नियम-संकेतांनुसार संरक्षण मिळाले. कर्जभार माथ्यावर बाळगणाऱ्या ज्या मालमत्ता बँकांच्या पदरी जमा

झालेल्या होत्या त्या एका विशेष उपकरणाद्वारे अमेरिकी सरकारने खरेदी केल्या व बँकांच्या गळ्याभोवतीचा फास मोकळा केला. त्यासाठी सरकारने अर्थातच पैसा वापरला तो सर्वसामान्य अमेरिकी करधारकांचा. त्या सगळ्याची खरी झळ बसली ती बुडलेल्या वित्तसंस्थांपायी आर्थिक पाया पुरता हादरून गेलेल्या सर्वसामान्य बचतदारांना आणि नोकरदारांना. म्हणजेच, दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, 'सब्प्राइम' कर्जांच्या घोटाळ्याचे दुष्कर माप सर्वच संबंधितांच्या पदरात समलक्षी प्रभावाने पडले नाही. त्या वित्तीय अरिष्टापायी मुख्यत: भरडला गेला तो सर्वसामान्य अमेरिकी कर्जदार पांढरपेशा वर्गच. तो सगळा संताप अवचितच प्रगटला तो न्यूयॉर्कमधील झुकोटी पार्कच्या परिसरात १७ सप्टेंबर २०११ या दिवशी – म्हणजे, लेहमन ब्रदर्सने दिवाळखोरी जाहीर केल्यानंतर बरोबर तीन वर्षे पूर्ण होऊन अवघे दोनच दिवस उलटल्यानंतर.

'सब्प्राइम' कर्जांच्या घोटाळ्याचे केवळ फटकेच ज्यांना बसले असे समाजघटक आणि, अमेरिकी अर्थव्यवस्थेतील अवाढव्य आर्थिक विषमतेपायी अस्वस्थ बनलेले सुजाण अमेरिकी नागरिक झुकोटी पार्क परिसरात शांततामय मार्गाने त्यांचा विषाद व्यक्त करत तब्बल ५९ दिवस ठाण मांडून बसून राहिले! 'ऑक्युपाय वॉल स्ट्रीट' असे मोठे अन्वर्थक बारसेदेखील त्या आंदोलनाचे झाले. यथावकाश त्या आंदोलनाचे लोण बघताबघता, कमी–अधिक प्रमाणात, एकूण ९०० शहरांमध्ये पसरले. '१ टक्का विरुद्ध ९९ टक्के' अशी त्या आंदोलनाची एक घोषणा होती. अमेरिकी अर्थव्यवस्थेतील सुबत्तेचे केंद्रीकरण अमेरिकी लोकसंख्येमधील केवळ एक टक्का लोकांकडे झाल्याबद्दल सर्वसामान्यांच्या मनात दाटलेल्या व्यापक असंतोषाचे प्रतिबिंब ती घोषणा मिरवत होती. अतिशय शांततापूर्ण रीतीने, कोणाच्याही एकमुखी नेतृत्वाशिवाय, एकाही राजकीय पक्षाचा सहभाग अथवा पाठिंबा–प्रेरणा नसताना हजारो अमेरिकी नागरिक १७ सप्टेंबर २०११ ते १५ नोव्हेंबर २०११ असे ५९ दिवस झुकोटी पार्क परिसरात सत्याग्रहासाठी बसून राहिले. उभ्या जागतिक समुदायाने त्या संघटित अस्वस्थतेची व असंतोषाची दखल घेतली.

अमेरिकी वित्तीय अरिष्टाचा आर्थिकबाबतीत लक्षणीय फटका जाणवू लागला तो चीनला. त्याचे कारणही अगदी सरळसोपे होते. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाला हात घातल्यापासून – म्हणजे, पार १९७८–७९ सालापासूनच चीनने अवलंबलेल्या निर्यातप्रधान अर्थविकासाच्या प्रारूपाची सारी मदार होती ती अमेरिकी बाजारपेठेवरच. चिनी भूमी आणि चिनी मनुष्यबळ यांचा वापर करून घाऊक प्रमाणावर असंख्य

वस्तूंचे उत्पादन करायचे व ते जगभरात विकायचे, हा चिनी आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचा गाभा होता. तसे असले तरी, चिनी निर्यातीचा मुख्य भर होता तो अमेरिकी बाजारपेठेवरच. आता, वित्तीय अरिष्टापायी नेमकी तीच बाजारपेठ खचल्यामुळे चिनी विकासाच्या 'मॉडेल'चा पायादेखील हादरला. अमेरिकी बाजारपेठेतील मागणीच ढपल्यामुळे चीनमधून तिथे निर्यात होणाऱ्या मालाला असलेला उठाव ढासळला. त्याचा थेट परिणाम जाणवू लागला तो चिनी आर्थिक विकासाच्या वार्षिक सर्वसाधारण दरावर. साखळी-प्रक्रियेद्वारे चिनी अर्थव्यवस्थेच्या आगेकूचीचा वेगही बाधित झाला. त्याच वेळी, आणखीही एक आर्थिक प्रवाह समांतर आकार धारण करत होता. अमेरिकी अर्थव्यवस्थेतील मंदीचा मुकाबला करण्यासाठी बराक ओबामा यांच्या सरकारने उदार अशा पतधोरणाचा प्रयोग २०१० साली दुसऱ्यांदा अवलंबला. परिणामी, अमेरिकी अर्थव्यवस्थेतील डॉलरचा पुरवठा वाढून सरासरी व्याजदरदेखील उतरले. परिणामी, अमेरिकी वित्तसंस्था त्यांच्या अल्पकालीक गुंतवणुकी अन्य देशांकडे वळवू लागल्या. साहजिकच, डॉलरच्या रूपातील गुंतवणुकींचा प्रवाह विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थांकडे वाहू लागल्याने संबधित देशांच्या चलनांचे डॉलरसापेक्ष असणारे विनिमय मूल्य वाढू लागले. साहजिकच, त्या त्या देशांमधील निर्यातदारांना त्याची झळ बसू लागली. त्याबाबत पहिला आवाज उठवला तो चीनने. ही घटना २०१० सालातील. पुढे याच विसंवादाचा अधिक तीव्र स्वर उमटला तो २०१८-१९ साली. त्या वेळी अमेरिकी अध्यक्षपदाची सूत्रे होती डोनाल्ड ट्रम्प यांच्या हाती. वैश्विक अर्थव्यवस्थेचे अमेरिका आणि चीन असे दोन्ही तारणहार, अशा प्रकारे, २०१०-११ सालापासून घसरत्या विकासदराच्या चपेट्यात गुरफटले जाऊ लागले.

स्वातंत्र्याची ओढ - मग ते स्वातंत्र्य आर्थिक असो वा राजकीय - संसर्गजन्य असते. जगातील बहुतेक देशांमध्ये १९८०च्या दशकापासून, कमी-अधिक प्रमाणात का होईना पण, आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या अंगीकाराद्वारे आर्थिक स्वातंत्र्य आणि सुबत्ता यांचा जो फैलाव होऊ लागला त्याचे तरंग मग, यथावकाश, राजकीय जीवनाच्या प्रांतातदेखील उमटू लागले. राजकीय हुकुमशाही आणि त्याच्याच जोडीने भ्रष्टाचार, लाचलुचपत, गरिबी, परकोटीची विषमता आणि बेरोजगारीसारख्या आर्थिक अरिष्टांचा काच यांनी गांजलेले समाजमानस त्या दु:सह परिस्थितीमधून मुक्ततेच्या दिशा शोधू लागले. त्या प्रेरणांचा पहिलावहिला हुंकार उमटला तो २०१० सालातील डिसेंबर महिन्यात ट्यूनिशिया येथे. पोलिसी बळाच्या असह्य काचापायी रस्त्यावरील

एका विक्रेत्याने स्वीकारलेल्या आत्मघाताच्या घटनेचे केवळ निमित्त होऊन ट्यूनिशियामधील नागरिक रस्त्यांवर उतरले. गरिबी, लाचलुचपत, बेरोजगारी यांनी पिडलेल्या ट्यूनिशियातील समाजमानसाचा तो आक्रमक आविष्कार मग पुढे इजिप्तमध्येदेखील संक्रमित झाला. राजकीय तसेच आर्थिक जीवनातील खुलेपणाची तीव्र आकांक्षा व त्यांद्वारे स्वातंत्र्याची सुस्पष्ट मागणी त्या उठावांद्वारे प्रस्फुटित बनली. 'अरब स्प्रिंग' असे त्या उठावांचे नामकरण झाले अथवा केले गेले.

लोकशाहीच्या मागणीचा ट्यूनिशिया आणि इजिप्त येथे जो स्वर २०१० साली उमटला त्याचे पडसाद २०११ साली तितक्याच जोमदारपणे उमटले ते सीरियामध्ये. तेथील सत्ताधाऱ्यांचा हुकुमशाही खाक्या, अर्थव्यवस्थेतील विषमता, गरिबी आणि आर्थिक कुंठितावस्था यांनी गांजलेल्या जनमानसाने तिथे उठाव केला आणि अवचितच तोंड फुटले ते यादवीला. सत्ताधीशांनी तो उठाव दडपण्यासाठी बळजोर पावले उचलली आणि त्यांपायी तिथे निर्माण झालेल्या सर्व प्रकारच्या अस्थिरतेपायी अनेकांनी सीरियातून पावले बाहेर काढण्याचा पर्याय अंगिकारला. परिणामी, चालू झाले सीरियामधून घाऊक प्रमाणावर स्थलांतर होण्याचे पर्व. तो काळ होता २०१५-१६ दरम्यानचा. हे स्थलांतरित साहजिकच वळते झाले ते युरोपातील जर्मनी, टर्की, स्वीडन यांसारख्या देशांकडे. त्यांमुळे त्या देशांमधील स्थानिकांमध्ये अस्वस्थता मूळ धरू लागली. त्याला कारणही तसेच होते. उभ्या पश्चिमी राष्ट्रांच्या मनात घर करून बसलेला होता २००१ सालात अमेरिकेवर इस्लामी मूलतत्त्ववाद्यांनी घडवून आणलेला आत्मघातकी हल्ला. त्यांमुळे, सीरियामधील यादवीला विटून जे स्थलांतरित युरोपीय देशांकडे आश्रयासाठी वळते झाले त्यांना निर्वासित म्हणून स्वीकारण्यास युरोपीय समाज नाखूष होता. तिसरीकडे, जागतिकीकरणाच्या पर्वादरम्यान भांडवलाच्या जोडीनेच श्रमशक्तीचेही देशांतर चालू झाल्यापासून अनेक युरोपीय राष्ट्रांमध्ये बहुसांस्कृतिकतेचा प्रश्न उग्र बनू लागलेला होता. परदेशी व परसांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या समाजघटकांच्या स्थलांतराद्वारे मूलवासियांची एकात्म सामाजिक वीण धोक्यात येत असल्याची भावना अनेक युरोपीय देशांमध्ये प्रगाढ होत चाललेली होती. केवळ इतकेच नाही तर, स्थलांतरितांमुळे देशवासियांच्या रोजगारावर संक्रांत येत असल्याची तक्रारदेखील अंग धरत होती. तसेच, नव्याने बाहेरून येणारे स्थलांतरित देशांतर्गत पायाभूत सेवासुविधांवरील ताण वाढवत असल्याने त्यांचा गुणात्मक दर्जा खालावत चालल्याची खंतदेखील युरोपीय देशांमधील नागरिकांमध्ये दाटत होती.

तसे बघायला गेले तर, 'बहुसांस्कृतिकता' अथवा 'बहुसांस्कृतिकतावाद' ही संकल्पना व वास्तव तसे नवीन नाही. या संज्ञा-संकल्पना व्यापक जनमानसामध्ये स्थिरावल्या त्या १९६० व १९७०च्या दशकादरम्यान. मुख्यत:, दुसऱ्या महायुद्धानंतर एकंदरीनेच नागरी हक्कांबाबतची जाणीव आणि मोठ्या प्रमाणावर गतिमान बनलेले आंतरराष्ट्रीय स्थलांतर यांत बहुसांस्कृतिकतेची मुळे रुजलेली दिसतात. दुसऱ्या महायुद्धाची प्रचंड झळ पोहोचलेल्या ग्रेट ब्रिटन आणि जर्मनी या दोन देशांनी युद्धोत्तर काळात पुनर्बांधणीसाठी हात घातल्यानंतर त्या दोन्ही देशांना श्रमिकांचा मोठाच तुटवडा जाणवू लागला. त्यांतून, अन्य देशांतील श्रमशक्तीची आयात त्या दोन्ही देशांमध्ये चालू झाली. परिणामी, मूळ त्या त्या देशातील लोकसमूहांचा एकजिनसीपणा, सांस्कृतिक पर्यावरण यांत बदल घडून येऊ लागले. क्रमाक्रमाने ते दोन्ही देश बहुसांस्कृतिक बनत राहिले. १९७०च्या दशकाच्या अगदी प्रारंभीच प्रथम कॅनडाने अणि नंतर ऑस्ट्रेलियाने या संकल्पनेचा अंगीकार केला. या प्रक्रियेबाबत प्रथमपासूनच देशोदेशी मिश्र भावभावना स्थानिकांमध्ये नांदत आलेल्या दिसतात. एकीकडे, श्रमशक्तीची गरज आणि दुसरीकडे स्थलांतरितांपायी देशी समाजाच्या सांस्कृतिक एकजिनसीपणात घडून येत असलेल्या बदलापायी अस्वस्थता अशा परस्परविरोधी प्रतिक्रियांचा सामना करतच १९८०च्या दशकपासून बहुसांस्कृतिकतेचा प्रसार-विस्तार जगभरात ठिकठिकाणी होत आलेला आहे. परंतु, इस्लामी मूलतत्त्ववाद्यांनी जागतिक व्यापार संघटनेच्या जुळ्या मनोऱ्यांवर घडवून आणलेल्या आत्मघातकी हल्ल्यांनंतर या प्रक्रियेकडे बघण्याचा जागतिक चष्माच पार बदलून गेला.

केवळ हेच एकमात्र धार्मिक-सामाजिक कारण यांमागे होते असेही नाही. २००८ साली उद्‌भवलेल्या जागतिक वित्तीय अरिष्टापायी वैश्विक अर्थकारणात पसरलेल्या मंदीने सर्वत्रच अस्वस्थता व अस्थिरता नांदत होती. मंदीसदृश वातावरणाचा मुकाबला करण्यासाठी सरकारी खर्चाची अर्थव्यवस्थेला टोचलेली इंजेक्शने शासनसंस्थांच्या तिजोरीतील तुटीचे भगदाड रुंदावण्यास हातभार लावत होती. मंदीपायी हरपलेले रोजगार दुसरीकडून शासनसंस्थांच्या करमहसुलाचे प्रवाह सुकवीत होता. वाढता सरकारी खर्च भागविण्यासाठी कर्जे उभारण्याखेरीज गत्यंतर नव्हते. त्यांतून देशोदेशींच्या सरकारांच्या माथ्यावर कर्जांचा बोजा फुगत चाललेला होता. या दुष्टचक्राला पायबंद घालण्याच्या उपायांचा एक भाग म्हणून सार्वजनिक सुरक्षा कवचांचे आच्छादन अंमळ पातळ करण्याकडे शासनसंस्था प्रवृत्त बनू लागल्या. त्यांपायी देशोदेशींचे नागरिक बेचैन बनू लागले. अशा त्या अस्थिरतेमध्ये

स्थलांतरितांमुळे अधिकच भर पडू लागली. बाहेरून आलेले हे स्थलांतरित स्थानिकांच्या रोजगारसंधींवर घाला घालत आहेत, ही भावना त्या सगळ्या खदखदीमधून अंग धरू लागली. त्या खदखदीला, यथावकाश, मग अस्तर लाभले ते धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक परिमाणांचे. हे पुरेसे नव्हते म्हणून की काय पण फ्रान्स, ब्रिटन, बेल्जियम, जर्मनी यांसारख्या देशांमध्ये २०१५ सालापासून पुढे इस्लामी मूलतत्त्ववाद्यांनी हिंसक हल्ल्यांची जी मालिका जन्माला घातली तिच्यापायी स्थलांतरित आणि मूळ देशवासी यांच्यादरम्यानच्या वांशिक व धार्मिक फरकांचे रूपांतर धार्मिक व सांस्कृतिक संघर्षांमध्ये घडून येऊ लागले. ती भावना आजही जिरलेली नाही. २००८ सालातील वैश्विक वित्तीय अरिष्टातून पुरते सावरण्यास, या सगळ्या घटनाक्रमापायी, वैश्विक अर्थव्यवस्थेला अवधी व उसंतच लाभू शकली नाही. परिणामी, जागतिक अर्थकारणाचे पुनरुज्जीवन क्षीण गतीने होत राहिले. त्यांतून धार्मिक-सामाजिक-सांस्कृतिक विभिन्नतेचे रूपांतर वांशिक-धार्मिक विद्वेषात घडून येण्याच्या मानसिकतेला इंधनपुरवठा जारी राहिला.

या सगळ्या अशा वास्तवाला, मग, जोडला गेला राजकीय पदर! देशोदेशींच्या राजकीय व्यवस्थेतील उजव्या व अति-उजव्या विचारसरणीच्या राजकीय पक्षांचा उदय ही गेल्या दशकभरातील नवीन लाट म्हणजे, अगदी सूक्ष्मपणे बघितले तर, २००८ सालातील ‘सब्प्राइम’ कर्जांच्या अरिष्टातून प्रसवलेल्या आर्थिक मंदीला मिळालेला राजकीय-सामाजिक प्रतिसादच होय. अमेरिकेमध्ये या नवीन राजकीय वाऱ्यांचा हलकासा उगम २०१० सालापासूनच जाणवू लागलेला होता. तो स्वर बळकट बनू लागला तो २०१५ सालानंतर. २०१५-१६ सालापासून सीरियामधून जे स्थलांतरित युरोपकडे वळते झाले त्यांमुळे उजव्या राजकीय विचारसरणीने अवचितच उसळी घेतली. बहुसांस्कृतिकतेबद्दलचे असमाधान हे त्यांमागील एक कारण होतेच. परंतु, साधारणपणे १९८०च्या दशकापासून जागतिकीकरण आणि उदारीकरण या दोन प्रवाहांचे जे चलनवलन जगभरात चालू झालेले होते त्यांच्या लाभालाभांच्या वाटपातील विषमता राजकीय विचारसरणीतील नव्या तरंगांच्या मुळाशी अधिक सघनपणे स्थिरावलेली होती. अर्थकारणातील एकंदरच वाढलेली अस्थिरता, बेरोजगारीची जटिल समस्या, वाढती सरकारी तूट, विरळ होऊ पाहणारे सामाजिक सुरक्षेचे कवच आणि स्थलांतरितांपायी बदलणारी आर्थिक-सांस्कृतिक वीण या सगळ्यांपायी जागतिकीकरणाच्या तसेच आर्थिक खुलेपणाच्या एकंदरच विचारविश्वाबाबत जनमानसामध्ये निर्माण होत असलेल्या प्रतिकूलतेचा लाभ काही

युरोपीय देशांमधील राजकीय शक्तींनी अचूक उठवला. आर्थिक राष्ट्रवादाचा आज सगळीकडेच कमी-अधिक प्रमाणात ऐकू येणारा स्वर ही त्याच वस्तुस्थितीची परिणती ठरते. २०१६ साली अवतरलेल्या दोन मोठ्या घटनांनी उजव्या व अति उजव्या राजकीय विचारसरणीच्या फैलावास व स्वीकारास एकदमच बळ पुरविले.

युरोपीय समुदायातून बाहेर पडण्याचा ब्रिटनचा निर्णय आणि अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे डोनाल्ड ट्रम्प यांच्या हाती जाणे, या त्या दोन घटना. युरोपीय समुदायातून बाहेर पडलेल्या ब्रिटनला कोणकोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते आहे, ते सगळ्यांच्या पुढ्यात आहेच. परंतु, खुल्या जागतिक अर्थकारणाबाबतच्या सार्वत्रिक भावनेला निर्णायक कलाटणी मिळाली ती मात्र ट्रम्प यांनी 'अमेरिका फर्स्ट'चा नारा ज्या जोमदारपणे घुमवला त्यांद्वारे. अमेरिकी अर्थव्यवस्थेतील समस्यांना ट्रम्प यांनी जबाबदार ठरविले ते चीनला. अमेरिकी कंपन्यांचे भांडवल व तंत्रज्ञान आणि तुलनेने स्वस्त असणारे चिनी मनुष्यबळ व जमीन यांच्या साहचर्याद्वारे 'वस्तुनिर्माण उद्योगाचे वैश्विक केंद्र' म्हणून प्रस्थापित झालेल्या चीनपायीच अमेरिकी अर्थव्यवस्थेतील उद्योग आणि रोजगार यांना कसर लागली असल्याचे ऐलान करत ट्रम्प यांनी वैश्विक स्तरावरील व्यापारप्रवाह विस्कटून टाकणारी चढाई आरंभली. त्या लढाईचा शंख त्यांनी फुंकला तो चीनमधून अमेरिकेमध्ये केल्या जाणाऱ्या जिनसा व सेवांवर चढ्या दराने आयातशुल्क आकारण्याचा पवित्रा पुकारून. वास्तविक पाहता, चिनी भूमीवर उत्पादन करावयाचे व ते अमेरिकेसह जगभरातील बाजारपेठांमध्ये विकायचे हे धोरण अमेरिका व चीन या दोन्ही देशांनी १९८०च्या दशकापासूनच अवलंबलेले होते. कारण, ते उभयपक्षी लाभाचे कुरण होते. या व्यापारामधून जमा होणारे आधिक्य (सरप्लस) चीनकडे वाढत राही. तर, आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या अमेरिकी चालू खात्यावर सततचीच तूट दिसे. आपल्या जवळील व्यापारी आधिक्य (ट्रेड सरप्लस) चीन गुंतवत राही अमेरिकी सरकारने भांडवल बाजारात आणलेल्या कर्जरोख्यांमध्ये. हा सौदा दोन्ही देशांच्या पथ्यावर पडणारा असाच होता. अमेरिकी चलनाचा सर्वाधिक साठा जमा केलेला अमेरिकेबाहेरील देश, अशी चीनची ख्याती प्रस्थापित झाली ती याच प्रक्रियेद्वारे. अमेरिकेबरोबरचा व्यापार सतत आपल्याला अनुकूल असाच राहावा यासाठी चिनी युआन आणि अमेरिकी डॉलर यांचा विनिमय दर चीनला लाभदायक ठरावा अशाच पातळीवर चिनी धोरणकर्ते कृत्रिमरीत्या टिकवून धरत असत.

सत्तेवर येताच ट्रम्प यांनी चीनच्या त्याच कार्यपद्धतीबाबत प्रश्न उपस्थित करत आवाज उठवला. अमेरिकी डॉलरबरोबर चिनी युआनचे विनिमयमूल्य चीनच्या पथ्यावर पडेल अशाच पातळीवर कृत्रिमरीत्या रोखून धरण्याच्या चिनी धोरणाचे वर्णन अमेरिकी धोरणकर्त्यांनी 'चलनयुद्ध' अशा शब्दांत केले. चीननेही मग, अमेरिकी बाजारपेठेवरील अवलंबन घटवून अन्य युरोपीय राष्ट्रांच्या बाजारपेठा चाचपून पाहण्याकडे मोहरा वळविला. अमेरिका आणि चीन या दोहोंदरम्यान नांदणारा व्यापारी असमतोल हा चिरकाल हितकारक शाबीत होणार नाही, असा सावधगिरीचा इषारा अनेक अर्थतज्ज्ञ सतत देत होते व आजही देत आहेतच. १९७८-७९ सालापासून अवलंबलेले निर्यातप्रधान आर्थिक विकासाचे प्रारूप चीनने आता बदलावे, असा सूर अर्थवेत्यांच्या वर्तुळातून सतत उमटत राहिलेला आहे. ट्रम्प यांनी उपसलेल्या शुल्कवाढीच्या शस्त्रापायी अमेरिकी बाजारपेठेकडे वळणारी चिनी निर्यात जायबंदी झाल्याने अन्य बाजारपेठा धुंडाळत असतानाच देशी बाजारपेठेची मशागत करण्याकडे चीनने हळूहळू लक्ष पुरविण्यास प्रारंभ केला. चिनी आर्थिक विकासप्रक्रियेच्या तिथवर अवलंबलेल्या धोरणदिशेचा चेहरा पूर्णपणे १८० कोनांमधून वळविण्याचा तो प्रयास, साहजिकच, सोपा अजिबातच नाही आणि नव्हता. गेली सुमारे साडेचार दशके बचतप्रधान मानसिकता जोपासलेल्या चिनी नागरिकांना एकदम उपभोगप्रवण करत खर्चाळू बनवणे, ही एका रात्रीत घडून येणारी बाब नव्हे. त्या परिवर्तनाशी झगडणाऱ्या चीनच्या आर्थिक विकासाचा वार्षिक सरासरी दर त्यांमुळे आजमितीस चांगल्यापैकी खाली आलेला आहे. त्याचे फटके पुन्हा बसत आहेत जागतिक अर्थव्यवस्थेला. कारण, वैश्विक बाजारपेठेतील एक जबरदस्त पुरवठादार आणि खरेदीदार असा चीनचा लौकिक आहे. त्यांमुळे, उत्पादक आणि उपभोक्ता अशा दोन्ही नात्यांनी जागतिक अर्थकारणात वावरणाऱ्या चीनच्या आर्थिक घोडदौडीला लगाम बसताच वैश्विक अर्थकारणात त्याचे विपरित तरंग उमटावेत, हे स्वाभाविकच ठरते.

आपल्या अर्थव्यवस्थेच्या आगेकूचीचा घसरणारा वार्षिक सरासरी दर टिकवून धरण्यासाठी चीनने धोरणात्मक अशी एक जबरदस्त हाराकिरी सुरू केली ती २०१६-१७ सालापासून. चीनने खाक्या अवलंबला तो कृत्रिम नागरीकरणाचा. म्हणजे, अमेरिकी डॉलर आणि चिनी युआन यांच्यादरम्यानचा विनिमय दर आपल्याला सोयीस्कर असणाऱ्या पातळीवर कृत्रिमपणे रोखून धरण्याच्या धोरणाचे फटके वैश्विक स्तरावरील बदलत्या भू-राजकीय व्यवस्थेच्या चौकटीत बसू लागल्यानंतर त्यांवर उपाय म्हणून चीनने पोतडीतून काढलेला दुसरा पर्यायदेखील पुन्हा बेतलेला होता तो

कृत्रिम पायावरच! पण, चीनचा तो प्रयोगही फसला. अगणित खेडी भुईसपाट करून चीनने नवीन नगरे उभारली. खेड्यातील नागरिकांच्या तुलनेत शहरातील नागरिक अधिक खर्चाळू असतात आणि त्यांमुळे शहरीकरणाचे प्रमाण वाढले की शहरी मागणी आणि पर्यायाने देशांतर्गत मागणी सशक्त बनून तिचा आधार चिनी अर्थव्यवस्थेच्या भरधाव आगेकूचीस लाभेल व पश्चिमी राष्ट्रांमधील बाजारपेठांमधून येणाऱ्या मागणीवर चीनचे असणारे परावलंबन नाहीसे होईल, असे तर्कशास्त्र त्या प्रयोगामागे होते. परंतु, खेडेगावांतून सक्तीने शहरांमध्ये स्थलांतरित केल्यामुळे चिनी नागरिकांचा रोजगार, उत्पादकता आणि उत्पन्न यांत आपसूकच सुधारणा घडून येणे कसे काय शक्य होते? नेमके झालेही तसेच आणि कृत्रिमरीत्या उभारलेली शहरे ओस पडली. शहरांमध्ये घरे घेण्यासाठी चिनी गाववासियांनी बँकांकडून घेतलेली कर्जे थकली. परिणामी बँका अडचणीत आल्या. न खपलेल्या घरांच्या मालिकांपायी चिनी बांधकाम व्यावसायिक खचले. त्यांनी घेतलेल्या कर्जांची परतफेड थकली. बांधकाम उद्योग हा अर्थकारणातील एक प्रमुख उद्योग असल्यामुळे त्याच्या भरभराटीवर विसंबलेले सीमेन्ट, पोलाद, रंग, बांधकाम साहित्य, फर्निचर यांसारखे चीनमधील अन्य उद्योगही घसरणीच्या फेऱ्यात गुरफटले गेले. परिणामी, चिनी अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचा वार्षिक सरासरी दर अधिकच रोडावला.

या दणक्यातून चीन जरा कोठे मान वर काढतो न काढतो तोच २०१९ सालातील नोव्हेंबर महिन्यापासून चिनी भूमीवर पाउलखुणा उमटल्या 'कोविड-१९'च्या! बघता बघता ती साथ उभ्या जगात पसरली. २०२० सालातील मार्च महिन्यापासून विश्वव्यापी टाळेबंदी अवतरली. केवळ वैश्विक अर्थकारणच नव्हे तर सगळे मानवी जीवनच जणू ठप्प बनले. सर्व प्रकारच्या संचारावर संपूर्ण पाबंदी आली. घराबाहेर पडणे कल्पनेच्या कक्षेतच नव्हते. ज्यांना घरून कामकाज करणे शक्य होते त्यांचे काहीबाही उद्योग चालू राहिले. मात्र, सगळी उत्पादनव्यवस्थाच ठप्प होऊन पडली. अर्थव्यवस्थेतील जान टिकवून धरण्यासाठी सगळ्यांच शासनसंस्थांनी कंबर कसली. अर्थव्यवहार खुंटल्यामुळे करमहसूलाचे स्रोत आटलेले आणि दुसरीकडे शासकीय तिजोरीद्वारे अर्थव्यवस्था सावरण्याखेरीज गत्यंतरच नाही, अशा कात्रीत जवळपास सगळेच देश सापडलेले असल्याने पुन्हा एकवार तूट आणि कर्जांची जोडगोळी पाठ धरून बसली! केवळ शासनसंस्थाच नव्हे तर, खासगी कॉर्पोरेट विश्वदेखील कर्जाच्या भाराखाली आले. दुसरीकडे, वाहतूक व दळणवळण पूर्णत: खुंटल्यामुळे जगभरातील पुरवठासाखळ्या पुरत्या विस्कटून गेल्या. मालाचा पुरवठा होईना. माल भरलेली

जहाजे बंदरांत अडकून पडलेली होती. परिणामी, सगळीकडेच मागणी आणि पुरवठ्याचे समीकरण विस्कळीत बनले. त्यांमुळे, साहजिकच महागाई चढू लागली. २००१ सालानंतर अवघ्या दोन दशकभरांतच वैश्विक अर्थव्यवस्थेला बसलेला हा तिसरा मोठा धक्का होता. परिणामी, २००८ सालातील वैश्विक वित्तीय अरिष्टाच्या झळा सोसून अंमळ बाहेर पडू पाहत असलेल्या जागतिक अर्थव्यवस्थेच्या पुनरुत्थानाचा प्रवास पुन्हा एकवार बिकट बनला. 'कोविड-१९'चा फेरा जरा कोठे सैल होतो न होतो तोच, २०२२ सालातील फेब्रुवारी महिन्याच्या २४ तारखेला युक्रेनविरुद्ध रशियाने लष्करी मोहिम उघडली आणि, आगीतून निघून फुफाट्यात पडल्यागत जागतिक अर्थकारणाची स्थिती पुन्हा एकवार झाली. २०१४ सालातील फेब्रुवारी महिन्यातच क्रेमिआवर रशियाने कब्जा केल्यापासून युक्रेन आणि रशिया यांचे बिनसलेले होते. रशिया-युक्रेन संघर्षापायी अस्थिरतेचे एक नवीन पर्व वैश्विक समुदायाच्या जीवनमध्ये प्रवेश करते झाले.

या अस्थिरता पर्वाला सामरिक आणि आर्थिक अशी दोन्हीही परिमाणे होती व आहेत. युक्रेन आणि रशिया यांच्यादरम्यानच्या लष्करी संघर्षापायी निर्माण झालेल्या युध्यमान परिस्थितीपायी जगभरात एक प्रकारची अस्वस्थता, अस्थिरता आणि अनिश्चितता यांचा माहौल दाटू लागला. या संघर्षाची अंतिम परिणती काय व केव्हा होणार, याचे उत्तर कोणापाशीच नव्हते व नाही. 'कोविड-१९'च्या फैलावापायी उद्‌भवलेली सार्वत्रिक सचिंतता जरा कोठे निवळू पाहते आहे तोच युक्रेन-रशिया यांच्या संघर्षापायी पुन्हा अशांततेचे ढग गडद बनले. त्याचे मुख्य पडसाद उमटू लागले ते कच्च्या खनिज तेलाच्या उत्पादनावर आणि वाहतुकीवर. खनिज तेलाच्या जागतिक स्तरावरील मागणी व पुरवठ्याचे सूत्र त्यांमुळे बाधित झाले आणि त्याचे प्रतिबिंब तेलाच्या बाजारभावांमध्ये डोकवू लागले.

जसजसे ते युद्ध तापू लागले तसतसे त्या संघर्षाचे आर्थिक परिणामही दिसायला लागले. मुख्यत:, फटका बसला तो जागतिक स्तरावरील पुरवठासाखळ्यांना. काही कळीची खनिजे आणि अन्नधान्ये यांचा जगातील एक मोठा उत्पादक व पुरवठादार देश अशी युक्रेनची ओळख आहे. तीळ आणि सूर्यफूल यांसारख्या तेलबिया, गहू, मका यांसारख्या तृणधान्यांचा एक महत्त्वाचा उत्पादक व निर्यातदार म्हणून युक्रेनची वैश्विक स्तरावरील कृषिउत्पादनांच्या पुरवठासाखळ्यांमध्ये भूमिका कळीची ठरते. उत्तर आफ्रिका, मध्य पूर्व आणि युरोपीय समुदाय या तीन भूभागांमध्ये पसरलेल्या जवळपास १२५ देशांची अन्नसुरक्षा युक्रेनवर अवलंबून आहे. अन्नधान्याच्या पुरवठ्याचे

व वाहतुकीचे जगभरातील ते प्रवाह आहेत त्यांतील ९५ टक्के निर्यात काळ्या समुद्रामार्गे होत असते. युक्रेन व रशिया यांच्या संघर्षापायी तो सागरी मार्ग असुरक्षित बनण्याने अन्नधान्याच्या वाहतुकीचे अन्य पर्यायी मार्ग धुंडाळणे क्रमप्राप्त होऊन बसले.

केवळ अन्नधान्येच नव्हे तर, अत्याधुनिक तंत्रशास्त्राचा वापर करून उत्पादन केल्या जाणाऱ्या काही औद्योगिक जिनसांच्या कच्च्या मालाचा पुरवठादेखील युक्रेन मोठ्या प्रमाणावर करतो. लिथियम, टायटॅनियम, पोलाद, मँगनीज यांसारख्या धातूंचे मोठे साठे युक्रेनच्या भूगर्भात सामावलेले आहेत. विजेवर चालणाऱ्या वाहनांच्या बॅटरी निर्माण करण्यासाठी लिथियमला असणारी मागणी आज सर्वत्र वाढते आहे. सेमिकंडक्टर्सच्या उत्पादनासाठी गरज भासते अशा एका विशिष्ट गुणवत्तेच्या निऑनचा एक मोठा पुरवठादार युक्रेनच आहे. लेझर तंत्रप्रणालीमध्ये वापरले जाणारे दुर्मीळ वायू पुरवतो युक्रेनच. आता, युक्रेनच युद्धात गुरफटला गेल्यामुळे अन्नधान्य तसेच अन्नधान्येतर औद्योगिक जिनसांच्या उत्पादनव्यवस्था पुरत्या विस्कळीत बनल्या. साहजिकच त्याचा प्रतिकूल परिणाम जाणवू लागला त्या उत्पादनांच्या युक्रेनमधून केल्या जाणाऱ्या निर्यातीवर. परिणामी, जगाच्या काही भागांतील अन्नसुरक्षा धोक्याच्या सावटाखाली येण्याबरोबरच अनेकानेक औद्योगिक कच्च्या मालाचा तुटवडा ठायी ठायी जाणवू लागला. त्याची परिणती संबंधित जिनसांच्या भाववाढीमध्ये घडून यावी, हे स्वाभाविकच होते. 'कोविड-१९'च्या दणक्याने पुरती जायबंदी झालेली वैश्विक उत्पादनव्यवस्था आणि पुरवठासाखळी जरा कोठे पूर्वपदावर येण्यास सुरुवात झालेली असतानाच युक्रेन-रशिया संघर्षाचा हा दुसरा हादरा बसला आणि पुन्हा अस्थिरतेचे वारे घुमायला लागले. या संघर्षाचे परिणाम जागतिक समुदाय जरा कोठे अंगवळणी पाडून घेतो न घेतो तोच २०२३ सालातील ७ ऑक्टोबर रोजी 'हमास'ने हल्ले चढवले इस्त्रायलवर. मुळातच कायम स्फोटाच्या मुखावर वसलेल्या गाझा पट्टीचा सारा टापू त्यांपायी संघर्षाच्या खाईत लोटला गेला. त्यांतून सूड आणि प्रतिशोधाचे पर्व गतिमान बनले. पुन्हा एकवार अस्थिरता आणि अनिश्चितता यांचे जागतिक सावट गडद बनले.

'हमास'-इस्त्रायल संघर्ष झडून वर्ष उलटते न उलटते तोच अमेरिकेमध्ये सत्तापालट झाला आणि बायडेन यांच्याकडून अमेरिकी अध्यक्षपदाची सूत्रे पुन्हा एकवार डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडे गेली. अमेरिकी सत्तेची सूत्रे २०१६ साली पहिल्यांदा हाती घेतल्यानंतर 'अमेरिका फर्स्ट'चा नारा घुमवत ट्रम्प यांनी केलेल्या उग्र आर्थिक राष्ट्रवादाच्या आवाहनाच्या स्मृती ताज्या असलेले जगभरातील धोरणकर्ते ट्रम्प यांच्या दुसऱ्या

कारकिर्दीबाबत सचिंत व साशंक होते. एका परीने, ट्रम्प यांनी अशा निरीक्षकांचा अपेक्षाभंग केला नाही! पहिल्या कारकिर्दीतील ‘अमेरिका फर्स्ट’ या घोषणेची जागा, ट्रम्प यांच्या दुसऱ्या सत्ताकाळाच्या प्रारंभी घेतली ती ‘मेक अमेरिका ग्रेट अगेन – मागा’ या घोषणेने. मूळ प्रेरणा उग्र आर्थिक राष्ट्रवादाचीच, परंतु, तिचे शाब्दिक आविष्करण काय ते निराळे, एवढाच फरक. अध्यक्षपदाच्या आपल्या पहिल्या पर्वादरम्यान चीनविरुद्ध उघडलेल्या व्यापारी संघर्षाची आघाडी ट्रम्प यांनी पूर्वीच्याच जोमाने पुन्हा एकवार उघडली ती लगेचच, म्हणजे, २०२५ साली.

खरे म्हणजे, अमेरिकेबरोबर जडलेल्या चिनी व्यापारी संबंधांबाबतचे अमेरिकी दुखणे १९८०च्या दशकापासून ठसठसते आहे. चीन आणि अमेरिका यांच्यादरम्यान ज्या प्रकारचे व्यापारी संबंध नांदत आले त्यांबद्दल ट्रम्प तेव्हापासूनच आवाज उठवत आले. चीनबरोबरील व्यापारादरम्यान अमेरिकी आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या चालू खात्यावर जी तूट फुगते ती कमी करण्यासाठी चीनमधून अमेरिकेमध्ये आयात केल्या जाणाऱ्या मालावर आयात शुल्के जारी केली जावीत, असा धोशा ट्रम्प पूर्वापार लावत आले. ‘वस्तुनिर्माण उद्योगाचे वैश्विक केंद्र’, असा लौकिक संपादन केलेल्या चीनमध्ये अमेरिकेतील वस्तुनिर्माण उद्योग स्थलांतरित झाल्यामुळे अमेरिकी वस्तुनिर्माण उद्योगाला क्षयाने ग्रासून त्याची परिणती अमेरिकी बेरोजगारी वाढण्यात घडून येते आहे, अशी तक्रारवजा खंत ट्रम्प सतत मुखर करत आले. जॉर्ज बुश (दुसरे) आणि बराक ओबामा या दोन माजी अमेरिकी अध्यक्षांनीदेखील चीनमधून अमेरिकी बाजारपेठेत आयात केल्या जाणाऱ्या कापडजन्य जिनसांवर शुल्के आकारण्याबरोबरच आयातीसंदर्भातील ‘कोटा’देखील निश्चित करण्यासारखी पावले उचलून अमेरिकी वस्त्रोद्योग उद्योगाला संरक्षण पुरविणारी पावले उचललेली होती. आता, चीनमधून आयात केल्या जाणाऱ्या जिनसांवर आयात शुल्कांची आकारणी केल्याने अमेरिकी वस्तुनिर्माण उद्योगाचे सक्षमीकरण घडून येण्याच्या वाटा मोकळ्या होतील, असा पवित्रा ट्रम्प खूप आधीपासून घेत आलेले होते. २०१६ साली अमेरिकी अध्यक्षपदाची निवडणूक लढवतेवेळी ट्रम्प यांनी त्यांच्या प्रचारादरम्यान एक कळीचा मुद्दादेखील तोच राखला व निवडणूक जिंकली. ट्रम्प यांचे त्या वेळचे व्यापारविषयक सल्लागार पीटर नव्हॅरो यांनी चीनविरुद्ध व्यापारी युद्ध छेडण्यासाठी ट्रम्प यांना प्रवृत्त केले, अशी एक धारणा तेव्हा होती.

अमेरिकी अध्यक्षपदाची सूत्रे २० जानेवारी २०२५ रोजी हाती घेतल्यानंतर लगेचच, म्हणजे, १ फेब्रुवारी २०२५ या दिवशी, चीनमधून आयात केल्या जाणाऱ्या

वस्तूंवर ट्रम्प यांनी १० टक्के अतिरिक्त शुल्क आकारणी जारी केली. म्हणजे, त्या वेळी त्या त्या वस्तूंवर जे आयात शुल्क अमेरिका वसूल करत होती त्यांत अधिक १० टक्क्यांची वाढ अंमलात आणली गेली. त्याला प्रत्युत्तर म्हणून, ४ फेब्रुवारी २०२५ रोजी, अमेरिकेमधून आयात केल्या जाणाऱ्या काही जिनसांवर चीनने १५ टक्के अतिरिक्त शुल्क जारी केले. म्हणजे, त्या त्या जिनसांवर चीन त्या आधी जितके आयात शुल्क आकारत होते त्यांत अधिक १५ टक्क्यांची भर पडली. हे एवढ्यावरच थांबले नाही. चीनमधून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर अमेरिकेने ३ मार्च २०२५ या दिवशी आणखी १० टक्के शुल्क लादले. म्हणजेच, १ फेब्रुवारी २०२५ ते ३ मार्च २०२५ अशा अवघ्या महिनाभराच्या काळातच ट्रम्प यांनी चिनी आयातीवर वाढीव एकंदर २० टक्के आयात शुल्क आकारले. साहजिकच, चीनने त्यालाही प्रत्युत्तर दिले. अमेरिकेमधून चीनमध्ये आयात केल्या जाणाऱ्या काही शेतमालावर तसेच पशुजन्य पदार्थांवर १० टक्के व १५ टक्के अतिरिक्त आयात शुल्क आकारणीचे ऐलान चीनने ४ मार्च २०२५ रोजी केले. नवीन दराने केली जाणारी ती शुल्कवाढ १० मार्च २०२५ पासून अंमलात यावयाची होती. हे व्यापारी युद्ध त्या नंतरही खुंटले नाही आणि आजही ते पूर्णत: शमलेले नाही. या व्यापारी संघर्षापायी उभ्या जगातील मुक्त व खुल्या व्यापाराच्या मानसिकतेलाच जबर धक्का बसला. केवळ चीनच नव्हे तर, ट्रम्प यांनी अशाच प्रकारची वाढीव शुल्कवाढ मेक्सिको आणि कॅनडामधून अमेरिकेमध्ये आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर जारी केली. या सगळ्यांमुळे, आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक करार-मदारांचा वैश्विक नकाशाच पुरता विस्कटून गेलेला आहे.

अमेरिकेच्या त्या उग्र व आक्रमक आर्थिक राष्ट्रवादाला चीनने मग तितकाच मूँहतोड जबाब दिला तो 'रिसोर्स नॅशनॅलिझम'चे अस्त्र भात्यातून बाहेर काढून! अमेरिकेचे नाक चिमटीत धरण्यासाठी चीनने डाव टाकला तो अवकाश संशोधन, विजेवर चालणाऱ्या मोटरी, नानाविध संरक्षण उत्पादने, हरित ऊर्जा, पुनर्नविनिकरणक्षम ऊर्जा, स्मार्ट फोन्स, वैद्यकीय उपकरणे, सेमिकंडक्टर्स... अशांसारख्या अनेक उद्योगक्षेत्रांना निकडीच्या ठरणाऱ्या दुर्मीळ खनिजांचा (रेअर अर्थ्स) पुरवठा रोखण्याचा. या पूर्वी हेच हत्यार चीनने उपसले होते जपानच्या विरोधात २०१० साली. दुर्मीळ खनिजांचे उत्पादन व पुराठा यांवर निरपवाद प्रभुत्व निर्माण करण्याचे हे शस्त्र पाजळण्याचा अतिशय पद्धतशीर कार्यक्रम चीनने हाती घेतलेला होता तो १९८०च्या दशकापासूनच. दुर्मीळ खनिज घटकांचे माहात्म्य येत्या काळातील तंत्रशास्त्रामध्ये

सतत वाढते राहणार आहे, हे चाणाक्षपणे हेरलेल्या चीनने या उत्पादनक्षेत्रात स्वत:ची मक्तेदारी प्रस्थापित करण्यासाठी आटोकाट प्रयत्न सातत्याने जारी राखले. त्या कष्टांची फळे चीन आज आनंदाने चाखतो आहे.

२०२५ सालातील मे महिन्यात चीनने दिलेल्या त्या बेलाग प्रत्युत्तरापायी कोंडीत सापडलेल्या ट्रम्प यांनी नरमाईचे धोरण स्वीकारले आणि 'तुमचे राहू द्या-आमचे राहू द्या,' असा तडजोडीचा पवित्रा स्वीकारत चिनी जिनसांच्या आयातीवर जारी केलेली वाढीव जबर शुल्कवाढ प्रत्यक्षात अंमलात आणण्याचे वेळापत्रक पुढे ढकलले. व्यापारी युद्धाच्या आघाडीवरील चढाई अंमळ सौम्य केल्यानंतर, पुढच्याच महिन्यात, म्हणजे, २०२५ सालातील जूनच्या २१ तारखेस, अमेरिका आणि इस्त्रायल यांनी संयुक्तरीत्या इराणच्या तीन अणुप्रकल्पांवर बॉम्बहल्ले चढविले. इस्त्रायल आणि इराण यांच्यादरम्या झडत असलेल्या लष्करी संघर्षात, या पद्धतीने, अमेरिकेनेही हस्तक्षेप केला. त्या आधी जवळपास आठ दिवस, म्हणजे, १३ जून २०२५ रोजी इराणी अणुप्रकल्पांवर इस्त्रायलने बॉम्बवर्षाव केलेला होता. सदर इराणी अणुप्रकल्पांमधील कळीची यंत्रसामग्री व भट्ट्या भूगर्भात खोलवर निर्माण करण्यात आलेल्या असल्याने इस्त्रायली बॉम्बहल्ले तिथवर पोहोचू शकले नव्हते. त्या खोलीपर्यंत भूस्तर भेदून मुसंडी मारण्याची क्षमता अमेरिकानिर्मित बॉम्बगोळ्यांमध्ये असल्याने इराणी अणुप्रकल्पांविरुद्ध इस्त्रायलने उघडलेल्या मोहिमेमध्ये अमेरिका सहभागी झाली. १३ जून ते २४ जून २०२५ असे बाराच दिवस हा लष्करी संघर्ष झडला. इराणी राजकीय नेतृत्व, लष्करी अधिकारी, अणुशास्त्रज्ञ यांच्यासह इराणी नागरिकही इस्त्रायलने चढवलेल्या हल्ल्यात मृत्युमुखी पडले. इराणी हवाईतळांचेही त्या बॉम्बवर्षावात भरपूर नुकसान झाले. इस्त्रायलच्या त्या चढाईला इराणनेही त्याच्या परीने प्रत्युत्तर दिले. या सगळ्यांपायी, आखातातील परिस्थिती पुन्हा एकवार अस्थिर, अस्वस्थ आणि अनिश्चित बनली. या सगळ्याचा अंतिमत: प्रभाव पडतो तो खनिज तेलाच्या वैश्विक व्यापारावर.

आर्थिक, सामरिक, व्यापारी अशा विविध आघाड्यांवर सतत काही ना काही उलाढाली करत, जागतिक समुदायाचे निसर्गदत्त नेतृत्व अमेरिकेकडेच आहे व ते तसे राहील, असा संदेश नानाविध परीने प्रगट करणाऱ्या अमेरिकेने तिच्या परराष्ट्रविषयक धोरणनीतीचा जो दस्तऐवज २०२५ सालातील डिसेंबर महिन्यात प्रसिद्ध केला त्याचा सूर आणि नूर मात्र एकदमच निराळा होता व आहे. वैश्विक व्यवस्थेचा कारभारी म्हणून सतत कार्यरत राहण्याच्या आजवरच्या पठडीला मुरड घालून 'अमेरिका

फर्स्ट' या धोरणाचा नेटाने पाठपुरावा करत जगाच्या पश्चिम गोलार्धावरच लक्ष केंद्रीत करण्यावर अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षा धोरणाचा 'फोकस' या पुढे मुख्यत: स्थिर राहील, असे नि:संदिग्ध प्रतिपादन त्या बाडात केलेले आहे. आर्थिक राष्ट्रवादाची कास यापुढेही पक्की धरून ठेवण्याच्या धोरणदिशेचा त्यांत पुनरुच्चार करण्यात आलेला दिसतो. अमेरिकी अर्थकारणाच्या दृष्टीने कळीच्या आणि संवेदनशील गणल्या जाणाऱ्या उत्पादन घटकांच्या तसेच जिनसांच्या देशी निर्मितीवर भर देण्याचा मनसुबा त्यांत अतिशय स्पष्ट नमूद आहे. अशा वस्तूंच्या पुरवठ्यासंदर्भातील परावलंबन क्रमाने घटवत जाण्यावर अमेरिकी कार्यपद्धती यापुढे लक्ष केंद्रीत करेल. विशेषत:, युरोपीय देशांबरोबरील अमेरिकी संबंधांचा आजवरचा ढाचा या पुढे तसाच कायम राहणार नाही, असे स्पष्ट सूचन त्यांत आहे. अमेरिकी सीमा, अमेरिकी अर्थव्यवस्था आणि अमेरिकी सुरक्षाव्यवस्था यांच्या निरंतर सक्षमीकरणाला या पुढे प्राधान्य देत, अन्य देशांबरोबर केलेल्या अथवा करण्यात आलेल्या सुरक्षाविषयक तसेच अन्य व्यापक करारमदारांची निभावणी दुय्यम स्तरावर राहील असे, या अमेरिकी राष्ट्रीय सुरक्षा धोरणविधानाचे निखालस कथन आहे.

चीन आणि भारत या दोन देशांसंदर्भात अमेरिकी राष्ट्रीय संरक्षण धोरणाची दिशा व गाभा नेमका कसा असेल, या संदर्भातील या धोरणविधानाचे सूचन कमालीचे बोलके असेच आहे. चीनच्या सर्वच हालचालींवर, खास करून, तैवानसंदर्भातील चिनी हालचालींवर कडक नजर अमेरिका ठेवेल आणि त्याचबरोबर, चिनी विस्तारवादी व्यूहरचनेवरही बारीक लक्ष ठेवले जाईल, असे हा अहवाल स्पष्ट म्हणतो. चिनी आर्थिक सामर्थ्याचे पारडे दक्षिण आशियात आणि पर्यायाने एकंदरच वैश्विक व्यवस्थेत एकतर्फी वर जाऊ नये या दृष्टीने भारत हा अमेरिकेचा एक कळीचा भागीदार असेल, असे हे धोरणविधान म्हणत असले तरी, या पुढे कोणतेही करारमदार करतेवेळी अमेरिका द्विसंबंधी करारांवरच भर देईल, असेही तेच धोरणविधान स्पष्ट करते. ही बाब येत्या काळातील भारतीय परराष्ट्र नीती आणि भू-राजकीय धोरणाची दिशा यांच्या दृष्टीने कळीची व जोखमीची ठरते, असे या क्षेत्रातील अभ्यासकांचे म्हणणे आहे. कारण, इथून पुढच्या काळात अमेरिका तिचे लक्ष मुख्यत्वे पश्चिम गोलार्धावरच एकवटणार या कथनाचा गर्भित अर्थ, दक्षिण आशिया आणि पर्यायाने पूर्व गोलार्ध हा चीनला त्याचे सत्तापटल विस्तारण्यास जणू काही आंदण दिलेला आहे, असा घेतला जाणार असेल तर ती बाब भारतीय सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय नाजूक ठरते, असा तज्ज्ञांचा इषारा आहे.

एकविसाव्या शतकातील पहिल्या पाव शतकाची वाटचाल ही अशी राहिलेली आहे. गुंतागुंतीची, चढउतारांची, क्रिया-प्रतिक्रियांची, घावडावांची आणि पर्यायाने अस्थैर्याची. वैश्विक समाजाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, औद्योगिक, सामरिक, सांस्कृतिक अशा जवळपास सगळ्यांच प्रांतात सन २००० ते २०२५ या २५ वर्षांदरम्यान परिवर्तनाच्या ज्या लाटा निर्माण झाल्या त्यांची वलये पुढील किमान पाव शतकभर तरी विस्तारत राहतील, असे म्हणणे अवाजवी ठरू नये. मानवी जीवनाचे वस्त्रच इतक्या बहुस्तरीय धाग्यांच्या गुंफणीद्वारे साकारलेले असते की, त्याचा एखादा ताणा-बाणा जरी उसवला तरी उभ्या वस्त्राचीच वीण विस्कटते. मानवी जीवन जसे बहुस्तरीय ताणाबाण्यांचे असते तसेच ते असते गतिमानही. जीवनाच्या एका अंगात निर्माण झालेला प्रवाह केवळ त्या प्रांतापुरताच स्तिमित राहत नाही. गतिमान बनलेल्या त्या प्रवाहाचे तरंग अन्य प्रांतांतील प्रवाहांमध्येदेखील संक्रांत होतात. त्यांतून जन्माला येते ती एकसाखळी प्रक्रिया (चेन रिॲक्शन). हे असे का घडते, या प्रश्नाचे उत्तर अजिबातच अवघड नाही. मानवी जीवनव्यवहार हा कधीच कप्पेबंद नसतो, हे त्याचे साधे व सरळसोपे उत्तर! काठोकाठ भरलेल्या एखाद्या तलावाच्या स्थिर पृष्ठभागावर एखादी लहानशी काडी जरी पडली तरी त्यांमुळे तिथे निर्माण झालेली एककेंद्री लाटांची वलये स्थिरावण्यास बराच वेळ लागतो, हा तर आपला नेहेमीचाच अनुभव आहे. इथे तर प्रश्न आहे तो प्रचंड व्यामिश्रता हाच ज्याचा स्वभाव आहे अशा वैश्विक लोकव्यवहाराची वीण बदलून टाकणाऱ्या गेल्या पाव शतकातील नानाविध प्रवाहांचे शांतवन (झालेच तर) कसे, कधी व कोणत्या प्रक्रियेद्वारे होणार, हा. वैश्विक समुदायाच्या गेल्या पाव शतकी वाटचालीचा धावता मागोवा घेतल्यानंतर, आता, या प्रवासादरम्यान जीवनव्यवहाराच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रांतांमध्ये प्रवाहित झालेल्या प्रधान प्रवाहांची गोळाबेरीज काय निष्पन्न होते, याचे थोडेफार आकलन करून घेण्याचा प्रयत्न करणे अनाठायी ठरू नये.

गेल्या शतकातील सातव्या-आठव्या दशकापासून जगाच्या निरनिराळ्या भागांत जन्माला आलेल्या आर्थिक पुनर्रचना पर्वाचे 'बॅटन' २१व्या शतकाच्या हाती सुपूर्त करतच २०व्या शतकाने निरोपाची पानसुपारी स्वीकारली. लोकव्यवहाराच्या आर्थिक अंगात अवतरलेला खुलेपणा केवळ त्या अंगापुरताच मर्यादित राहील, हे जसे अतार्किक होते तसेच ते अव्यवहार्यदेखील होते, याची चुणूक जागतिक समुदायाने लगेचच अनुभवली. अर्थकारण हे नेहेमीच राजकारणावर बेतलेले राहते. खुले

अर्थकारण आणि बंदिस्त राजकीय व्यवस्था हे साहचर्य विषम शाबीत होते. गोल आकाराच्या बरणीला चौकोनी आकाराच्या बरणीचे झाकण बसवण्याचा प्रयत्न करण्यासारखेच हे होय! १९७०च्या दशकाच्या अखेरीस आर्थिक उदारीकरणास हात घातलेल्या चीनमध्ये तेथील राजकीय व्यवस्थेतदेखील सुसंवादी बदल घडवून आणले जावेत, ही लोकभावना, तीव्र स्वरूपात, उदारीकरणाला हात घातल्यानंतर बरोबर १० वर्षांनी तिआनमेन चौकात प्रगटली. तर, हुकुमशाही प्रवृत्तींच्या हाती राज्यशकट राहिल्याने उद्‌भवलेल्या आर्थिक अनवस्थेपायी अर्थकारणात माजलेली बेरोजगारी, विषमता, गरिबी, लाचलुचपत अशांसारख्या समस्यांपायी गांजलेल्या नागरिकांनी अरबस्तानात उठाव केला तो २१व्या शतकाचे पहिले दशक सरतासरता. राजकीय व्यवस्थेतील कालानुरूप बदलांची मागणी करणाऱ्या लोकभावनेचे प्रगटीकरण या दोन घटनांद्वारे घडले. तर, ज्या वेळी राजकीय व्यवस्थाच अर्थकारणातील बेदिलीला खतपाणी घालते त्या वेळी, राजकीय व्यवस्थेबाबत प्रगाढ अविश्वास मनीमानसी दाटलेले लोकमानस स्वयंपूर्णपणे संघटित असंतोष कसा उघड करते, याची प्रचिती आली ती झुकोटी पार्क परिसरात ठाण मांडून बसलेल्या अगणित अमेरिकी नागरिकांच्या उत्स्फूर्त आंदोलनाद्वारे. 'समाजकारण–अर्थकारण–राजकारण' ही त्रिपुटी परस्परांशी घट्टपणे गुंफलेली असते असेच केवळ नव्हे तर, ती परस्पराश्रयीदेखील असते या वास्तवाची प्रचिती २१व्या शतकातील पहिल्या पाव शतकादरम्यान वारंवार येत राहिली.

अगदी सूक्ष्मपणे बघितले तर या त्रिपुटीदरम्यान रंगलेल्या आंतरखेळाची जी मालिका या सगळ्या काळात उलगडत राहिली तिचे मूळ रुजलेले दिसते ते १९७०–८०च्या दरम्यान वैश्विक स्तरावरच विस्कटलेल्या एका संतुलनामध्ये. शासनप्रणित विकासप्रणालीकडून बाजारपेठप्रणित विकासप्रक्रियेकडे वैश्विक अर्थव्यवहाराच्या क्रमाने घडून आलेल्या संक्रमणाद्वारे, दुसऱ्या महायुद्धापासून तिथवर जागतिक लोकव्यवहारात नांदत आलेले संतुलन भंग पावले. त्या स्थित्यंतराद्वारे गतिमान बनलेला वैश्विक समुदायाचा प्रवास दुसऱ्या समतोलाकडे (इक्विलिब्रियम) चालू आहे. तो दुसरा समतोल नेमका कसा असेल, तो वैश्विक स्तरावर केव्हा अवतरेल याचे काहीही अनुमान निदान आजघडीला तरी बांधता येत नाही आणि ते बांधता येणे तसे अवघडही आहे. तो नवीन समतोल प्रस्थापित होईपर्यंत या संक्रमणपर्वाची सांगता होणार नाही. किंबहुना, नवीन समतोल प्रस्थापित होणे हाच गेली २५ वर्षे सक्रिय असणाऱ्या संक्रमणाचा सांगताबिंदू ठरेल.

जागतिकीकरणाबद्दल असमाधानाचा जो स्वर गेल्या शतकाच्या अखेरच्या पर्वापासून तीव्र बनू लागला त्याला कारणीभूत ठरली ती 'जागतिकीकरण–उदारीकरण–खासगीकरण' या त्रिपुटीच्या व्यवहारातील गतिविधींची निष्पत्ती. जागतिकीकरणाचे लाभ पदरात पाडून घ्यावयाचे तर काही ना काही मात्रेपर्यंत तरी अर्थव्यवहारात खुलेपणा आणणे सगळ्यांच शासनसंस्थांना क्रमप्राप्त होते. त्याच वेळी, अर्थव्यवस्थेच्या कार्यक्षमतेची तसेच उत्पादकतेची सरासरी मात्रा अधिक सुदृढ बनावी, यासाठी खासगी उद्योगक्षेत्राभोवती निर्माण केलेल्या किचकट कायदेकानू आणि कालबाह्य बनलेले नियम यांचा काच सैल करण्याखेरीज अन्य मार्गच नव्हता. 'आर्थिक पुनर्रचना' या संकल्पनेचा गाभा ठरतो तो नेमका हाच. परंतु, 'आर्थिक पुनर्रचना' या संज्ञेची कमालीची विपरित व्याख्या व्यवहारात अंगीकारली गेल्याने सगळीच मसलत बिनसली आणि नासलीदेखील. अर्थव्यवस्थेच्या व्यवस्थापनात सक्रिय असणाऱ्या 'शासनसंस्था' आणि 'बाजारपेठ' या दोन भिडूंच्या कार्यकक्षांची कालानुरूप व परिस्थितीवश पुनर्आखणी, हा 'आर्थिक पुनर्रचना' या संकल्पनेचा वास्तवातील निकोप गाभा अडगळीत लोटला जाऊन, 'आर्थिक पुनर्रचना' अथवा 'खासगीकरण' म्हणजे, शासनसंस्थेने अर्थकारणातून अंग काढून घेणे, असा कमालीचा विपरित आणि विकृत अर्थ व्यवहारात प्रस्थापित झाला! आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या तामिलीद्वारे निर्माण झालेल्या लाभालाभांचे विषम वाटप ही ठरली त्या विषम अर्थनिर्णयाची अवांछित फलश्रुती.

वस्तुत:, आर्थिक पुनर्रचनेद्वारे साकारलेल्या लाभांचे समाजव्यवस्थेत समन्यायी वाटप व वितरण घडवून आणण्यासाठी शासनसंस्थेने स्वत:चे सक्षमीकरण सजगपणे घडवून आणणे अपेक्षित होते. परंतु, त्या ऐवजी सरसहा खासगीकरणाचा वरवंटा तारतम्यहीन कार्यपद्धतीद्वारे प्रवर्तित केला गेला. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या तत्त्वज्ञानाचे खापर, त्या संकल्पनेच्या दूषित आकलनाद्वारे, खुल्या बाजारपेठीय अर्थकारणाच्या कार्यपद्धतीवर आणि त्याच्या मुळाशी असणाऱ्या धोरणतर्कावर फोडले गेले. हे आजही सर्वत्र कमी–अधिक प्रमाणात होताना दिसतेच. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या तत्त्वज्ञानाला निर्माण झालेल्या विपरित प्रतिक्रियेचा हा होय देशी आयाम. तर, त्याच तत्वदिशेविरुद्ध उमटलेल्या प्रतिकूल स्वराचा आंतरराष्ट्रीय आयाम म्हणजे खुल्या व्यापाराच्या विरोधात उघडली गेलेली कडवी आघाडी. वस्तुत:, खुल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराला, सैद्धान्तिक अर्थशास्त्र 'विकासाचे इंजिन' म्हणून

संबोधते, ओळखते व नावाजतेही. १९८०च्या दशकाच्या उत्तरार्धात उदारीकरणाच्या वाऱ्यांनी सर्वत्र हळूहळू जोर पकडण्यास सुरुवात झाल्यानंतर, १ जानेवारी १९९५ या दिवशी अस्तित्त्वात आणले गेलेले 'जागतिक व्यापार संघटना' हे व्यासपीठ, व्यवहारात, देशादेशांदरम्यान विनाविघ्न असा बहुस्तरीय व्यापार बहरण्याच्या वाटा खुल्या करण्याचेच उत्तरदायित्व निभावणार होते. परंतु, प्रत्यक्षात झाले ते अतर्क्य व विपरितच. आज जागतिक व्यापार संघटनेचे नावही कोणी उच्चारित नाही!

हे घडण्यास कारणभूत ठरले ते अमेरिका आणि चीन या उभय देशांनी परस्परांदरम्यान जोपासलेले ऱ्हस्व दृष्टीचे आपमतलबी व्यापारी धोरण. अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे डोनाल्ड ट्रम्प यांनी २०१६ साली पहिल्यांदा हाती घेतलेली असली तरी, चीनबरोबर असणाऱ्या अमेरिकी व्यापारी संबंधांबद्दल कडवी टीका करण्यास त्यांनी प्रारंभ केलेला होता तो २०११ सालापासूनच. २००८ साली अमेरिकी अर्थव्यवस्थेत उद्भवलेल्या वित्तीय अरिष्टापायी अमेरिकी जनमानसात व अर्थकारणात फैलावलेली होती प्रगाढ अस्वस्थता. त्या मन:स्थितीचा फायदा उठवत, चीनबरोबरील व्यापारी संबंध हा ट्रम्प यांनी त्यांच्या निवडणुकीदरम्यान प्रचाराचा केंद्रीय मुद्दा बनवून २०१६ साली निवडणूक जिंकली. 'अमेरिका फर्स्ट'चा नारा कंठरवाने करणाऱ्या ट्रम्प यांना वैश्विक स्तरावरील संस्था व व्यासपीठे आणि त्यांच्या माध्यमातून प्रसृत केल्या जाणाऱ्या अर्थविषयक, सामरिक, पर्यावरणीय तसेच व्यापारविषयक मार्गदर्शक तत्त्वांबाबत कमालीची नफरतच होती व आहे. त्यांमुळे, बहुदेशीय खुला व्यापार बहरावा यासाठी कायदेकानू व मार्गदर्शक संकेत आणि तत्त्वे निर्धारित करणाऱ्या जागतिक व्यापार संघटनेबाबत त्यांना आस्था अथवा ममत्व वाटावे, ही अपेक्षाच मुदलात अवास्तव होती. ट्रम्प यांनी त्यांच्या खाक्याद्वारे ती अपेक्षा रास्तच ठरवली. जागतिक स्तरावरील खुल्या जागतिक व्यापाराच्या तत्वज्ञानाला तेव्हापासून जी मुरड पडली ती पडलीच!

प्रथम जागतिकीकरण, नंतर आर्थिक पुनर्रचना आणि त्याही पुढे जात खुला आंतरराष्ट्रीय व्यापार असा, वैश्विक व्यवस्थेच्या फेरजुळणीला होणाऱ्या विरोधाचा चढता स्वर आणि विस्तार उग्र अशा आर्थिक राष्ट्रवादाचे आलाप आळवले जाण्यात कसा व कधी परिणत झाला, हेदेखील कोणाला नीटसे उमगले नाही. युरोपीय समुदायातून बाहेर पडण्याचे पाऊल ब्रिटनने ३१ जानेवारी २०२० या दिवशी उचलणे हा, आर्थिक राष्ट्रवादाच्या बळकट होत चाललेल्या जाणिवेचा एक प्रखर आणि

ठोस आविष्कार ठरतो. २०२० सालापासून पुढे किमान दोन वर्षे साऱ्या जगाला वेटाळून टाकणाऱ्या 'कोविड-१९'ने जगभरात सर्वत्रच परात्मभावाला एक प्रकारे खतपाणी पुरविले. त्या आधी किमान चार वर्षे, म्हणजे, २०१६ सालापासूनच डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या राजकारणात 'मेक अमेरिका ग्रेट अगेन (मागा)' हा धोशा लावलेला होता. २०१६ साली अमेरिकी सत्तेची सूत्रे पहिल्यांदा आणि २०२५ सालातील जानेवारी महिन्यात दुसऱ्यांदा हाती घेतल्यानंतर ट्रम्प यांनी त्या घोषणेचा गजर अधिक आक्रमकपणे व उच्चस्वरात चालू राखला. अमेरिकी वस्तुनिर्माण उद्योगाचे चीनला होत राहिलेले घाऊक स्थलांतर, त्यांपायी अमेरिकी अर्थव्यवस्थेतील बेरोजगारी, चीनबरोबरील व्यापारी संबंधात अमेरिकी आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या चालू खात्यावरील सातत्यशील प्रचंड तूट... या सगळ्याचे खापर ट्रम्प यांनी फोडले ते उदारीकरणाच्या माथ्यावर. वस्तुत:, २००८ साली अमेरिकी अर्थव्यवस्थेत फुटलेला 'सब्प्राइम' कर्जांचा फुगा, त्यांतून निर्माण झालेली मंदी आणि चीनबरोबरील व्यापारी संबंधांत अमेरिकेच्या खात्यावर सतत फुगत आलेली तूट हे, खुल्या बाजारपेठीय अर्थविचाराच्या सैद्धान्तिक प्रमेयांमधील त्रुटींचे नव्हे तर; उदारीकरणाच्या तत्त्वज्ञानाची अंमलबजावणी अमेरिकी राजकीय व्यवस्थेत सक्रिय राहिलेल्या 'पोलिटिकल इकॉनॉमी'प्रणित व्यावहारिक संरचनेमध्ये ज्या मतलबीपणे होत राहिली त्याचे फलित होते, या मूलभूत वास्तवाकडे सरसहा दुर्लक्ष झाले अथवा केले गेले.

वैश्विक अर्थकारणात उग्र अशा आर्थिक राष्ट्रवादाचा जो स्वर विविध देशांमध्ये कमी-अधिक प्रमाणात घुमतो आहे, त्याच्या मुळाशी ढोबळपणे वसणारा कार्यकारणभाव नेमका असाच आहे. परदेशांमधून आयात केल्या जाणाऱ्या जिनसांवर चढ्या दराने शुल्कआकारणी करण्याचे अस्त्र उपसणे, स्थलांतरावर या ना त्या स्वरूपात पाबंदी जारी करणे, परदेशांतून शिक्षणासाठी अगर नोकरीखातर येऊ इच्छिणाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या प्रवेशांच्या संख्येवर मर्यादा जारी करणे... असे जे उपक्रम ट्रम्प यांनी हाती घेतलेले आहेत त्यांची पाळेमुळेदेखील याच कारणमीमांसेमध्ये रुजलेली सापडतात. 'वस्तुनिर्माण उद्योगाचे वैश्विक केंद्र,' या स्वरूपात चीनचा गेली सुमारे साडेतीन ते चार दशके सातत्याने होत राहिलेला उदय ही केवळ एका हाताने वाजलेली टाळी नाही, हे वास्तव सोयीस्करपणे नजरेआड केले जाते. विरोधाचा झोत मुख्यत: चीनवर रोखून ट्रम्प सातत्याने आर्थिक राष्ट्रवादाचा जो पक्ष हिरिरीने उफळत आले त्याला तितकेच प्रखर व ठोस प्रत्युत्तर चीनने दिले ते साधन राष्ट्रवादाचा

(रिसोर्स नॅशनॅलिझम) उलटा प्रहार करत. दुर्मीळ खनिज घटकांच्या निर्यातीला लगाम लावून अमेरिकी उद्योगांची नाकेबंदी करण्याची धूर्त खेळी चीनकडून खेळली गेल्यानंतर ट्रम्प यांचा तेवर सौम्य झाल्याचे चित्र वैश्विक समुदायाने अलीकडेच बघितले. अर्थशास्त्रीय सिद्धान्तांना किमान व्यावसायिक नीतीमत्तेचे अस्तर बिलगलेले असते आणि त्या अस्तराची व्यवहारात उचित अशी बूज राखायची असते, या मूलभूत अशा मार्गदर्शक तत्त्वाची सरसकट पायमल्ली होत राहिल्याचे हे सगळे परिणाम आज सगळेच भोगत आहेत.

आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाची अंमलबजावणी हाती घेतलेल्या सर्वच देशांमध्ये गेल्या सुमारे चार दशकांमध्ये जो काही आर्थिक विकास साकारला तो कमालीचा ऊर्जासघन असा राहिला. त्यांतून निसर्गसिद्ध ऊर्जासाधनांचा शोध, उत्खनन, शुद्धीकरण, वितरण आणि वापर ही साखळी कमालीची सघन बनलेली आहे. याचे परिणाम वैश्विक लोकव्यवहाराच्या दोन अंगांवर घडले व आजही घडत आहेत. त्यांतील एक अंग आहे भू-राजकीय तर दुसरे अंग आहे पर्यावरणीय. ऊर्जास्त्रोतांवर नियंत्रण राखण्याची सामरिक व्यूहरचना अमेरिका थेट १९९०च्या दशकापासून आखातामध्ये हिंसक आक्रमकतेने राबवत आलेली आहे. तर, (कुटिल हेतूने हाती घेतलेल्या) आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीचे प्रदर्शन घडवत आफ्रिका खंडातील अनेक देशांच्या भूगर्भात पडून राहिलेल्या खनिजसंपत्तीवर आज पक्के नियंत्रण निर्माण केलेले दिसते ते चीनने. ऊर्जास्त्रोतांवर नियंत्रण मिळविण्याच्या या साठमारीपायी आखाती देशांच्या मनात मुख्यत: अमेरिकेविरुद्ध आणि एकंदरीनेच पश्चिमी राष्ट्रांबद्दल जी नफरत वा असंतोष निर्माण होऊन रुजत आलेला आहे त्याचे हिंसक आविष्करण आजवर घडत आलेले आहे ते इस्लामी मूलतत्त्ववाद्यांनी देशोदेशी घडवून आणलेल्या दहशतवादी कारवायांद्वारे. त्या सगळ्यापायी वैश्विक स्तरावर कारणपरत्वे अलीकडे गतिमान बनलेल्या स्थलांतराच्या प्रवाहांना होणाऱ्या विरोधाला धर्मविचाराचा पदर आता चिकटवला जाऊ लागलेला आहे. स्थलांतरितांना सामावून घेण्यास होणाऱ्या विरोधाला आर्थिक कारणांपायी आर्थिक राष्ट्रवादाचा आयाम जोडलेला आहेच; परंतु, त्याही पुढे जाऊन इस्लामी मूलतत्त्ववाद्यांच्या हिंसाचारापायी अर्थकारण आणि धर्मकारण यांची सरमिसळ आता घनिष्ठपणे होते आहे.

आर्थिक राष्ट्रवादाच्या भावनेचा राजकीय व्यवस्थेच्या प्रांतातील एक अलीकडील आविष्कार म्हणजे जगभरातील अनेक देशांमध्ये उजव्या आणि/अथवा अति उजव्या

राजकीय विचारसरणीच्या पक्षांना व ते मांडत असलेल्या भूमिकांना वाढत्या प्रमाणावर लाभत असलेला जनादेश आणि पाठिंबा. युरोपीय समुदायाचा घटक असणाऱ्या अनेक देशांमध्ये उजव्या तसेच अति उजव्या राजकीय विचारसरणीच्या राजकीय पक्षांचा जनाधार अलीकडील काही वर्षांत सातत्याने वाढता राहिलेला आहे. तसे बघितले तर, या प्रवृत्तींकडे २१व्या शतकाच्या पहिल्या दशकापासूनच अनेक देशांमधील लोकमानसाचा ओढा वाढता राहिलेला दिसतो. युरोपीय समुदायाच्या संसदेसाठी नजीकच्याच भूतकाळात झालेल्या मतदानादरम्यान लोकमानसाचा उजव्या राजकीय विचारसरणींकडे असलेला तो ओढा अधिकच सघन बनल्याचे स्पष्टपणे दिसून आले. उजव्या राजकीय विचारसरणीची तळी उचलून धरण्याच्या वाढत्या मानसिकतेच्या मुळाशी केवळ आर्थिक अथवा धार्मिकच नव्हेत तर सांस्कृतिक आयामदेखील एकवटलेले आहेत. स्थलांतरितांबाबत उदार दृष्टिकोन बाळगणाऱ्या डाव्या विचारसरणींपायी परदेशांतून येणाऱ्या स्थलांतरितांना मोकळे रान प्राप्त होते व त्यांपायी आपल्या समाजाची एकात्म अशी सांस्कृतिक वीण विसविशीत होते, अशी खदखद युरोपातील अनेक देशांच्या स्थानिकांच्या मनात खदखदताना दिसते. त्यांतच, अशा स्थलांतरितांमध्ये इस्लामधर्मियांचा भरणा अगर समावेश असेल तर सांस्कृतिक एकात्मतेचा पीळ ढिला होण्याच्या (संभाव्य अथवा कल्पित) भीतीला जोड लाभते ती धार्मिक विद्वेषाच्या कडव्या भावनेची.

उदारीकरणास पूरक अशी अर्थशास्त्रीय धोरणे राबविल्याने त्या पुनर्रचनेद्वारे ज्या समाजघटकांच्या मुखात लोणी पडण्याऐवजी केवळ निखारेच पडले अशा समाजसमूहांच्या कल्याणाची सर्वसाधारण पातळी उंचावण्यासाठी सार्वजनिक खर्चाकडे हात ओणावण्याची आर्थिक धोरणदिशा उजव्या विचारसरणीचे राजकीय पक्ष आताशा अहमहमिकेने अवलंबताना दिसतात. परिणामी, या अशा नव-कल्याणवादापायी युरोपातील अनेक देशांमधील सरकारी तिजोरीवर कर्जांचा बोजा आताशा वाढतो आहे. मुळात, २०२० ते २०२२ या काळात 'कोविड-१९'च्या फैलावापायी ठप्प होऊन पडलेल्या अर्थकारणाला ऊब पुरविण्यासाठी सरकारी खर्चाचे भरभक्कम इंजेक्शन सर्वत्रच टोचले जात होते. त्यांतच, जनमानसाचे तुष्टीकरण शासकीय तिजोरीच्या माध्यमातून करण्याच्या या नवीन खाक्यापायी सार्वजनिक खर्च आणि पर्यायाने शासकीय तूट यांचे आकारमान सर्वत्रच वाढताना दिसते आहे. अत्याधुनिक तंत्रशास्त्राचा अवलंब उत्पादनप्रक्रियेमध्ये सर्वदूर होऊ लागल्याने चांगल्या दर्जाच्या

व उत्पादक स्वरूपाच्या रोजगार संधी सर्वत्रच कमी-अधिक प्रमाणात आक्रसत आहेत. अशा परिस्थितीत, चांगल्या गुणवत्तेचे रोजगार मोठ्या प्रमाणावर निर्माण करून त्यांद्वारे सर्वसामान्यांची क्रयशक्ती टिकवण्या-वाढवण्याऐवजी करकपात, थेट रोख अनुदाने, भत्ते अथवा थेट रकमा हस्तांतरित करून जनसामान्यांची क्रयशक्ती जोपासत त्याद्वारे अर्थकारणाची गती टिकवून धरण्याचा 'शॉर्ट कट' आताशा व्यापक स्तरावर स्थिरावतो आहे.

परिणामी, 'वाढता सरकारी खर्च-शासकीय तिजोरीतील तुटीचे रुंदावणारे भगदाड-ती तूट भरून काढण्यासाठी सरकारची वाढती कर्जउभारणी', हा चक्रमेनिक्रम रूढावलेला आहे. हे विपरित अर्थकारण रोखण्यासाठी जी कठोर राजकीय इच्छाशक्ती निकडीची असते तिची आज वानवा दिसते. अशा आर्थिक बेशिस्तीला चाप लावण्याची धमक राजकीय नेतृत्वाने प्रगट केली की तिचे पडसाद मग उमटतात राजकीय अस्थिरतेच्या रूपाने. २०२२ सालापासून फ्रान्समध्ये नांदत असलेली राजकीय अस्थिरता याच सगळ्या कार्यकारणभावाची निष्पत्ती होय. या सगळ्यांत अंतिमत: बळी जातो तो आर्थिक कल्याणाचा. सर्वसामान्यांच्या जगण्याचा, कल्याणाचा सरासरी स्तर उंचावण्यात आर्थिक वाढ परिणत व्हावी, ही अपेक्षा. परंतु, २१व्या शतकातील पहिल्या पाव शतकाची वाटचाल बघितली तर, आर्थिक वाढ आणि सर्वसामान्यांचे कल्याण यांच्यादरम्यानचा सांधा निखळतो आहे की काय, याची शंका येते. वैश्विक समुदायाच्या सन २००० ते २०२५या पाव शतकी वाटचालीचा आलेख रेखाटावयाचा म्हणले तर तो सर्वसाधारणपणे असा दिसतो.

पुरवणी–१

**‘पालखी कोणाचीही असो, तिचा गोंडा मराठीच हवा!’**

सातारा येथे १ जानेवारी २०२६ ते ४ जानेवारी २०२६ या काळात आयोजित करण्यात आलेल्या ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांच्या अध्यक्षीय भाषणाचा संपादित अंश.

---

पुरवणी–२

**साताऱ्याचा साहित्यिक – सांस्कृतिक वारसा**

सातारा येथे १ जानेवारी २०२६ ते ४ जानेवारी २०२६ या काळात आयोजित करण्यात आलेल्या ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष व महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेन्द्रसिंहराजे भोसले यांच्या भाषणाचा संपादित अंश.

# पुरवणी-१

## 'पालखी कोणाचीही असो, तिचा गोंडा मराठीच हवा!'

■ विश्वास पाटील

माझ्या दृष्टीने ऐतिहासिक साताऱ्याची भूमी म्हणजे, नीरा नदीच्या खळाळत्या पाण्यापासून ते पल्याड कोल्हापुराकडे वारणेच्या जलप्रवाहापर्यंत, तसेच एका बाजूला महाबळेश्वराच्या पर्वतरांगा आणि खाली पूर्वेकडे माणदेश-आटपाडी ते पलीकडे मिरज, कवठे महांकाळपर्यंत पसरलेला जुना विस्तीर्ण मुलूख आमच्या डोळ्यासमोर उभा राहतो. हीच ती पुण्यभूमी, जी थोरल्या शाहू महाराजांच्या वास्तव्याने महत्पदास पोहोचली होती. इथल्या कण्हेरखेडच्या दत्ताजी शिंदेने राघोबादादा, मल्हारराव होळकर आणि समशेर बहादुराबरोबर १७५८ मध्ये अटकेवर मराठ्यांचा भगवा झेंडा फडकावला होता. याच भूमीतले महादजी शिंदे जे दिल्लीचे पाटीलबाबा बनले होते आणि ज्यांच्या इशाऱ्यानुसार हिंदुस्थानच्या गादीवर अर्धा डझन मुघल बादशहा बसले होते. आमच्या छत्रपती शिवरायांच्या जीवनावर अप्रतिम आणि अजरामर काव्य रचना करणारे संत रामदास स्वामी, सातारच्या वैभव आणि स्वायत्ततेसाठी ब्रिटिशांशी संघर्षाचं रान पेटवणारे आमचे थोरले प्रतापसिंह महाराज, त्या प्रजाहितदक्ष राजाची कैफियत मांडण्यासाठी इंग्लंडमध्ये धाव घेणारे, तिथे जाऊन नव्याने इंग्रजी शिकून आपल्या वक्तृत्वाने ब्रिटिशांची पार्लमेंट हादरवून टाकणारे रंगो बापूजी गुप्ते, ज्यांनी 'जगाला राजा मेला तरी न्याय मेला नाही, माझ्या सातारच्या गादीला न्याय मिळालाच पाहिजे' अशा सिंहगर्जना इंग्लंडमध्ये केल्या होत्या. ब्रिटिशांच्या विरोधात रानावनात स्वत:चे गरिबांचे राज्य या भूमीत निर्माण करणारा आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक. ब्रिटिश साम्राज्याला हादरा देणारे प्रतिसरकार निर्माण करणारे आमचे क्रांतिसिह नाना पाटील, जी. डी. लाड, नागनाथ नाईकवडी ते किसन वीर, धनिणीच्या बागेत रयत शिक्षण संस्था स्थापन करून शैक्षणिक क्रांती घडवणारे आमचे कर्मवीर भाऊराव पाटील. तसेच इतिहासाच्या नभांगणात तेजस्वी तारकांसारख्या उजळलेल्या महाराणी ताराबाई, महाराणी येसूबाई, महाराणी दुर्गाबाई,

दिल्लीच्या दरबारात महाराणीचा अचाट अभिनय करून दिल्लीकर बादशहाला स्वत:ला माँसाहेब म्हणून हाक मारायला भाग पाडणाऱ्या मैनावती दासींसह क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्यापर्यंत या भूमीतल्या सर्व थोर माताभगिनींना मी मानाचा मुजरा करतो.

ही भूमी मराठी नवकाव्याचे आद्य प्रणेते बाळ सीताराम मर्ढेकर यांची आणि तत्त्वज्ञानाची पेठ निर्माण करणारे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात उतरणारे ॲड. व्ही. एन. पाटील आणि शेखकाका इथलेच. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर पंडित नेहरू आणि आचार्य कृपलानी यांच्या तेव्हाच्या उत्तर प्रांताचे म्हणजेच आजच्या उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्रीपद सलग सात वर्ष भूषवणारेसुद्धा सातारचे सुपुत्र होते, ज्यांचं नाव होतं पंडित गोविंद वल्लभ पंत. कराड जवळच्या ओंड गावचे ते रहिवासी. शिवाय देश पातळीवर लोकांचा राजा म्हणून गाजलेले औंधचे बाळासाहेब पंतप्रतिनिधी, मालोजीराजे निंबाळकर, हरियाणाचे माजी राज्यपाल गणपतराव तपासे आणि त्रिपुरामध्ये मराठी माणसाचा झेंडा आणि तुरा नाचवणारे आमचे श्रीनिवास पाटील.

सातारा प्रांत म्हणजे एकीकडे इतिहासाच्या धडाडत्या तोफा आणि चौघडे आणि दुसरीकडे लोकसाहित्याचा पदन्यास... घुंगरांचा खणखणाट. यमुनाबाई वाईकर, कांताबाई सातारकर, आक्काताई कऱ्हाडकर, वर्धनगडचा रामा कुंभार, शाहीर साबळे, स्वातंत्र्यशाहीर निकम, दोन लाख लावण्या लिहिणारे शाहीर पठ्ठे बापूराव तसेच भाऊ फक्कड, शाहीर मनवेकर, साहेबराव नांदवळकर, कृष्णाकाठचे गायक व अभिनेते बालगंधर्व, वाटेगाव वाळव्याचे शाहीर अण्णा भाऊ साठे. सातारा प्रांत म्हणजे खऱ्या अर्थी साहित्यरत्नांच्या खाणी. ज्यामध्ये आहेत कृष्णेकाठचे जुन्या पिढीतले महान नाटककार देवल, खाडिलकर तसेच साहित्यात माणदेशाचा मळा फुलवणारे ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर आणि शंकरराव खरात ते वामन ओव्हाळ, कोरेगावचे कादंबरीकार ना. ह. आपटे, ग. ल. ठोकळ, श्री. म. माटे मास्तर, कवी यशवंत, गिरीश, वसंत कानेटकर, लग्नाळू मुलींच्या डोळ्यात सहज गंगा-यमुना उभ्या करणारे आमचे पी. सावळारामदादा ते अलीकडच्या पिढीतील डॉ. आ. ह. साळुंखे, 'उपराकार' लक्ष्मण माने, आमचे मित्र पार्थ पोळके, ग्रामीण कथाकार व. बा. बोधे, 'मी साताऱ्याची गुलछडी मला रोखून पाहू नका' म्हणणारे आणि कोरोनामध्ये जगाचा निरोप घेणारे कवी मच्छिंद्र मोरे. उत्तम सामाजिक कादंबऱ्या लिहिणाऱ्या आटपाडीच्या मेधा पाटील, विट्याचे रघुराज मेटकरी, शेतकरी कवी

सुरेश मोहिते, विजय बाबर, कवयित्री स्वाती शिंदे. दक्षिण महाराष्ट्रात साहित्याचा झेंडा फडकवणारे कथाकार दि. बा. पाटील, ईश्वरपूरचे कवी एकनाथ पाटील, गारगोटीचे चंद्रशेखर कांबळे, बहादूरवाडीचा धनाजी घोरपडे, ज्याचा जामिनावर सुटलेला घोडा थांबायचे नावच घेत नाही. ग्रामीण कथाकार बाबा परीट आणि आप्पासाहेब खोत.

१८७८ मध्ये जे आमचे पहिले मराठी साहित्य संमेलन झाले, ज्याचा उल्लेख; आमच्या महात्मा फुल्यांनी 'घालमोड्यादादांचे संमेलन' असा नेहमी टाळीच्या एका वाक्यासाठी केला जातो त्याच्या पल्याड खोलवर जाऊन तत्कालीन परिस्थितीचा अधिक गांभीर्याने विचार करायला हवा. राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना १८८५ ला झाली. त्याच्याही आधी सात वर्षे आमचं मराठी साहित्य संमेलन जन्माला आलं आहे. म्हणजे या देशाच्या भूत-भविष्याच्या विचाराला आरंभ होण्याआधी मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या गाभ्याला साहित्य संमेलनाने हात घातला आहे.

मुळात न्यायमूर्ती रानडे यांनी साहित्य संमेलनाचा घाट घातला, त्या वेळी त्यांचं वय ३८ वर्षांचं होतं. नंतर बावीस वर्षांनी याच महादेव गोविंदांनी मराठा सत्तेचा उदयास्त नावाचा मौलिक ग्रंथ लिहून प्रबोधनाला खऱ्या अर्थी इथे चालना दिली. देशाच्या आझादीचे आंदोलन असो की, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ किंवा नामांतराचा लढा अगर आणीबाणीसारखा प्रसंग. प्रत्येक ऐतिहासिक आणि निर्णायकी वळणावार मराठी साहित्य संमेलन चार पावले आघाडीवरच राहिले आहे.

१५ ऑक्टोबर १९३८ या दिवशी मुंबईत भरलेल्या २३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बॅरिस्टर विनायक दामोदर सावरकर होते. जेव्हा साहित्यिकांना लेखण्या मोडा आणि तलवारी हाती घ्या, असा संदेश त्यांनी दिला होता, तेव्हा सावरकरांच्या अध्यक्षतेखाली १९३८ मध्ये म्हणजेच ८७ वर्षांपूर्वी भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात दुसऱ्या क्रमांकाचा असा ठराव पास झाला होता की, हिंदुस्थानातील सर्व प्रमुख देशी भाषांची वाढ होऊन, प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच महाविद्यालयीन शिक्षणही त्या त्या प्रांतातील देशी भाषेतून दिले जावे.

जेव्हा जेव्हा भाषेवर, राष्ट्रावर आणि संस्कृतीवर संकट येते. तेव्हा-तेव्हा गेल्या दोनशे वर्षांत सामाजिक नेतृत्वाची आणि प्रसंगी राजकीय पुढाकाराची भूमिकासुद्धा साहित्यिकांनी उचललेली आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनावेळी मोरारजी देसाईंनी आचार्य अत्रे यांना सत्तर दिवस तुरुंगात टाकले. तसेच एका वगनाट्य लेखनाच्या कारणावरून त्याच मोरारजींनी आमच्या शाहीर अण्णा भाऊ साठेंना हद्दपार केले

होते. त्यांनी तुरुंगवासही भोगला होता. कवीच्या हृदयातून आलेले सच्चे शब्द प्रसंगी सत्तेच्या सिंहासनासमोर झुकत नाहीत, हे या भूमीतल्या साहित्यिकांनी वेळोवेळी दाखवून दिले आहे. आमच्या मुंबईचेच नागरिक असलेले प्रसिद्ध कवी मजरुह सुलतानपुरी यांनी एकदा पंतप्रधान पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणावर टीका केली होती. त्याबद्दल मजरुहला दोन वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा झाली. मोरारजी म्हणाले, ''माफी मागा, सुटका होईल.'' कविराज मजरुह बोलले, ''कवीचे प्रांजळ शब्द म्हणजे भात्यातून सुटलेले बाण असतात. दोना ऐवजी चार वर्षांची शिक्षा दिलीत तरी माघार घेणार नाही.''

शंभर वर्षांमागे म्हणजे १९२७ मध्ये केम्ब्रिज विद्यापीठामध्ये जगप्रसिद्ध कादंबरीकार ई. एम. फॉस्टर याने 'द अस्पेक्ट ऑफ नॉव्हेल्स' म्हणजेच कादंबरी वाङ्मयाचे घटक या विषयावर खूप मोठी व्याख्याने दिली होती. कथा, व्यक्तिरेखा, आदी घटकांवर विस्तृत चर्चा केली. पुढे अभ्यासकांनी नाट्य आणि संघर्ष या दोन विशेष घटकांनाही महत्त्वाचे स्थान दिले आहे. कादंबरी हा वाङ्मयप्रकार तर पूर्णत: परदेशी म्हणता येणार नाही. भेदिकीची रात्ररात्रभर चालणारी गाणी, 'सुंबरानं मांडलं गा' म्हणत धनगरांची रात्र रात्रभर ढोल आणि खैताळावर रंगणारी दीर्घ कथानके आणि त्यांचे पट कादंबरीसदृश आहेत. दक्षिण महाराष्ट्र आणि उत्तर कर्नाटकाच्या हद्दीवर एका रेल्वे स्टेशनवरच्या घटनेतून निर्माण झालेली काशीबाईची लावणी, चिल्याबाळाची गोष्ट, बटऊमोहनाचा वग या साऱ्या कथानकांचा पट हा मूलगामी कादंबरी आणि नाटकांचाच पट वाटतो. रामायण आणि महाभारताच्या कथा हा व्यास आणि वाल्मिकीसारख्या शब्दप्रभूंच्या लेखणीचा महाचमत्कार आहे. आपल्याकडे स्वातंत्र्याच्या आंदोलनावर किंवा संयुक्त महाराष्ट्राच्या जनांदोलनाची दाहकता दाखवणारी अगर ज्या पुण्यामध्ये बुद्धीचे बृहस्पती राहतात, त्या पुण्यातल्या पानशेतच्या प्रलयावर एखादी जबरदस्त कादंबरी घडलेली नाही. याच पार्श्वभूमीवर सांगायचे, तर श्रेष्ठ आसामी लेखक श्री. वीरेंद्रकुमार भट्टाचार्य यांची 'लोकांचे राज्य' ही अतिशय उत्कृष्ट कलाकृती मान्य करावी लागेल, जिचे आपल्या कवयित्री शांता शेळके यांनी नितांत सुंदर भाषांतर केले आहे.

या भूमीतल्या शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेला हात घालणारा पहिला बंडवाला विद्रोही साहित्यिक म्हणजे महात्मा जोतिबा फुले, 'ज्यांनी शेतकऱ्यांचा आसूड' नावाची महागाथा १८८१ मध्ये लिहिली. शेतकरी नावाच्या दरिद्रीनारायणाची कैफियत इंग्रज साहेबाला कळावी म्हणून ते सामान्य कुणब्याच्या पेहरावात ब्रिटिश साहेबाला भेटले असे मानतात.

शेतकरी वर्गाची परवड आमच्या सदानंद देशमुख यांनी आपल्या 'बारोमास' कादंबरीमध्ये उत्तम पद्धतीने मांडली आहे. व्यंकटेश माडगूळकरांची 'काळी आई', आनंद यादवांचा 'गोतावळा', उद्धव शेळके यांची 'धग', र. वा. दिघे यांची 'आई आहे शेतात' अशा आमच्या साहित्यकृतींनी शेतकऱ्यांच्या व्यथा आणि वेदना मांडल्या आहेत.

मात्र आज नोकरी नाही, म्हणून प्रत्येक खेड्यात शेकडो मुले बिनालग्नाची आहेत. बेकारीत पोळणाऱ्या मुलाशी लग्न करण्या ऐवजी डोक्यावर अक्षताच न पडलेल्या बऱ्या अशा विचाराने शेकडो मुलींचे विवाह लांबणीवर पडले आहेत. शेतीमालाला भाव नाही. ही भयानक शांतता आणि अस्वस्थता उद्याच्या भीषण भविष्याला आमंत्रण देणारी आहे, हे बिलकुल विसरू नका. १९ मार्च १९८६ रोजी साहेबराव कर्पे नावाच्या चिलगव्हाणच्या शेतकऱ्याने कुटुंबीयांसह पहिली आत्महत्या केली. १९९५ ते २०२२ म्हणजे २७ वर्षांत ९६ हजार २४६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. २०२४ मध्ये हा आकडा २ हजार ६३५ वर गेला आहे. याचा दुसरा सरळ अर्थ दिवसाला सुमारे एक किंवा एकाहून अधिक शेतकरी आजही या महाराष्ट्र भूमीमध्ये आपले जीवन संपवत असतात.

बळीराजांच्या आत्महत्यांचे हे विषारी पर्व म्हणजे या भूमीतील सर्व राजकीय पक्षांचे, समाजाचे नव्हे तर आम्हा लेखक, कलावंतांचेसुद्धा अपयश आहे. मातीतून मोती फुलवणाऱ्या गरीब कष्टकऱ्यांना झाडाला टांगून स्वत:चे जीवन संपवताना किती यातना होत असतील. गेल्या ४४ वर्षांत शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागचे कारण शोधणे आणि त्याचे निवारण करणे हे कोणालाही जमलेले नाही; अन् खरे कारण म्हणजे काय, तर शेतकऱ्याला शेतीचा धंदा करणेच परवडत नाही म्हणून तो म्हणे मरणाला मिठी मारतो. याच्या उलट गेल्या ४४ वर्षांत म्हणजेच जवळपास गेल्या अर्धशतकाच्या प्रवासात, कोणाही सरकारी अधिकाऱ्याच्या कुटुंबाने किंवा त्यांच्या नातेवाइकाने, अगर साध्या नगरपालिकेच्या लोकप्रतिनिधीपासून संसदेपर्यंतच्या कोणत्याही राजकीय पक्षाच्या लोकप्रतिनिधीने अगर त्याच्या जवळच्या नातेवाइकाने सुरू केलेला कोणताही धंदा कधी बुडाला आहे, असे कोणाला दाखून देता देईल का? मग बिचाऱ्या शेतकऱ्यांच्याच वाट्यास हे असे दुःखी जीवन का यावे?

श्रेष्ठ कादंबरीकार बाबू बिरादार यांचे अलीकडेच झालेले दु:खद निधन काळजाला चटका लावून गेले. नांदेड जिल्ह्यात देगलूरजवळच्या खेड्यात राहणारे बिरादार यांनी 'अग्निकाष्ट', 'संभूति', 'अंत:पुरुष' अशा एकाहून एक उत्तम कादंबऱ्या लिहिल्या; पण लाग्याबांध्याच्या दुष्ट वर्तुळात अडकलेल्या आजच्या समीक्षेच्या ठायी बाबूरावांच्या

विराट कर्तृत्वाचा आवाका पकडण्याची ताकद नव्हती. आम्ही अण्णा भाऊंचे पूर्वउदाहरण ध्यानात ठेवून असे सांगू की, आजची मराठी समीक्षा ही तद्दन विद्यापीठीय, संकुचित मनोवृत्तीची आहे. ती नव्या साहित्यिकांसाठी अजिबात स्वागतशील नाहीच, उलट ती साहित्याच्या मंदिरात दुकानदारीसारखी आपापल्या गटांचे ठेले, सवते सुभे तयार करून बसण्यात आनंद मानते.

मराठीचे दालन दलित आत्मचरित्रांनी आणि कवितांनी, तसेच भटक्या विमुक्तांच्या कसदार लेखणीने समृद्ध करून सोडले आहे. आमचे मित्र शरणकुमार लिंबाळे हे तर भारतीय स्तरावर एक 'स्टार' ललित लेखक बनले आहेत. मल्याळी भाषेमध्ये ते इतके लोकप्रिय आहेत की, एकेकाळी तामिळ लोक वि. स. खांडेकर यांना तमिळ लेखकच म्हणायचे. लिंबाळे यांनी मल्याळी भाषेमध्ये असे स्थान मिळविले आहे. आज माय मराठीमध्ये कादंबरी क्षेत्रात अनंत सामंत, रवींद्र शोभणे, आसाराम लोमटे, लक्ष्मण गायकवाड, योगीराज बागुल हे उत्तम कादंबरीकार म्हणून सिद्ध झाले आहेतच. शिवाय आजच्या पिढीचे उत्तम प्रयोगशील कादंबरीकार म्हणून अशोक पवार आणि बाळासाहेब लबडे यांची नावे घ्यावी लागतील.

शिवाय संजय भास्कर जोशी, सुनीता बोर्डे, डॉक्टर क्षमा शेलार, देवीदास सौदागर, सुरेश पाटोळे, प्रणव सखदेव, प्रदीप कोकरे, बबन मिंडे ही नावेसुद्धा महत्त्वाची आहेत. त्या मानाने आपण लोकसाहित्य आणि परंपरेबद्दल लेखन करणाऱ्या उत्तम समीक्षकांकडे दुर्लक्ष करतो. लोकसाहित्याच्या प्रांगणात प्रकाश खांडगे, डॉक्टर विश्वनाथ शिंदे, तसेच प्रभाकर होवाळ, सोपान खुडे, संपतराव पार्लेकर, शामल गरुड, संतोष खेडलेकर ही नावे उत्तम योगदान देताना दिसतात. समीक्षेच्या क्षेत्रात डॉक्टर रणधीर शिंदे यांची चौफेर मुशाफिरी तसेच नितीन रिंढे, मिलिंद कसबे आणि हरिश्चंद्र थोरात यांचे कामही खूप महत्त्वाचे आहे.

कथेच्या प्रांगणात पंकज भोसले, गणेश मतकरी, प्रियांका पाटील, शिल्पा कांबळे, स्नेहा अवसरीकर, मधुकर धर्मापुरीकर ही नावे महत्त्वाची आहेत. प्रज्ञा लोखंडे आणि अनुराधा पाटील यांची कविता दिसामासाने अधिकच प्रगल्भ होताना दिसते. शिवाय महेश केळुस्कर, अशोक बागवे, अरुण म्हात्रे, राजन लाखे, अशोक नायगावकर, अशोक गुप्ते, साहेबराव ठाणगे, किरण येले, इंद्रजीत भालेराव आणि इंद्रजीत घुले, किशोर कदम, कल्पना दुधाळ, दासू वैद्य, मीनाक्षी पाटील, निर्मोही फडके, संजय कृष्णा पाटील, संतोष पवार, सिन्नरच्या मनीषा उगले, नांदेडचे देवीदास तारू, कणकवलीचे मोहन कुंभार यांची कामगिरीही वरच्या श्रेणीची आहे. विशेषतः

महाराष्ट्राच्या जिल्हा परिषदा आणि ग्रामीण भागातून अनेक कवयित्री आणि बालसाहित्यातील मंडळी साहित्यशारदेच्या दरबारात जोमाने पुढे येऊन भर घालताना दिसतात. यामध्ये निशा डांगे, आशा डांगे, सविता जमाले-करंजकर, संजीवनी पाटील, रोहिणी पांडे, अनिता यलमाटे, डॉक्टर स्मिता पाटील, कैलास दौंड ही नावे अग्रेसर आहेत.

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक आणि सामाजिक इतिहासाचा शोध घेताना कृष्णराव केळुसकर गुरुजी या नावाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मालवणाकडे शिक्षकी पेशात काम करणाऱ्या केळुसकर गुरुजींनी छत्रपती शिवरायांच्या अद्यावत चरित्राचा संपन्न वारसा आम्हाला दिला. त्यांच्याच लेखणीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या महापुरुषांला भगवान बुद्धचरित्राचा आरसा दिला. कोणतेही राज्य चालवताना त्याचे अर्थकारण महत्त्वाचे असते. त्यामुळेच शिवरायांनी हिंदवी स्वराज्यासाठी सुरत, जालनापूर, हुबळी, अहमदनगर, जुन्नर, राजापूर ते वेल्लोर आणि जिंजीपर्यंतसुद्धा मुशाफिरी व मोहिमा राबविल्या. हिंदवी स्वराज्याच्या वृद्धीसाठी पैसा उभारला. आजच्या भाषेत निधी निर्माण केला; परंतु शिवरायांच्या स्वराज्याचा पाया हा निधी नव्हे तर न्याय आणि नीतीवर आधारलेला होता आणि जिथे न्याय वेळेत मिळत नाही, तिथे अवनीतीची कळा चढते हे सूत्र शिवरायांनी प्रमाण मानले होते.

चवदार तळ्याच्या वाटेवर असताना डॉ. आंबेडकर यांच्या जीवनात घडलेल्या एका घटनेला दंतकथेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. वाटेतल्या एका गावात गावच्या पंच परमेश्वरासमोर एक वाद काही महिने चालू होता. तो वेळेत निकालात निघत नव्हता. तेव्हा त्या गावातून पुढे जाणाऱ्या गावकऱ्यांनी कायदा क्षेत्रातील अधिकारी व्यक्ती म्हणून आंबेडकरांना सल्ला विचारला, ''न्यायदानाची मुदत किती ठेवावी किंवा लांबवावी?'' तेव्हा गावकऱ्यांच्या भाषेत डॉ. आंबेडकरांनी सांगितले की, ''आपल्या कन्येचे तिच्या पहिल्या बाळंतपणावेळी पोट दुखू लागले असेल तर, त्या नातवंडाच्या जन्माआधीच आवश्यक तो दवा आणि ओवा तिला द्यायला हवा. ते औषध जर तुम्ही दुसऱ्या किंवा तिसऱ्या नातवंडासाठी राखून ठेवाल, तर तो व्यवहारही नव्हे आणि न्यायही नाही.''

आज आम्ही वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस हा मराठी भाषादिन म्हणून साजरा करतो; पण त्याच वेळी याच शिरवाडकरांनी, मंत्रालयाच्या दारासमोर चिंध्या पांघरून माय मराठी उभी आहे, अशी खंत बोलून दाखवली होती. आपल्या स्वातंत्र्याला अर्धशतक लोटल्यावर स्वातंत्र्यदेवीची विनवणी करणारा एक

'फटका' त्यांनी लिहिला होता. ज्याचे पोस्टर बनवून मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी ते सर्व सरकारी कार्यालयांच्या भिंतीवर डकविण्याचे धाडस दाखवले होते. काय होते त्या महाकवीचे शब्द?

*पन्नाशीची उमर गाठली अभिवादन मज करू नका*
*मीच विनविते हात जोडुनी वाट वाकडी करू नका*
*परभाषेतही व्हा पारंगत ज्ञानसाधना करा, तरी*
*माय मराठी मरते इकडे परकीचे पद चेपू नका*

मला वाटते, तात्यासाहेबांनी परक्या भाषेची पाय दाबण्याची ही कल्पना, ज्या महापालिकांनी 'हुरळली मेंढी लागली इंग्रजी लांडग्यांच्या पाठी' अशी वृत्ती जोपासली आहे, त्यांच्यासाठीच खास लिहिल्या असाव्यात.

*करा कायदे परंतु हटवा जहर जातीचे मनातूनी*
*एकपणाच्या मारुनी बाता ऐन घडीला चळू नका*
*जन सेवेस्तव असे कचेरी ती डाकूंची नसे गुहा*
*मेजाखालुनी मेजावरतूनी द्रव्य कुणाचे लुटू नका*
*लाख लाख जण मेले माझ्यासाठी हे विसरू नका*
*मीच विनविते हात जोडुनी वाट वाकडी करू नका*

आजकाल ज्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या एक हजारपेक्षा कमी असेल. तिथल्या ग्रंथपालांचे पद आपण काढून टाकतो; पण मुळात एक हजार विद्यार्थी संख्या असणाऱ्या शाळा प्रत्येक तालुक्यात फक्त चार ते पाच टक्के आहेत. म्हणजे बाकीच्या सर्व शाळांत पाच-पाच, दहा-दहा हजार ग्रंथांची संख्या असताना सरळ त्या ग्रंथालयांना कुलूप लावायचे? यालाच का म्हणायची आपल्या वाचनसंस्कृतीची वाढ? का याला समजायचे आम्ही अभिजात भाषेचे स्वागत? नवी ग्रंथखरेदी पूर्णपणे थंडावली आहे. पूर्वीच्या काळात शासन उत्तम ग्रंथनिर्मितीसाठी स्वस्त कागद पुरवायचे. तसला प्रकार आजकाल नाहीच. उलट नव्याने ग्रंथालये चालू करण्यासाठी प्रेरणा वगैरे द्यायचे सोडूनच द्या. ग्रंथालयांचे नवे प्रस्ताव पूर्णत: बंद करण्याचे फतवे आम्ही आधीच काढले आहेत.

१३ कोटींच्या या समृद्ध ऐतिहासिक महाराष्ट्रामध्ये मराठी ललित पुस्तकांच्या विक्रीची किती दुकाने आहेत? फक्त पस्तीस! या वेळी दारूची दुकाने राज्यभर किती आहेत, हा प्रश्न आम्ही विचारत नाही. महाराष्ट्रात ३६ जिल्हे आहेत. त्यांपैकी २० जिल्ह्यांच्या मुख्यालयामध्ये मराठी पुस्तक विक्रीचे दुकानच नाही. दोन कोटीच्या

वर मुंबई महानगराची लोकसंख्या आहे ज्यामध्ये मराठी पुस्तक विक्रीची दुकाने फक्त पाच आहेत. तीही जुन्या मुंबई शहरात. दादरच्या पुढे मुंबईत मराठी पुस्तक विक्रीचे एकही दुकान नाही. म्हणजे कुठे चालली आहे आमची अभिजात मराठी भाषा?

या राज्यातील सर्व एस. टी. बस स्थानकांवरील आणि रेल्वेस्थानकांवरील वृत्तपत्र आणि पुस्तक विक्री दुकानांची मुद्दाम डोंगरासारखी भाडी वाढवली गेली. मग मिठाईवाले आणि इतर विक्रेत्यांना चढा भाव घेऊन दुकाने देण्याची व्यवस्था झाली. तरी कृपया विशेष लक्ष घालून ही दुकाने माय मराठीसाठी पुन्हा सुरू करण्यात यावी. तसेच राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांच्या व तहसीलदारांच्या कार्यालयासमोर अगदी माफक दरात पुस्तक विक्रीच्या दुकानांना परवानगी देण्यात यावी. जिथे खासगी प्रकाशकांबरोबर शासनाची प्रकाशने आणि साहित्य संस्कृती मंडळ व भाषा विभागाने प्रकाशित केलेले ग्रंथ अग्रहक्काने ठेवण्याची सोय होईल. वाचकांचाही फायदा आणि माय मराठीचीही चांगली सेवा घडेल. मी आज नव्हे तर चार वर्षांपूर्वी नाशिकच्या साहित्य संमेलनाचा उद्घाटक म्हणून असा महत्त्वाचा मुद्दा मांडला होता की, इथे ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना पुरेसे वेतन मिळायला हवे. जिथे एका बाजूला नगरपरिषदांमध्ये आणि महापालिकांमध्ये पाचशे किंवा हजार सफाई कामगारांनासुद्धा उत्तम असे वेतन आपण देतो; का तर ते संपूर्ण नगराची सफाई करतात. त्याच गावातील पाच किंवा दहा ग्रंथालयीन कर्मचारी, जे तुमच्या मनाची मशागत करतात, त्यांना आम्ही काय देतो?

आज एकीकडे आम्ही अभिजात भाषा म्हणत स्वतःच्याच कौतुकाचे ढोल वाजवत फिरत आहोत; पण आम्हा सर्वांचेच वर्तन मायमराठीच्या विकासासाठी तारक नव्हे तर मारक असल्याचे, मी नव्हे तर आमचे नियम, अधिनियम आणि कागदपत्रे सांगतात. केंद्र आणि राज्य शासनाने लेखक आणि प्रकाशक यांच्यावर जो १८ टक्के जी.एस.टी लावला आहे तो तत्काळ रद्द करावा, कारण मुळात प्रकाशन व्यवसायच आतबट्ट्यातला आहे.

शासन नव्हे तर समाजानेसुद्धा ग्रंथ आणि संस्कृतीकडे मोठ्या मनाने पाहायला शिकले पाहिजे. अनेकदा आपल्या कुटुंबातले चार सदस्य मल्टीप्लेक्समध्ये जातात. चारशे रुपयांचे प्रत्येकी एक प्रमाणे पॉपकॉर्न खुशीने खातात आणि ते खाता-खाता, मराठी पुस्तकांच्या किमती खूप भडकल्या असून ३०० रुपयाच्या खाली पुस्तक मिळत नाही, असा गंभीर मुद्रेने विचार करतात. आज घराघरामध्ये आमच्या देव्हाऱ्याचा विस्तार वाढला आहे; पण अनावश्यक धोंड म्हणून घराघरातली व्यक्तिगत छोटी

ग्रंथालये नष्ट झाली आहेत. मराठी भाषेमध्ये जी थोडीफार पुस्तके खपत असतील, त्यांनासुद्धा आज पायरसीच्या वाळवीने हैराण करून सोडले आहे.

२०१२ पासून राज्यातल्या मराठी शाळेच्या कोणत्याही नव्या तुकडीला शासकीय अनुदान मिळत नाही. म्हणजेच गेल्या १३ वर्षांत एकही नवी मराठी शाळा सुरू झालेली नाही. २०२५ मध्ये एका आकडेवारीनुसार एका वर्षात ६५ नव्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांना मंजुरी मिळालेली आहे. एकट्या मुंबईत या कालावधीत १०६ मराठी शाळा बंद करण्याचा आम्ही पराक्रम घडवून आणला आहे. बाहेरगावी काय घडले असेल याची पुरी माहिती नाही. इंग्रजीसारख्या भाषेला कैवारी कमी आहेत म्हणून की काय, मुंबई आणि नागपूरसारख्या महापालिकांनी स्वतःच्या इंग्रजी शाळा सुरू करण्याचा आचरट उद्योग आरंभला आहे. ज्या मराठी शाळांमध्ये २० पेक्षा कमी पटसंख्या असेल तर ती शाळा बंद करून तिथली शाळा जवळच्या दुसऱ्या शाळेत हलवायची आणि ह्या साऱ्या डामरट उद्योगाला 'सक्षमीकरण' असं गोंडस नाव द्यायचं. वास्तवात हे सक्षमीकरण आम्ही मराठी शाळांचं करतोय की, इंटरनॅशनल स्कूलवाल्यांचं, हाच खरा प्रश्न आहे.

या आधी या देशातील तामिळ, संस्कृत, तेलगू, कन्नड, मल्याळी आणि उडिया या सहा भाषांना आमच्या आधी अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला आहे. त्यांनी आपापल्या भाषेचा देव्हाऱ्यांसारखा गौरव चालवला आहे. त्या त्या भाषेचे प्रेमी आणि अभिमानी इतके जागृत आहेत की, तिकडे त्यांच्या मातृभाषेतील शाळांच्या तुकड्या बंद करण्याचा आवाजसुद्धा काढायची कोणामध्ये धमक नाही. उलट आमच्याकडे गेल्या दहा वर्षांतच नव्हे, तर गेल्या ३५ वर्षांपासून शासन आणि प्रशासन हेच मायमराठीचे खऱ्या अर्थी घरचे मारेकरी ठरले आहेत. चिंध्या पांघरलेल्या स्थितीत आम्ही मराठी भाषेलाच नव्हे तर खुद्द तात्यासाहेब शिरवाडकरांना गलितगात्र स्थितीत मंत्रालयासमोर उभे केले आहे.

मी जेव्हा सातवीच्या वर्गात होतो. तेव्हा पट पाच विद्यार्थ्यांचा होता. आजच्यासारखे हे पटसंख्येचे जाचक नियम असते, तर आमची शाळाच झाली नसती. वीस वगैरे सोडा, वर्गात एखादा दुसरा विद्यार्थी असला तरी मराठी शाळा चालायलाच हवी, कारण कोणी सांगावे मराठी शिकणारा तो एक विद्यार्थी उद्याचा ज्ञानेश्वर होईल किंवा दुसरा तुकोबाही असेल.

शिवरायांनी मुंबईवर ताबा मिळवण्यासाठी मुंबई जवळची खांदेरी आणि उंदेरीच्या बेटावर हल्ले चढवले होते.

आमच्या छत्रपती संभाजी राजांनी तर केजविन नावाच्या ब्रिटिश गव्हर्नरबरोबर १६८४ साली लेखीटाकी मुंबई खरेदी करायचा करारच केला होता. त्याची रक्कम ८० हजार पॅगोडा ठरवली गेली होती. या महानगरीचे मूळ रहिवासी कोळी, भंडारी, पाचकळशी, आगरी आणि कुणबी. काय वर्णन करावं या मुंबई नगरीचं.

*मुंबईत उंचावर मलबार हिल इंद्रपुरी*
*कुबेराची वस्ती तिथं सुख भोगती*
*परळात रहाणारे रात्रंदिन राबणारं*
*मिळेल ते खाऊनी घाम गाळती*

मुंबईमध्ये धंदा करण्यासाठी येणारा पहिला गुजराती व्यापारी म्हणजे भीमजी पारीख. हा ईस्ट इंडिया कंपनीच्या मदतीने १६५०च्या दरम्यान इथे आला होता. १८५६ साली मुंबईमध्ये कर्सनदास पटेल या व्यापाऱ्याने कापडाची पहिली गिरणी बांधली. आता दादरमध्ये मराठी माणसांची संख्या अगदीच नावाला उरली आहे. मुंबईच्या गिरणगावातील आणि गिरगावातील आमची ती मूळ माणसे, या धरतीची लेकरे गेली कुठे? आणि हे अतिश्रीमंतांचे आक्रमण आमच्या छाताडावर आले कधी हे आम्हाला उमगलेच नाही. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राला मुंबई आणि मराठी भाषा ही किती त्यागातून आणि त्रासातून मिळाली आहे हे जाणून घ्या. इथल्या जनतेला मराठी भाषकांचे राज्य आणि मुंबई मिळू द्यायचे नाही, अशी कणखर भूमिका दुसऱ्या-तिसऱ्या कोणी नव्हे तर सरदार वल्लभभाई पटेल यांनी घेतली होती. याचे अनेक घसघशीत पुरावे इतिहासात आहेत.

२१ नोव्हेंबर १९५५ या दिवशी मुंबईच्या त्या वेळच्या असेंब्लीमध्ये त्रिराज्य योजनेचा म्हणजेच महाराष्ट्राची मुंबई, महाराष्ट्र आणि गुजरात अशी या राज्याची; तीन शकले करायचा ठराव मांडला जाणार होता. त्यामुळे मुंबईच्या चाळी-चाळीतून 'महाराष्ट्र माझा, महाराष्ट्र माझा' म्हणत मुख्यत: गिरणी कामगार, पांढरपेशे अशा सर्वांचा चार लाखाचा भव्य मोर्चा निघाला होता, ज्याचे नेतृत्व सेनापती बापट यांनी केले होते.

*चकाकली संगीन अन्यायाची फौज उठली कामगारांची*
*शेतकऱ्यांची, मध्यमवर्गीयांची उठला मराठी देश*
*आला मैदानी त्वेष, वैरी करण्या नामशेष*
*गोळी डमडमची छातीवर साहिली*
*माझ्या जीवाची होतीया काहिली*

संयुक्त महाराष्ट्रात आम्ही मुंबई मिळवली, तेव्हा आमची संख्या ५०-५२ टक्के होती. २०११ च्या आकड्यानुसार साधारण ती संख्या ३५ टक्के झाली. आता तर ती त्याहून खूप खाली नीचांकावर जाऊन पोचली आहे. गिरगाव, दादर, पार्ला सारं खाली होत आहे. आम्हां सर्वांच्या डोक्यावरून पुनर्वसन आणि स्थलांतराचा वरवंटा फिरतो आहे; पण 'मलबार हिल इंद्रपुरी' नावाच्या जागेच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव कधी परमेश्वरालासुद्धा स्वप्नात बघायला मिळणार नाही. जेव्हा या भूमीतले हत्ती आणि नवसाचे गणपतीसुद्धा आमचे राहिले नाहीत त्यांना पुन्हा मिळवण्यासाठी आम्ही आता कोणत्या देवाकडे नवस बोलायचा.

माझा इंग्रजी किवा हिंदी भाषेला मुळीच विरोध नाही. आईच्या दुधावर वाढलेले बालक जसे बलवान असते तसेच तिच्या मुखातल्या शब्दावर ते अधिक बलवान बनते. गेल्या ५० वर्षांत महाराष्ट्रातील जे शास्त्रज्ञ आंतराष्ट्रीय स्तरावर गाजले त्यांपैकी ९८ टक्के शास्त्रज्ञ हे मराठीतूनच शिकले होते. गेल्या वर्षी मला फ्रँकफर्टच्या आंतरराष्ट्रीय पुस्तक महोत्सवाला केंद्र सरकारने जर्मनीला पाठवले होते तेव्हा काही शाळांना मी भेट दिली. जर्मनीसारख्या महाप्रगत राष्ट्रातसुद्धा प्राथमिक शिक्षण विद्यार्थ्यांना सक्तीने त्यांच्या मातृभाषेतच दिले जाते.

महात्मा फुल्यांनी हंटर साहेबांसमोर 'या देशातले शिक्षण आमच्याच भाषेत मिळावे,' असा आग्रह धरला होता. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बॅरीस्टर सावरकर असताना त्यांनी प्राथमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण मातृभाषेतूनच मिळायला हवे, असा ठराव केला होता. महात्मा गांधीनींही मृत्यूच्या पाच दिवस आधी या देशातील लोकांची प्रगती ही फक्त मातृभाषेच्या माध्यमातून होऊ शकते, असे सांगितले होते. यापेक्षा कोणाची अधिक प्रमाणपत्रे हवीत? एकूणच मायमराठीच्या अस्तित्वाची लढाई आता आपल्या प्रत्येकाच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचली आहे.

उद्या तुमच्या देव्हाऱ्यावर विठोबासमवेत ज्ञानेश्वर आणि तुकारामाच्या प्रतिमा टिकाव्यात असे वाटत असेल, तर वेळीच झोपेतून जागे व्हा.

तुमच्या खांद्यावर झेंडा कोणत्याही जातीचा, पक्षाचा वा धर्माचा असूदे. त्याचा दांडा हा मराठीच असायला हवा. तुमच्या खांद्यावर पालखी कोणाचीही असू दे तिचा गोंडा मराठीच असायला हवा.

## पुरवणी-२

# सातारानगरीचा साहित्यिक – सांस्कृतिक वारसा

■ शिवेन्द्रसिंहराजे भोसले

साताऱ्याचा इतिहास गौरवशाली आहे, वर्तमान समृद्ध आहे आणि भविष्यही आशादायी आहे, हे मला आज अभिमानानं सांगावसं वाटतं. कृष्णाकाठच्या या ऐतिहासिक भूमीनं 'उत्कट भव्य तेचि' घ्यावे या समर्थ रामदासांच्या वचनाला कायम शिरसावंद्य मानलं, हे इतिहासात डोकावलं तर आपल्याला दिसतं. अज्ञातवासात पांडवांचं अस्तित्व इथं होतं, गौतम बुद्धांच्या नि महावीरांच्या अनुयायांनी येथे सत्य-समतेचा आणि शांतीचा मार्ग सांगितला. आगाशीवाच्या डोंगरावरील बुद्ध लेणी आजही बुद्धकालाचे संदर्भ आपल्याला सांगतात. दोन हजार वर्षांपूर्वी आंध्र भृत्ये येथे राज्य करीत होते. त्या नंतर चालुक्य, राष्ट्रकूट, शिलाहार यादवांनी येथे राज्य केलं. बहमनी कालखंडानंतर १६५९ पर्यंत येथे आदिलशाही होती. १६६३ मध्ये छत्रपती शिवरायांनी साताऱ्याचा आणि परळीचा किल्ला जिंकून घेतला. कोल्हापूरच्या दुसऱ्या भोज राजाने ११९० मध्ये बांधलेल्या सातारच्या किल्ल्याने अनेक समर प्रसंग पाहिले. मराठा साम्राज्यातीत दुर्दम्य अशा इच्छाशक्तीचा तो साक्षीदार ठरला. मुघल मराठा संघर्षात अजिंक्यतारा, परळी असे किल्ले जिंकण्यासाठी औरंगजेबाला प्रदीर्घ संघर्ष करावा लागला होता, हा इतिहास आपल्याला सर्वश्रुत आहे. अजिंक्यताऱ्यावर १७०८ मध्ये शंभूराजेपुत्र थोरल्या छत्रपती शाहूमहाराजांचा राज्याभिषेक झाला. महाराणी येसूबाई, महाराणी ताराबाई यांच्या कर्तृत्वसंपन्न जीवनाचा अनुभव याच अजिंक्यताऱ्याने घेतला. ज्यांच्या संकल्पनेतून सातारा शहर वसलं, विस्तारलं ते प्रजाहितदक्ष राजे श्रीमंत प्रतापसिंहमहाराज यांचा जन्मही याच अजिंक्यताऱ्यावर झाला. इतिहासाचा संपन्न वारसा साताऱ्याने अभिमानाने मिरवला. व्यवस्थेशी दोन हात करणारी अशी ही साताऱ्याची माती आहे. साम्राज्यविस्ताराचा एक भाग म्हणून इंग्रजांनी श्रीमंत छत्रपती प्रतापसिंहांचे राज्य खालसा केले, इंग्रजांच्या कूटनीतीचे ते बळी ठरले. मात्र, अन्यायाविरुद्ध लढण्याची, संघर्ष करण्याची ही

परंपरा पुढच्या काळातही सुरू राहिली. छत्रपती प्रतापसिंहांना न्याय मिळावा म्हणून राजाचे वकील रंगो बापूजी गुप्ते १४ वर्षे इंग्लंडमध्ये झगडले. मात्र, तेथे त्यांना न्याय मिळाला नाही. तेथून परत आल्यावर त्यांनी इंग्रजांविरोधात उठाव केला. त्यांचे पुत्र सीतारामजी गुप्ते आणि त्यांच्या सोळा साथीदारांना साताऱ्याच्या गेंडामाळावर ८ सप्टेंबर १८५७ रोजी इंग्रजांनी फाशी दिली. त्या नंतर १९२०, १९३०, १९४२ या स्वातंत्र्यलढ्याच्या विविध टप्प्यांमध्ये सातारा अग्रस्थानी राहिला. १८५७ च्या बंडामध्ये इंग्रजांविरुद्ध उठाव करणाऱ्या राणी लक्ष्मीबाई यांचे माहेर सातारा जिल्ह्यातील धावडशीचे.

दादासाहेब करंदीकर, भाऊसाहेब सोमण, शंकरराव साठे, गणपतराव तपासे, नाथ घाणेकर अशा शेकडो सातारकरांनी स्वातंत्र्यभक्तीचं दर्शन घडवलं. प्रतिसरकारचे क्रांतिसिंह नाना पाटील, किसन वीर, यशवंतराव चव्हाण, पांडुरंग बोराटे, बापू कचरे, घोरपडे गुरुजी, बर्डे मास्तर यांनी जिद्द, त्याग आणि स्वाभिमानाचं दर्शन घडवून स्वातंत्र्यलढाही गाजवला. इंग्रजांविरुद्ध शड्डू ठोकण्याचं काम तत्कालीन देशभक्त, क्रांतिकारकांनी केलं. पुढं हीच परंपरा तिन्ही सैन्यदलांमध्ये गेले अनेक दशके लढणाऱ्या असंख्य सातारा जिल्हावासीयांनी दाखवली. साहित्य संमेलनाच्या या व्यासपीठावरून स्वराज्यासाठी, स्वातंत्र्यासाठी आणि देशासाठी लढणाऱ्या हजारो ज्ञात-अज्ञात हातांचं स्मरण म्हणूनच मला आवश्यक वाटलं.

**साहित्याची अभिमानास्पद परंपरा**

लेखनाच्या, काव्याच्या क्षेत्रातही साताऱ्यातील नररत्नावली अतिशय दीर्घ अशा परंपरेची आहे, हेदेखील सांगायला हवं. संस्कृत आणि मराठी भाषांसाठी इथल्या मातीतील शब्द वापरण्याची गरज सर्वांत पहिल्यांदा शिवछत्रपतींनी व्यक्त करून 'राज्यव्यवहार कोशा'ची निर्मिती केली. छत्रपती शिवरायांनी त्यांच्या राज्याभिषेकानंतर यवनी शब्दांना देवनागरी भाषेत आणण्याची आपल्या मंत्र्यांना आज्ञा केली. त्या वेळी शिवछत्रपतींच्या आज्ञेवरून या यवनी शब्दांचा आपल्या स्वभाषेत एक कोश करण्यात आला. तोच हा 'राज्यव्यवहार कोश' थोडक्यात उर्दूमधील अर्थातच दख्खनी यवनी भाषेतील शब्दांना मराठीमध्ये आणणारा शब्दसंग्रह. शिवछत्रपतींच्या प्रेरणेने रचल्या गेलेल्या या कोशात १६७८ मध्ये रूढ असलेल्या दक्षिणी उर्दूतील अर्थातच दक्खनी यवनी भाषेतील १००० हून अधिक शब्द आलेले आहेत. या राज्यव्यवहार कोशाची मूळ प्रत तंजावर येथे असून, हा कोश पूर्ण झाल्यानंतर शिवछत्रपतींनी तो नजरेखालून घातला असावा, असे अनेक इतिहासतज्ज्ञांचे मत आहे. शिवछत्रपतींना केवळ राज्य स्थापन करायचे नव्हते, तर रामचंद्रपंत अमात्य

म्हणतात त्याप्रमाणे. ‘नूतन सृष्टी’ निर्माण करायची होती. शेकडो वर्षे राजभाषा फार्सी असल्यामुळे राजव्यवहारातच नाही, तर बोलीभाषेतदेखील अरबी शब्द घुसडले गेले होते. हे मरगळ आलेले समाजजीवन पुन्हा चैतन्यमय करण्यासाठी शिवाजी महाराजांनी हा कोश तयार केला होता. मराठीसह स्थानिक भाषांसाठी त्यांचा आग्रह होता आणि ओघानेच साहित्यनिर्मितीलाही त्यांचे प्रोत्साहनच होते. मराठी, संस्कृत या भारतीय भाषांना राजभाषेचा दर्जा मिळावा म्हणून महाराजांनी केलेले प्रयत्न वाया गेले नाहीत. शिवरायांनी घातलेला पायंडा पुढच्या पिढ्यांनी सांभाळला. ज्येष्ठ इतिहासकार वि. का. राजवाड्यांच्या मते सन १६२८ मध्ये मराठी (+ फार्सी) पत्रलेखनात मराठी शब्दांचे प्रमाण शेकडा १४.४ टक्के होते, ते १६७७ सालामध्ये ६२.७ एवढे आणि १७२८ सालामध्ये ९३.७ टक्क्यांपर्यंत वाढले. अफाट मोगली सैन्याशी धैर्याने आणि असामान्य शौर्याने लढा देणारे शिवछत्रपतींचे पराक्रमी पुत्र संभाजीमहाराजही उत्तम साहित्यिक आणि संस्कृतचे उत्तम जाणकारही होते. संभाजी महाराजांनी ‘बुधभूषण’ हा संस्कृत ग्रंथ, तर ‘नायिकाभेद’, ‘नखशीख’ आणि ‘सातसतक’ हे ब्रज भाषेतले ग्रंथ लिहिले. लहानपणीच कवी कलश, महाकवी भूषण यांसारख्या विद्वानांच्या संपर्कात आल्याने तसेच आपले पिता छत्रपती शिवाजीमहाराजांच्या प्रेरणादायी नेतृत्वाने प्रभावित होऊन त्यांनी हा राज्यनीतीशास्त्रपर ग्रंथ रचला असावा. संभाजीमहाराजांना १६ भाषा अवगत होत्या. छत्रपती संभाजीराजांनी ‘शंभूराज’, ‘नृपशंभू’, ‘शंभूवर्मन’ या नावांनी साहित्यनिर्मिती केल्याची नोंद आहे.

मुघलांच्या सत्तेविरोधात सडेतोड प्रहार करणारे, चंचल मनाला उपदेश करणारे राष्ट्रसंत समर्थ रामदास यांचं आद्यस्मरण करणं अतिशय महत्त्वाचं आहे. देशभर भ्रमंती करून सज्जनगडावर देह ठेवलेल्या रामदासस्वामींनी केलेली साहित्यनिर्मिती अनेक शतकांनंतरही आपल्यासाठी मार्गदर्शक आहे. रोजच्या जगण्यातील तत्त्वज्ञानासह राष्ट्रउद्धारासाठी समर्थांनी दिलेलं योगदान विसरता न येण्याजोगं आहे. साताऱ्याच्या छत्रपती शाहूमहाराजांनीही सातत्याने साहित्य-संस्कृतीच्या विस्तारासाठी आणि लोकशिक्षणासाठी प्रयत्न केले. शाहूमहाराजांचे कुलोपाध्याय सामराज कवींनी रुक्मिणीहरणाची कथा लिहिली होती. सोळाव्या शतकातील कऱ्हाडच्या तिमाण्णा दीक्षितांची अवधूत गीतेवरील टीका, रहिमतपूरच्या तुकाविप्र कवींचे ‘सुदामचरित्र’, औंधाच्या परशुराम प्रतिनिधींचे ‘शिवपार्वती धावा’ हे काव्य, याचाही उल्लेख आवश्यक आहे. छत्रपती प्रतापसिंहमहाराजांनी ‘सभारंजनी’, ‘सिद्धांतविजय’,

'सेवकबोधिनी', 'छंदोमंजिरी' आदी ग्रंथ लिहून घेतले. छापखाना सुरू केला. मुलींसाठी शिक्षणाची व्यवस्था केली. शिवाय त्यांनी स्वत:च्या संग्रहातील पुस्तके देऊन ग्रंथालय सुरू केले. त्यातूनच आज साताऱ्यात दीडशे वर्षांची परंपरा असलेल्या श्रीमंत छत्रपती प्रतापसिंहमहाराज थोरले नगर वाचनालयाचा जन्म झाला. धावडशीचे ब्रह्मेंद्रस्वामी, त्रिपुटीचे गोपालनाथ, पुसेगावचे सेवागिरी महाराज, गोंदवल्याचे ब्रह्मचैतन्य महाराज यांनी आध्यात्मिकतेतून रोजच्या जगण्याचं मर्म आपल्या लेखणी आणि वाणीतून सांगितलं अन् आध्यात्मिक बैठक दिली. रामदास पंचायतनमधील जयरामस्वामी, भोगांवचे वामन पंडित, रंगनाथस्वामी निगडीकर यांचेही योगदान बहुमोल होते.

शिक्षण, समाजकारण, साहित्य या क्षेत्रांत उभे आयुष्य वेचणाऱ्यांमध्ये सामाजिक सुधारणेचे अग्रणी महात्मा फुले यांचा समावेश होतो. खटाव तालुक्यातील कटगुण हे त्यांच्या पूर्वजांचे गाव. त्यांच्या पत्नी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगावही खंडाळा तालुक्यातील नायगाव. या दोघांनी शिक्षणाची कवाडे मुलींसाठी उघडण्याचं केलेलं कार्य वंदनीय आहे, यात शंका नाही. शिक्षणाची गंगा घरोघरी नेणाऱ्या आणि रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाचा सर्वदूर प्रसार करणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील यांचेही स्मरण केल्याशिवाय आपल्याला पुढं जाता येणार नाही. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनीही श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या माध्यमातून गरजूंना शिक्षण देण्याचं काम केलं. 'लोकहितवादीं'नी काही 'शतपत्रे' वाईच्या कृष्णाकाठी लिहिली, तर पुरोगामी विचारांचे गोपाळ गणेश आगरकर कराड तालुक्यातील टेंबूचे. साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांचेही दीर्घ काळ साताऱ्यात वास्तव्य होते. कवी, इतिहासकार म. मो. कुंटे हे माहुलीचे, वाईचे मराठी कोशकार गोडबोले, कोरेगावचे कादंबरीकार ना. ह. आपटे, रेठणे हरणाक्षचे पठ्ठे बापूराव, पुसेसावळीचे हैबती घाटगे... अशा किती तरी लेखक, साहित्यिकांनी साताऱ्याची साहित्यिक परंपरा समृद्ध केली. लेखक, साहित्यिकांची ही परंपरा पुढच्या काळातही सुरू राहिली. रहिमतपूरचे कवी गिरीश, चाफळचे कवी यशवंत, मर्ढ्याचे बा. सी मर्ढेकर, ओंडचे कृ. पां. कुलकर्णी असे अनेक प्रतिभावंत या भूमीने महाराष्ट्राला दिले. स्वतंत्र महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, समाजचिंतक ग. स. अळतेकर, वाईचे धर्मशास्त्राचे गाढे अभ्यासक स्वामी केवलानंद सरस्वती, पालीचे ग्रंथ समीक्षक श्री. के. क्षीरसागर, विश्वकोशाचे सर्वेसर्वा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, महाकवी ग. दि. माडगूळकर, ग्रामीण समाजजीवनाचं यथार्थ

दर्शन घडवणारे व्यंकटेश माडगूळकर, ज्येष्ठ नाटककार बाळ कोल्हटकर, नरूभाऊ लिमये, बाबामहाराज सातारकर, डॉ. सरोजिनी बाबर, बॅ. पी. जी. पाटील, डॉ. नरेंद्र दाभोलकर, देवदत्त दाभोलकर, प्राचार्य शिवाजीराव भोसले, डॉ. यू. म. पठाण, प्रा. रा. ग. जाधव, शाहीर साबळे, शाहीर फरांदे, यमुनाबाई वाईकर नंतरच्या काळात साताऱ्यात वास्तव्य असलेले आपले संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील, 'उपरा'कार लक्ष्मण माने अशा अनेक जणांनी साहित्यिक क्षेत्रात केलेलं काम अतिशय महत्त्वाचं आहे. सर्वांची नावे इथे घेणं शक्य नाही. मात्र, साताऱ्याच्या या मातीत घडलेल्या, काही काळ वास्तव्य असलेल्यांनी सरस्वतीच्या दरबारात रुजू केलेली साहित्यसेवा मोलाची आहे, यात शंका नाही. आज साहित्य संमेलनाच्या निमित्ताने या सारस्वतांचं स्मरणही करणं, 'स्वागताध्यक्ष' या नात्यानं माझं कर्तव्यच आहे, असं मी मानतो.

साहित्य संमेलनाच्या अनुषंगाने सातारा जिल्ह्याच्या साहित्य-सांस्कृतिक जडणघडणीत आणखी एक उल्लेख आवश्यक आहे तो म्हणजे औंध संस्थानाचा. भवानराव ऊर्फ बाळासाहेब पंतप्रतिनिधी १९०९मध्ये संस्थानच्या गादीवर बसल्यानंतर संस्थानिक म्हणून त्यांची कारकीर्द संस्मरणीय ठरली. विद्या, कला आणि शरीरसौष्ठव यांच्याविषयी त्यांना प्रचंड आस्था होती. औद्योगिक प्रगतीच्या ध्यासातून त्यांनी किर्लोस्कर, ओगले आदी उद्योगपतींना साहाय्य केले. स्वदेशी आणि साक्षरता यांचा पुरस्कार करून सक्तीचे मोफत शिक्षण १९२७ पासून सुरू केले होते. स्वत: अतिशय उत्तम चित्रकार असणाऱ्या बाळासाहेबांनी अजंठा-वेरुळ येथील चित्र-शिल्पांविषयी केलेले लेखन एक मार्मिक कला समीक्षा म्हणून वाचनीय आहे. १९३५ मध्ये इंदूरला झालेल्या साहित्य संमेलनाचे ते अध्यक्षही होते. औंधमधील यमाई श्रीनिवास विद्यालयातून शिक्षण घेतलेल्या पाच जणांनी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद गाजवले. स्वतः भवानराव, ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, ना. सं. इनामदार आणि शंकरराव खरात असे अध्यक्ष या शाळेने दिले. या शिवाय कवी यशवंत, श्री. के. क्षीरसागर, कवी वसंत बापट, वसंत कानेटकर हे संमेलनाध्यक्षही साताऱ्यानेच दिले. साने गुरुजींचे शिक्षणही याच औंधच्या शाळेत झाले, तर नाटककार शं. ना. नवरेही याच शाळेचे माजी विद्यार्थी होते. त्यामुळे आज संमेलनाच्या व्यासपीठावरून औंधच्या या उज्ज्वल परंपरेचा उल्लेखही आवश्यक आहे.

## उजळणी

# विद्यमान लोकशाहीच्या यशस्वी कामकाजाच्या पूर्वावर्ती शर्ती

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तारीख २२ डिसेंबर १९५२ रोजी पुणे येथील पूना डिस्ट्रिक्ट लॉ लायब्ररी येथे केलेल्या भाषणाचा संपादित अंश. कोणत्याही देशात लोकशाही राज्यपद्धती व्यवहारात अर्थपूर्णरीत्या नांदण्यासाठी ज्या अनिवार्य पूर्वअटींचा उहापोह बाबासाहेबांनी त्यांच्या विवेचनादरम्यान केला त्याची प्रस्तुतता आज अणुभरदेखील उणावलेली नाही. बाबासाहेबांचे हे विचारगर्भ विवेचन म्हणजे, खऱ्याखुऱ्या लोकशाही पद्धतीच्या अपेक्षित बिंबाशी, प्रजासत्ताकाचे बिरुद मिरवणाऱ्या व्यवस्थेत उमटणारे प्रतिबिंब तुळून बघण्यासाठी बाबासाहेबांनी आपल्या हाती दिलेला आरसाच जणू! भारतीय संविधानाच्या स्वीकाराचे पाऊण शतक ओलांडून सुरू होत असलेल्या आपल्या वाटचालीच्या या टप्प्यावर, बाबासाहेबांनी आपल्या हाती सुपूर्त केलेल्या या आरशात डोकवून बघण्याची तसदी आपण घेणार किंवा नाही, एवढाच काय तो प्रश्न आहे.*

आजच्या या संध्याकाळी मी आपणासमोर ज्या विषयावर बोलणार आहे तो विषय माझ्या शब्दात सांगावयाचा म्हणजे लोकशाहीच्या यशस्वी कामकाजाच्या पूर्वावर्ती शर्ती असा असेल, कोणत्याही प्रकारचा अडथळा नसताना लोकशाही शासनव्यवस्था कार्यरत व्हावी यासाठी ज्यांचे अस्तित्व आवश्यक आहे अशा पूर्वावर्ती शर्ती कोणत्या आहेत? याच विषयावर काही विचार मांडण्याचा माझा मानस आहे.

विषयाला प्रत्यक्ष सुरुवात करण्याच्या अगोदर मी ज्याला विषयाची मांडणी म्हणतो त्याला पूरक असे काही प्राथमिक विचार मी आपणासमोर प्रथम सांगणार आहे. मला प्रस्तुत करावयाचा पहिला प्राथमिक विचार असा आहे की, लोकशाहीचे प्रकार नेहमीच बदलत आले आहेत. आपण लोकशाही संबंधाने बोलतो परंतु

लोकशाही नेहमीच सारखी नसते. ग्रीक लोक 'अथेनिअन' लोकशाही संबंधाने बोलले. परंतु प्रत्येकाला कल्पना आहे की 'अथेनिअन' लोकशाही ही आधुनिक लोकशाहीपासून इतकी भिन्न आहे की जितके लोणी खडकापासून भिन्न असते. 'अथेनिअन' लोकशाहीमध्ये अशा लोकांचा अंतर्भाव होता की ज्यांच्यामध्ये ५० टक्के लोक गुलाम होते, फक्त ५० टक्केच लोक स्वतंत्र होते. जे ५० टक्के लोक गुलाम होते त्यांना शासनात कसलेच स्थान नव्हते. म्हणूनच आपली लोकशाही 'अथेनिअन' लोकशाहीपासून निश्चितच भिन्न आहे. एक प्राथमिक विचार म्हणून दुसऱ्या एका गोष्टीकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. ती म्हणजे एकाच देशामध्ये लोकशाही नेहमीच सारखी नसते. आपण इंग्लंडचा इतिहास विचारार्थ घ्यावा. कोणीही असे म्हणू शकत नाही की, सन १६८८ मधील इंग्लिश क्रांतीच्या अगोदरची इंग्लिश लोकशाही, त्या क्रांतीनंतरच्या लोकशाहीसारखीच होती. तसेच, असेसुद्धा कोणी म्हणू शकत नाही की, पहिला सुधारणा कायदा पास झाला त्या काळातील म्हणजे सन १६८८ व १८३२ या सालात अस्तित्वात असलेली लोकशाही तो कायदा पास (सन १८३२) झाल्यानंतरच्या परिणत झालेल्या लोकशाही सारखीच होती. लोकशाहीचे स्वरूप सारखेच बदलत राहते.

तिसऱ्या एका गोष्टीकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो आणि ती म्हणजे लोकशाहीचे केवळ स्वरूपच बदलत नाही तर लोकशाहीच्या हेतूमध्ये देखील वेळो-वेळी बदल होत जातो. आपण प्राचीन इंग्लिश लोकशाही विचारात घ्या, त्या लोकशाहीचा हेतू काय होता? राजाला पायबंद घालणे, तसेच आपण ज्याला कायद्याच्या भाषेत परमाधिकार म्हणतो त्या अधिकारांच्या अंमलबजावणीपासून राजाला परावृत्त करणे हाच लोकशाहीचा हेतू होता. राजाची मजल त्या वेळी असे सांगण्यापर्यंत गेली होती की, ''कायदा करणारी एक संस्था म्हणून जरी संसद अस्तित्वात असली तरी मी एक राजा म्हणून मला कायदा करण्याचा परमाधिकार आहे आणि माझाच कायदा सर्वश्रेष्ठ आहे.'' राजाच्या या स्वयंसत्ता पद्धतीमुळेच लोकशाही अस्तित्वात येऊ शकली.

सध्या लोकशाहीचा हेतू काय आहे? राजाच्या स्वयंसत्ताकपद्धतीला जास्तीतजास्त पायबंद घालणे हा विद्यमान लोकशाहीचा हेतू नसून जनसामान्यांचे कल्याण करणे हाच तिचा हेतू आहे. हाच लोकशाहीच्या हेतूमधला लक्षणीय बदल आहे आणि म्हणून माझ्या विषयाला मी जे शीर्षक दिले आहे त्यामध्ये आपल्या हे दृष्टोत्पत्तीस येईल की, ''विद्यमान लोकशाहीच्या यशस्वी कामकाजाच्या पूर्वावर्ती शर्ती'' ह्या शब्दप्रयोगाचा मी जाणीवपूर्वक उपयोग केला आहे.

लोकशाही म्हणजे आपण काय समजतो? विषयाला सुरवात करण्याच्या अगोदर आपणाला या विषयाची स्पष्ट कल्पना आली पाहिजे. आपणास याची जाणीव आहे की, राज्यशास्त्राच्या लेखकांनी, तत्त्वज्ञांनी आणि समाजशास्त्रज्ञ अशासारख्या पुष्कळशा लोकांनी लोकशाहीची व्याख्या केली आहे. माझ्या मुद्याचे स्पष्टीकरण व्हावे या उद्देशाने मी फक्त दोनच व्याख्यांचे आपणासमोर विवेचन करणार आहे. आपणापैकी किती लोक वाल्टर बेगहॉट यांनी ब्रिटिश संविधानावर लिहिलेल्या प्रसिद्ध ग्रंथाशी परिचित आहेत याची मला कल्पना नाही; परंतु तो ग्रंथ म्हणजे लोकशाहीचा सत्य आराखडा सांगण्याचा पहिलाच आधुनिक प्रयत्न आहे. वाल्टर बेगहॉट यांचा उपरोक्त ग्रंथ जर आपण पाहिला असेल तर त्याने 'चर्चेतून चालणारे शासन' अशी लोकशाहीची व्याख्या केल्याचे आपणास आढळेल.

दुसरे उदाहरण घ्या आणि ते म्हणजे अब्राहम लिंकनचे. दक्षिणेकडील राज्यांच्या विजयानंतर गेट्टीसबर्ग येथे केलेल्या प्रसिद्ध भाषणात त्याने लोकशाहीची अशी व्याख्या केली आहे की, 'लोकांचे, लोकांनी व लोकांच्यासाठी चालविलेले शासन म्हणजे लोकशाही.' ठीक आहे! लोकशाही म्हणजे काय याची लोकांना जाणीव करून देण्यांसाठी दुसऱ्या पुष्कळशा व्याख्यांची यामध्ये भर घालता येईल. मी स्वतः व्यक्तिगत लोकशाहीची एका वेगळ्या मार्गानी व्याख्या करतो आणि मला असे वाटते की, ती पुष्कळशी सत्य आहे. लोकशाहीची माझी व्याख्या अशी आहे की, रक्तपाताशिवाय लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारी बदल घडवून आणणाऱ्या शासनव्यवस्थेच्या प्रकारास आणि पद्धतीस लोकशाही म्हणतात. लोकशाहीची ही माझी व्याख्या आहे. लोकशाही, जर ती चालविणाऱ्या लोकांना, लोकांच्या सामाजिक व आर्थिक जीवनात मूलभूत बदल घडवून आणण्यासाठी सहाय्यभूत होत असेल आणि लोक हा बदल रक्तपाताचा आश्रय न घेता स्वीकारण्यास तयार असतील तर त्या ठिकाणी लोकशाही आहे असे मी मानतो. लोकशाहीची ही खरी कसोटी आहे. कदाचित ही कठोर कसोटी असेल परंतु ज्यावेळेस तुम्ही एखाद्या वस्तुच्या गुणवत्तेचे मूल्यांकन करता त्या वेळेस तुम्ही ती कठोर कसोटीस लावता. अशा प्रकारे आजच्या माझ्या व्याख्यानाच्या संदर्भात मी लोकशाहीची व्याख्या प्रस्तावित करीत आहे आणि मग अशी ही लोकशाही कशी यशस्वी होईल हाच माझ्या भाषणाचा मुख्य विषय आहे. दुर्दैवाने ज्यांनी लोकशाही या विषयासंबंधी लिहिले आहे त्यांनी या विषयावर कोणतीही आग्रही मते मांडलेली नाहीत. या आग्रही मतावरून लोकशाही यशस्वी करण्याच्या पूर्वावर्ती शर्तींची त्यांच्या

अभिप्रायाप्रमाणे, एक निश्चित कल्पना आली असती. यासाठी एखाद्याला इतिहास वाचावा लागेल आणि इतिहासाच्या या वाचनाचा परिणाम म्हणून जगातील वेगवेगळ्या भागात ज्या ठिकाणी लोकशाही राबविली जात आहे त्या ठिकाणच्या लोकशाही जीवनाच्या बिघाडाचा शोध घ्यावा लागेल.

माझ्या मताप्रमाणे लोकशाहीच्या यशस्वी कामकाजाची पहिली शर्त म्हणजे समाजामध्ये भयानक विषमता असता कामा नये, पिळलेला वर्ग असता कामा नये, दडपलेला वर्ग असता कामा नये. ज्याला सर्व विशेषाधिकार आहेत व जो केवळ ओझ्याचा बैल आहे, असे समाजामध्ये वर्ग असता कामा नयेत. समाजाच्या या व्यवस्थेत, पद्धतीत व विभाजनात रक्तरंजित क्रांतीची बीजे असतात आणि कदाचित हे दुखणे नाहीसे करणे लोकशाहीला अशक्य होईल. गेट्टीसबर्ग येथील पूर्वी उल्लेखिलेल्या भाषणात लिंकनने असे म्हटले होते की, ''ढासळलेले घर उभे राहणे शक्य नाही'' याचा नेमका अर्थ लोकांना समजलेला नाही. दक्षिणेकडील व उत्तरेकडील राज्यांच्या संघर्षाच्या संदर्भात खचितच त्याने हे उद्‌गार काढलेले आहेत. तो म्हणाला, ''दक्षिणेकडील राज्यातील तुम्ही व उत्तरेच्या राज्यातील आम्ही जर विभागलेले असू तर परकीय आक्रमणाच्या वेळेस आपणास संघटितपणे उभे राहता येणार नाही.'' ढासळलेले घर उभे राहू शकत नाही हे उद्‌गार त्याने ज्या वेळेस काढले त्या वेळेस त्याला अगोदर सांगितलेल्या अर्थानेच हे सांगावयाचे होते. परंतु, मला असे वाटते की त्याची संज्ञा किंवा त्याचे वाक्य यापेक्षा जास्त खोलवर अर्थगर्भित आहे आणि त्याचा अर्थ माझ्या समजुतीप्रमाणे असा आहे की, वर्गा-वर्गात खोलवर रूजलेली फाटाफूट हाच लोकशाहीच्या यशातील सर्वांत मोठा अडथळा आहे. कारण लोकशाहीत नेमके काय घडते? लोकशाहीत दबलेल्यांना, पिळलेल्यांना व मानवी हक्कांपासून वंचित केलेल्यांना व जे ओझ्याचे बैल आहेत अशा सर्वांना विशेषाधिकारी लोकांच्या सारखाच मतदानाचा अधिकार असतो. विशेषाधिकारी लोक ज्यांना विशेषाधिकार नसतात अशा लोकांपेक्षा संख्येने कमी असतात. लोकशाहीत बहुसंख्यांकांचा कायदा हाच निर्णायक मानला जात असल्यामुळे अल्पसंख्यांक विशेषाधिकारी लोकांनी जर त्यांच्या खास हक्कांचा स्वेच्छेने व राजीखुषीने त्याग केला नाही तर विशेषाधिकारी लोक व सर्वसामान्य जनता यांच्यात निर्माण होणाऱ्या दरीने लोकशाहीचा नाश होईल व यातूनच काहीतरी फारच वेगळे निर्माण होईल.

जर तुम्ही जगातील वेगवेगळ्या भागातील लोकशाहीच्या इतिहासाची तपासणी केलीत तर तुम्हाला असे आढळून येईल की, सामाजिक विषमता हे लोकशाहीच्या

नाशाला कारणीभूत होणाऱ्या कारणांपैकी एक आहे. याबद्दल माझ्या मनात कोणताही संदेह नाही.

लोकशाहीच्या यशस्वी कामकाजासाठी आवश्यक असणारी दुसरी गोष्ट म्हणजे विरोधी पक्षाचे अस्तित्व. पक्षपद्धतीला दूषण देणारे लोक मी केवळ याच देशामध्ये पाहिलेले नाहीत तर इंग्लंडसारख्या देशातदेखील मी असे पुष्कळसे लोक पाहिले आहेत. इंग्लंडमधील पक्ष पद्धतीवर हॅन्सार्ड सोसायटीने प्रसिद्ध केलेले एक छोटेसे पुस्तक मी येथे येण्यापूर्वी नुकताच वाचत होतो. या पुस्तकात पक्षपद्धती चांगली आहे काय व ती सहन करता येण्यासाठी आहे काय या प्रश्नाला एक संपूर्ण प्रकरण वाहिलेले आहे. या प्रश्नावर बरीच मतभिन्नता आहे. मला सध्या असे वाटते की, पक्षपद्धतीच्या विरुद्ध असणारे सर्व आणि याच संदर्भात जे विरोधी पक्षाच्या विरोधी आहेत अशा सर्वांना लोकशाही संकल्पनेचा पूर्णपणे अपसमज झालेला आहे. मग लोकशाही म्हणजे तरी काय? मी तिची व्याख्या करीन नाही. मी लोकशाहीच्या कार्यासंबंधी प्रश्न निर्माण करीत आहे. मला असे वाटते की, लोकशाही म्हणजे नकारशक्ती आहे. आनुवंशिक अधिकार किंवा स्वयंसत्ताक अधिकार यांचा प्रतिशोधक म्हणजे लोकशाही. ज्यांची देशावर सत्ता आहे त्यांच्या अधिकारावर कोठेतरी केव्हातरी नकाराधिकार वापरणे म्हणजे लोकशाही. स्वयंसत्ताक राज्यव्यवस्थेत नकाराधिकार नसतो. राजाची एकवेळ नियुक्ती झाल्यानंतर अनुवंशिक किंवा दैवी अधिकार म्हणूनच तो राज्य करतो. त्याला प्रत्येक पाच वर्षांनी जनतेसमोर जाऊन खालील प्रश्न विचारण्याची गरज पडत नाही. ''मी गेल्या पाच वर्षात चांगले काम केले आहे, असे आपणास वाटते काय? आणि असे जर वाटत असेल तर तुम्ही माझी पुन्हा नियुक्ती कराल काय?'' राजाच्या सत्तेला आव्हान करणारा नकाराधिकार कोणाहीजवळ नसतो. परंतु लोकशाहीत जे सत्तेवर असतात त्यांना प्रत्येक पाच वर्षांनी जनतेसमोर जाऊन जनतेला असे विचारावे लागते की, जनतेच्या मताप्रमाणे त्यांच्या हिताची काळजी घेण्यासाठी, त्यांचे संरक्षण करण्यासाठी व त्यांच्या नियत जीवनात बदल घडविण्यासाठी सत्ता व अधिकार संपादण्यास ते लायक आहेत काय? यालाच मी नकाराधिकार म्हणतो. सत्ताधाऱ्यांनी पाच वर्षाच्या शेवटी जनतेपर्यंत जावे व मधल्याकाळात सत्ताधाऱ्यांना जाब विचारणारे कोणी नसावे या पंचवार्षिक नकाराधिकाराने लोकशाहीचे समाधान होत नाही. लोकसत्तेच्या पाच वर्षाच्या दीर्घकालीन नकाराधिकाराशीच केवळ शासनाची बांधिलकी नसते तर तात्काळ नकाराधिकाराची लोकशाहीला फार आवश्यकता असते. जे शासनाला तेथेच आणि

त्यानंतर तात्काळ आव्हान करू शकतील, अशा लोकांची संसदेत फार आवश्यकता असते. मी जे काही आपणास सांगत आहे ते जर तुम्हाला नीट समजले तर लोकशाही म्हणजे राज्य करण्याचा कोणाचाही अखण्ड अधिकार नव्हे. राज्य करण्याचा हा अधिकार लोकांच्या मान्यतेला बांधलेला असतो व त्याला संसदेत आव्हान करता येते. यामुळे विरोधी पक्ष ही संकल्पना किती महत्त्वाची आहे याची आपणास जाणीव होईल. सत्ताधाऱ्यांनी त्यांच्या पक्षाला न मानणाऱ्या लोकांसाठी केलेल्या प्रत्येक कृत्तीचे समर्थन करणे यालाच विरोधी पक्ष म्हणतात.

दुर्दैवाने आपल्या देशातील सर्व वृत्तपत्रे, कोणत्यातरी एका कारणासाठी किंवा अन्य काही कारणासाठी माझ्या मताप्रमाणे जाहिरातीपासून उत्पन्न उपटण्याचे साधन आहे. अशा वृत्तपत्रांनी शासनाला विरोधी पक्षापेक्षा जास्त प्रसिद्धी दिली आहे. कारण त्यांना विरोधी पक्षाकडून जाहिरातीचे उत्पन्न मिळत नाही. शासनाकडून त्यांना उत्पन्न मिळते आणि मग साहजिकच सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी केलेल्या भाषणांच्या वृत्तांताने दैनिक वर्तमानपत्रांचे स्तंभच्या स्तंभ भरले जातात व विरोधी पक्षांच्या सदस्यांच्या भाषणाचे वृत्तांत कोठेतरी शेवटच्या पानावर शेवटच्या स्तंभात दिले जातात. मी लोकशाहीवर टीका करीत नाही. लोकशाहीला आवश्यक असणारी पूर्वावर्ती शर्त मी आपणास सांगत आहे. विरोधी पक्ष ही लोकशाहीची पूर्वावर्ती शर्त आहे. परंतु आपणास याची कल्पना असेल की, इंग्लंडमध्ये विरोधी पक्षाला केवळ मान्यताच नाही तर विरोधी पक्षाच्या नेत्याला विरोधी पक्ष चालविण्यासाठी शासनाकडून पगार दिला जातो. त्याला सचिव असतो, त्याला लेखनिकांचा व लघुलेखकांचा छोटासा कार्यवृंद देण्यात येतो. ज्या ठिकाणी बसून तो त्याचे काम करू शकेल अशी हाऊस ऑफ कॉमन्समध्ये त्याला एक खोली देण्यात येते. याच धर्तीवर कॅनडामध्ये विरोधी पक्षाच्या नेत्याला तेथील पंतप्रधानासारखा पगार मिळतो. कारण या दोन्ही देशातील लोकशाहीची अशी धारणा आहे की, शासन जर चुकीच्या मार्गाने जात असेल तर ते दाखविण्यासाठी कोणाची तरी निश्‍चितच आवश्यकता लागते आणि हे काम तात्काळ व सातत्याने करावे लागते. म्हणूनच विरोधी पक्षनेत्यावर निधी खर्च करण्यास त्यांना काही वाटत नाही.

माझ्या मताप्रमाणे जिला लोकशाहीच्या यशस्वितेसाठी पूर्वावर्ती शर्त म्हणता येईल, अशी तिसरी शर्त आहे आणि ती म्हणजे कायदा आणि प्रशासन या संदर्भात सर्वांना सारखी समानता. जरी कायद्याबाबत सर्वांना सारखीच समानता नसल्याची इतस्थ: प्रकरणे असली तरी या घडीला कायद्यासमोर सर्वांना सारखी समानता या

संबंधी एखाद्याला जास्त विस्ताराने सांगण्याची गरज नाही. परंतु प्रशासनात समानतेची वागणूक ही बाब फार महत्त्वाची आहे. सत्ताधारी पक्षाने त्या पक्षाच्या सदस्यांच्या फायद्यासाठी प्रशासन राबवल्याची प्रकरणे आपणापैकी पुष्कळशा लोकांना ठाऊक असणे शक्य आहे. अशा प्रकारची उदाहरणे मला स्वत:ला वस्तुत: खूप आठवतात. आपण अशी कल्पना करा की अनुज्ञप्ती (लायसन्स) घेतल्याशिवाय कोणालाही एखाद्या विशिष्ट पदार्थाचा व्यापार करता येणार नाही, अशा प्रकारचा कायदा आहे. या पद्धतीच्या कायद्याबाबत वादविवाद होऊ शकत नाही. कारण तो सार्वत्रिक आहे. या एका विशिष्ट कायद्यामध्ये भेदाभेद होऊ शकत नाही.

मंत्रीमहोदय निर्णय घेताना पहिल्या माणसाला अनुज्ञप्ति (लायसन्स) देतात व दुसऱ्या माणसाला नाकारतात. अनुज्ञप्ती मिळविण्यासाठी वरील दोन्ही माणसे जरी सारख्याच प्रमाणात योग्यतेवर पात्र असूनदेखील असे घडते. ही बाब शासनातील सापत्नभाव निश्चितपणे दर्शविते कारण या ठिकाणी समान न्याय नाही. अनुज्ञप्तीचा (लायसन्स) प्रश्न म्हणजेच हा किंवा तो विशेषाधिकार बहाल करणे ही खचितच एक क्षुल्लक बाब आहे आणि परिणामत: अशा सापत्नभावाचा दुष्परिणाम भोगणाऱ्यांची संख्यादेखील फारच थोडी असते. परंतु थोडेसे पुढे जाऊन आपण असे पाहू या की हा सापत्नभाव जर शासनात बोकाळला तर काय होईल? अशी कल्पना करा की एखाद्या पक्षाच्या सदस्यावर भरपूर पुराव्यानिशी कोणत्यातरी गुन्ह्यासाठी खटला भरला जात आहे आणि त्या विशिष्ट भागातील पक्षप्रमुख जिल्हा न्यायाधिशाकडे जाऊन त्यांना असे सांगू लागला की तो गुन्हेगार त्याच्या पक्षाचा असल्यामुळे त्याच्यावर खटला भरणे बरोबर होणार नाही आणि पुढे म्हणतो.'' मी सांगतो त्याप्रमाणे आपण वागला नाही तर हे प्रकरण मंत्रीमहोदयाकडे घेऊन जाऊन आपली या ठिकाणावरून बदली केली जाईल. असे घडू लागले तर कोणत्या प्रकारची अनागोंदी आणि अन्याय शासनात निर्माण होतील याची आपण केवळ कल्पनाच केलेली बरी! अशा प्रकारची प्रकरणे अमेरिकेत घडत होती. त्याला नाशपद्धति (Spoils system) असे म्हणत. नाशपद्धती म्हणजे एखादा पक्ष सत्तेवर आल्यानंतर त्याच्या पूर्वसुरी सत्ताधारी पक्षाने नेमलेल्या कर्मचाऱ्यांना, कारकून आणि शिपाई यांच्यासह सर्वांना कामावरून काढून टाकणे व त्यांच्या ठिकाणी त्या नवीन पक्षाला सत्तेवर येण्यासाठी ज्यांनी मदत केली अशा सद्‌गृहस्थांची नेमणूक करणे. यामुळे अमेरिकेसारख्या देशाला वस्तुत: कित्येक वर्षे नाव घेण्यासारखे प्रशासन मिळाले नाही. शेवटी त्यांना याची जाणीव झाली की, अशा गोष्टी लोकशाहीला पोषक

नाहीत. त्यांनी ही नाशपद्धती नष्ट केली. इंग्लंडमध्ये प्रशासन शुद्ध, नि:पक्षपाती व राजकीय धोरणापासून दूर असावे यासाठी त्यांनी राजकीय कार्यालये व प्रशासकीय कार्यालये यांच्यामध्ये निश्‍चित वेगळेपणा निर्माण केला. प्रशासकीय सेवा ही स्थायी असते. ती सर्व पक्षांची सारखीच सेवा करते मग सत्तेवर कोणीही असो! आणि अशाप्रकारे ती मंत्रीमहोदयांच्या कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय प्रशासन चालवीत असते. या पद्धतीचे प्रशासन ज्या वेळेस ब्रिटिश आपल्या देशात होते त्यावेळेस निश्‍चितच अस्तित्वात होते. भारत सरकारचा ज्या वेळेस मी सदस्य होतो त्या वेळच्या माझ्या स्वत:च्या जीवनातील एका घटनेचे मला स्पष्टपणे स्मरण होते. आपणास याची कल्पना असेल की दिल्लीत त्या वेळच्या काही रस्त्यांना व मंडळांना व्हाईसरॉयची नावे दिलेली होती. ‘लिनलिथगो’ हेच असे एक गव्हर्नर जनरल होते की त्यांच्या नावावरून दिल्लीतील कोणत्याही रस्त्याला किंवा संस्थेला नाव दिले नव्हते. त्यांचे खाजगी सचिव माझे मित्र होते. माझ्याकडे त्यावेळी सार्वजनिक बांधकाम खाते होते. माझ्या अखत्यारीत पुष्कळच कामे होती. तो माझ्याकडे आला आणि मला म्हणाला. ‘‘डॉक्टर महोदय, लॉर्ड लिनलिथगो यांचे नाव एखाद्या संस्थेला किंवा सार्वजनिक बांधकामास देण्याच्या बाबतीत आपण काही करू शकाल काय?’’ ते पुढे म्हणाले, ‘‘प्रत्येकाची नावे वेगवेगळ्या संस्थांना किंवा सार्वजनिक बांधकामांना दिली आहेत, परंतु त्यांचेच नाव दिलेले नसावे ही बाब फारच खटकणारी आहे.’’ मी म्हणालो, ‘‘मी विचार करीन.’’ मी त्या वेळी जमुना नदीवर दिल्ली शहरास उन्हाळ्यात पाणी पुरवठा करण्यासाठी बंधारा बांधण्याच्या योजनेवर विचार करीत होतो. कारण उन्हाळ्यात दिल्ली एकदम रखरखीत असते. ही बाब माझ्या प्रिअर नावाच्या युरोपियन सचिवास सांगितली. मी म्हणालो, ‘‘महोदय हे पहा, गव्हर्नर जनरलांच्या सचिवांनी सांगितलेली सूचना आपणास ठाऊक आहेच. तेव्हा त्या बाबतीत आपण काही करू शकू असे आपणास वाटते काय?’’ त्यांचे उत्तर काय असावे याची आपणास कल्पना आहे? त्यांनी असे उत्तर दिले की, ‘‘महोदय, ही गोष्ट आपण करता कामा नये. या देशात अशा प्रकारच्या गोष्टी करणे कोणत्याही परिस्थितीत अशक्यप्राय आहेत.’’ एखाद्या अधिकाऱ्याने मंत्रीमहोदयांच्या इच्छेविरुद्ध काही तरी बोलावे ही बाब माझ्या मताप्रमाणे निखालस अशक्य आहे. परंतु त्या काळी अशा गोष्टी शक्य होत्या. कारण ब्रिटिश लोकांप्रमाणे आपणसुद्धा शासनाने प्रत्यक्ष कारभारात ढवळाढवळ करू नये अशा प्रकारचा सूज्ञ निर्णय घेतला होता. कारण शासनाचे मुख्य कार्य प्रशासनात ढवळाढवळ करणे किंवा भेदभाव करणे हे

नसून धोरण निश्चित करण्याचे असते. ही बाब अत्यंत मूलभूत आहे. आणि मला भीती वाटते कारण त्या न्यायापासून आपण दुरावलो आहे. आपणाकडे असलेल्या त्या गोष्टीचा आपण संपूर्णपणे त्याग करू किंवा ती नष्ट करून टाकू.

माझ्या अभिप्रायाप्रमाणे यशस्वी लोकशाहीच्या कामकाजाची चौथी पूर्वावर्ती शर्त म्हणजे सांविधानिक नैतिकता. आपल्या संविधानाबद्दल पुष्कळसे लोक अतिउत्साही दिसतात. खरोखरंच या गोष्टीची मला भीती वाटते. परंतु मी तसा नाही. ज्यांना भारतीय संविधान नष्ट करून त्याचा नवीन मसुदा करावासा वाटतो अशा लोकांमध्ये सामील होण्यास माझी खरोखरच तयारी आहे. परंतु आपण हे विसरतो की, आपले संविधान म्हणजे दुसरे–तिसरे काही नसून वैध तरतुदींचा समावेश असलेला तो केवळ सांगाडा आहे. या सांगाड्याचे मांस, आपण ज्याला सांविधानिक नैतिकता म्हणतो त्यामध्ये आढळते. यालाच इंग्लंडमध्ये संविधानाचे संकेत असे म्हणतात. आणि लोकांनी या खेळाच्या पडलेला नियमांचे पालन केलेच पाहिजे. या संदर्भात या क्षणाला मला आठवणारी एक–दोन उदाहरणे मी आपणास सांगणार आहे. आपणास हे आठवतच असेल की ज्यावेळी अमेरिकेतील १३ वसाहतींनी बंड पुकारले त्या वेळी वॉशिंग्टन त्यांचा नेता होता. त्या वेळच्या अमेरिकन जीवनात केवळ नेता म्हणून वॉशिंग्टनचा उल्लेख करणे म्हणजे त्याच्या दर्जाचे खरोखरच अवमूल्यन करण्यासारखे होय. कारण अमेरिकन लोकांसाठी वॉशिंग्टन हा प्रत्यक्ष परमेश्वरच होता. तुम्ही जर त्याचा जीवन–इतिहास वाचला तर तुम्हाला असे आढळून येईल की तेथील संविधान तयार झाल्यानंतर त्याला अमेरिकेचा पहिला राष्ट्रपती म्हणून निवडण्यात आले. त्याची मुदत संपल्यानंतर काय घडले? दुसऱ्यावेळी निवडणूक लढविण्यास त्याने नकार दिला. माझ्या मनामध्ये याबद्दल तिळमात्र शंका नाही की वॉशिंग्टन जर लागोपाठ दहावेळा राष्ट्रपती पदासाठी उभा राहिला असता तर तो प्रतिस्पर्ध्याशिवाय बिनविरोध निवडला गेला असता. परंतु दुसऱ्या वेळी तो खाली उतरला. ज्या वेळेस त्याला ‘असे का’ म्हणून विचारण्यात आले त्या वेळी त्याने असे सांगितले की, ‘‘माझ्या मित्रांनो, ज्या हेतूने आपण आपले संविधान तयार केले त्याचा तुम्हाला विसर दिसतो. आपणाला आनुवंशिक राज्यसत्ता नको आहे. तसेच आपणाला आनुवंशिक राजा किंवा हुकूमशहा नको आहे. यासाठी आपण हे संविधान तयार केले आहे. इंग्लिश राजाच्या राज्यनिष्ठेचा त्याग व अव्हेर करून जर तुम्ही या देशात आला असाल आणि वर्षानुवर्षे व सातत्याने तुम्ही माझी पूजा करू लागलात तर तुमच्या तत्त्वप्रणालीचे काय होणार? इंग्लिश राजाच्या

ठिकाणी जर तुम्ही मला बसवले तर इंग्लिश राजाच्या अधिकाराविरुद्ध तुम्ही न्याय्य बंड पुकारले असे तुम्हाला म्हणता येईल काय? जरी माझ्यावरील तुमची निष्ठा व श्रद्धा मी दुसऱ्यांदा उभे राहावे याचा पुरस्कार करण्यासाठी तुम्हाला भाग पाडत असेल, तरी सुद्धा माझ्या सारख्याने, म्हणजे ज्याने आनुवंशिक अधिकार आपणाकडे नसावेत या तत्त्वाची प्रतिज्ञा केली, त्याने तुमच्या भावनांना बळी पडणे निश्चितच चांगले नाही.'' शेवटी फक्त दुसऱ्यांदाच त्याला निवडणुकीस उभे करण्यामध्ये येथील लोकांना यश मिळाले आणि तो उभा देखील राहिला. परंतु त्याला तिसऱ्यांदा उभे करण्यासाठी ज्यावेळेस लोक त्याच्याकडे गेले त्यावेळेस मात्र त्याने लोकांना झिडकारले. मी आपणास दुसरे उदाहरण देतो. ज्याची वैवाहिक कथा नुकतीच टाइम्स ऑफ इंडियात प्रसिद्ध झाली आहे तो ८ वा 'विंडसोर एडवर्ड' तुम्हाला ठाऊकच आहे. मी राऊंड टेबल परिषदेसाठी तेथे गेलो असताना राजाला त्याच्या इच्छेप्रमाणे हव्या असलेल्या स्त्रीबरोबर लग्न करण्यास परवानगी आहे काय, यावर मोठा वादविवाद माजला होता. विशेषत: तो (राजा) त्या वेळेस तिच्या बरोबर प्रतिलोम विवाह करण्यास तयार होता. कारण तिला राणी होता येऊ नये किंवा ब्रिटिश लोकांनी त्याचा तो वैयक्तिक अधिकारसुद्धा नाकारून पदत्यागास भाग पाडावे. मा. बाल्डविन, अर्थातच, राजाच्या या लग्नाविरुद्ध होते. त्याने राजाला परवानगी दिली नाही आणि तो म्हणाला, ''तुम्ही जर माझे ऐकले नाही तर तुम्हाला पदत्याग करावा लागेल.'' आपले मित्र मा. चर्चिल ८ व्या एडवर्डचे मित्र होते व ते त्याला या बाबतीत उत्तेजन देत होते. या प्रश्नाचे भांडवल करून मा. बाल्डविन यांचा पराभव करता येईल किंवा काय यावर त्यावेळी लेबर पार्टीचे लोक विचार करीत होते. कारण कॉन्झरव्हेटीव्ह पक्षातील पुष्कळसे लोक त्यांच्या निष्ठेतून राजाला पाठिंबा देऊ इच्छित होते आणि मला असे आठवते की दिवंगत प्रा. लास्की, लेबर पार्टीने असा काही पवित्रा घ्यावा याविरुद्ध हेरॉल्डमध्ये लेखमाला लिहित होते. ते म्हणत होते. ''आपल्या संकेताप्रमाणे राजाने पंतप्रधानांचा सल्ला स्वीकारलाच पाहिजे, ही बाब आपण नेहमी मान्य केली आहे आणि जर राजाने पंतप्रधानांचा सल्ला मानला नाही तर पंतप्रधानांनी त्याला काढून टाकले पाहिजे. हा आपला संकेत असल्यामुळे राजाचा अधिकार वाढेल अशा या प्रश्नावर बाल्डविनचा पराभव करणे ही गोष्ट आपल्या दृष्टीने चुकीची आहे.'' लेबर पार्टीने त्यांचा हा सल्ला मानला आणि त्याप्रकारचे त्यांनी काही केले नाही. ते म्हणाले, ''त्यांनी खेळाचे नियम पाळले पाहिजेत.'' तुम्ही जर इंग्लंडचा इतिहास वाचलात तर तुम्हाला अशा

प्रकारची अनेक उदाहरणे सापडतील की सत्तेवर असणाऱ्या किंवा विरोधात असणाऱ्या विरोधकांना तात्पुरती सत्ता प्राप्त होईल अशा मुद्द्यावर पकडून इजा करण्याचे अनेक मोह पक्षप्रमुखांच्या समोर होते. परंतु अशा मोहास बळी पडण्यास त्यांनी नकार दिला. कारण अशा गोष्टीमुळे त्यांच्या संविधानास व लोकशाहीस नुकसान पोहचेल याची त्यांना जाणीव होती.

माझ्या मताप्रमाणे लोकशाहीच्या कामकाजासाठी फार महत्त्वाची बाब म्हणजे लोकशाहीच्या नावावर बहुमतवाल्यांनी अल्पमतवाल्यांवर जुलूम करता कामा नये. बहुमतवाले जरी सत्तेवर असले तरी अल्पमतवाल्यांना स्वत:बद्दल सुरक्षितता वाटली पाहिजे. अल्पमतवाल्यांची मुस्कटदाबी केली जाते किंवा त्यांना डावपेचाने मार दिला जातोय अशी अल्पमतवाल्यांची भावना होता कामा नये. या गोष्टीचा हाऊस ऑफ कॉमन्समध्ये फारच मान राखला जातो. १९३१ साली ज्या वेळेस रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनी लेबर पार्टीचा राजीनामा दिला व राष्ट्रीय सरकार स्थापन केले त्या वेळच्या इंग्लंडमधील सार्वत्रिक निवडणुकांचे निकाल आपणापैकी पुष्कळशा लोकांना स्मरत असतील. ज्या वेळेस निवडणुका होणार होत्या त्या वेळेस लेबर पार्टीचे १५०च्या आसपास सदस्य होते. परंतु निवडणुकांनंतर लेबर पार्टीला फक्त ५० जागा मिळाल्या व पंतप्रधान बाल्डविन यांच्या पक्षाला ६५० जागा मिळाल्या. मी त्या वेळेस इंग्लंडमध्ये होतो. 'कॉन्झरव्हेटीव्ह' पक्षाच्या या बेफाट बहुमताखाली काम करणाऱ्या लेबर पार्टीच्या अल्पमतात असलेल्या ५० सदस्यांनी त्यांचा भाषण-स्वातंत्र्याचा, विरोध करण्याचा आणि कोणत्याही प्रकारचा प्रस्ताव मांडण्याचा अधिकार नाकारला जातोय अशा प्रकारची तक्रार केल्याची एखादीसुद्धा घटना माझ्या ऐकिवात नाही. त्याची आपणास देखील कल्पना असेलच. आपण आपल्या संसदेचे उदाहरण घ्या. आपले विरोधी पक्ष सदस्य सातत्याने जे निंदाव्यंजक प्रस्ताव व स्थगन प्रस्ताव आणतात त्याचे मी काही समर्थन करीत नाही. संसदेत अशा प्रकारे नेहमी स्थगन प्रस्ताव मांडून काम करणे ही बाब काही सुखकारक नाही. खरे म्हणजे, ही गोष्ट आपल्या निदर्शनास आली असेलच की इंग्लंडसारख्या देशात संसदेत निंदाव्यंजक किंवा स्थगन प्रस्ताव चर्चेसाठी क्वचितच स्वीकारले जातात. या गोष्टीचे मला खरोखरच आश्चर्य वाटले. इंग्लिश संसदीय चर्चा-वृत्तांच्या माझ्या वाचनात सभापतींनी स्थगन प्रस्ताव अस्वीकृत केल्याचे मला क्वचितच आढळले आहे. मात्र अर्थातच तो शासनाचा आदेश असावा लागेल. मी ज्या वेळेस मुंबई विधानसभेचा सभासद होतो, त्या वेळी श्रीयुत मोरारजी, श्रीयुत मुन्शी आणि श्रीयुत खेर व इतर काही

आमची मित्रमंडळी सत्तेवर होती. त्यांनी त्या वेळी चर्चेसाठी एकसुद्धा स्थगन प्रस्ताव स्वीकृत केला नव्हता. त्या वेळी आमचे मित्र श्री. मावळणकर सभापती होते. त्यांनी एक तर असे स्थगन प्रस्ताव नियमबाह्य ठरवून सत्ताधाऱ्यांना मदत केली किंवा त्यांनीच मान्य केल्याप्रमाणे, मंत्रीमहोदयांचा विरोध आहे असे सांगितले. अशा प्रस्तावांना मंत्रीमहोदयांनी विरोध केला म्हणजे काय होते याची आपणास कल्पना आहेच. ज्या वेळी मंत्रीमहोदय विरोध करतात त्या वेळी ज्या सदस्याने स्थगन प्रस्ताव प्रस्तुत केला असेल त्या सदस्याला ३० किंवा ४० सदस्यांचा पाठिंबा असल्याचे दाखवावे लागते किंवा जी काही संख्या ठरलेली असेल ती. ज्या अल्पमतवाल्या लहान पक्षाचे सभागृहातील प्रतिनिधित्व फक्त ४, ५ किंवा ६ सदस्यांइतकेच मर्यादित असेल अशा अल्पमतवाल्या पक्षाने मांडलेल्या स्थगन प्रस्तावास सत्ताधारी पक्षाने जर नेहमीच विरोध केला तर अल्पमतात असलेल्या सदस्यांना त्यांची गाऱ्हाणी मांडण्यास संधी मिळणार नाही. याचा परिणाम असा होतो की, अल्पमतातील लोकांमध्ये बेसनदशीर क्रांतीची वृत्ती बळावते. यासाठी हे आवश्यक आहे की, लोकशाहीप्रमाणे ज्या वेळेस कामकाज चाललेले असते आणि ज्या बहुमतातील लोकांवर ती अवलंबून असते त्या वेळेस बहुमतातील लोकांनी जुलमी पद्धतीने वागता कामा नये.

मी आणखी एका मुद्याचा उल्लेख करून माझे भाषण संपविणार आहे. माझ्या मताप्रमाणे समाजातील नैतिक अधिष्ठान कार्यशील ठेवणे लोकशाहीला अत्यावश्यक असते. दुर्दैवाने आपल्या राज्यशास्त्रज्ञांनी लोकशाहीच्या या पैलूचा विचारच केला नाही. ''नीतिशास्त्र हे राजकारणापासून काहीतरी वेगळे आहे. आपण राजकारण शिकू शकतो आणि आपण नीतिशास्त्रासंबंधी काहीही जाणत नसलो तरी चालेल कारण राजकारण जणू काही नीतिशास्त्राशिवाय काम करू शकते.'' माझ्या मताप्रमाणे हे एक थक्क करून सोडणारे विधान आहे. शेवटी लोकशाहीत नेमके काय घडते? मुक्त शासन असे लोकशाही संबंधाने बोलले जाते आणि मुक्त शासन म्हणजे आपण काय समजतो? मुक्त शासन म्हणजे समाजजीवनाच्या भव्य दृष्टिकोनातून लोकांना कायद्याच्या हस्तक्षेपाशिवाय प्रगतीसाठी मोकळे सोडणे होय! किंवा जर कायदाच करावयाचा असेल तर कायदा करणाऱ्याला अशी खात्री पाहिजे की, कायदा यशस्वी होण्यासाठी समाजामध्ये पुरेसे नैतिक अधिष्ठान आहे. लोकशाहीच्या या पैलूचा ज्याने उल्लेख केला आहे असा माझ्या मताप्रमाणे 'लास्की' हाच एक

माणूस आहे, त्याच्या एका पुस्तकात त्याने असे अत्यंत ठामपणे सांगितले आहे की लोकशाहीत, नैतिक सुस्थिती नेहमीच ग्राह्य मानावी लागते. जर नैतिक सुस्थिती नसेल तर लोकशाहीचे आज आपल्या देशात ज्याप्रमाणे होताहेत त्याप्रमाणे तुकडे तुकडे होतील.

निर्देश करण्यासारखा शेवटचा मुद्दा म्हणजे लोकशाहीला लोकनिष्ठेची फार आवश्यकता असते. सर्वच देशांमध्ये अन्याय असतो याबद्दल शंका नाही. परंतु त्याची तीव्रता सर्व ठिकाणी सारखीच नसते. काही देशांमध्ये अन्यायाची तीव्रता फारच कमी असते आणि दुसऱ्या काही ठिकाणी लोक अक्षरश: अन्यायाच्या ओझ्याखाली चिरडले आहेत. या संदर्भात एखाद्याला इंग्लंडमधील ज्यूंचे उदाहरण नमूद करता येईल. ख्रिश्चनांनी जे अन्याय केले त्यामध्ये ज्यू लोकांना त्यांच्यापासून सर्वांत जास्त अन्याय सहन करावा लागला. जे घडले ते मात्र असे की, हा अन्याय दूर करण्यासाठी केवळ ज्यू लोकांनाच संघर्ष करावा लागला. या अन्यायाचे कारणसुद्धा असामान्य होते. आणि ते कारण असे होते की, जुन्या ख्रिश्चन कायद्याप्रमाणे मुलांना वडिलांच्या संपत्तीचा वारसा हक्क मिळत नसे. त्याला दुसरे-तिसरे काही कारण नसून केवळ ते ख्रिश्चन नव्हते व ज्यू होते हे त्याचे कारण. तेथील राजा राज्यांचा अवशिष्ट मृत्यूपत्राने झालेला वारस होत असल्यामुळे दिवंगत ज्यूंची संपत्ती तो स्वीकारीत असे. राजाला या गोष्टी अर्थातच प्रिय होत्या. राजा आनंदी होता. ज्या वेळेस दिवंगत ज्यूंची मुले वडिलांच्या संपत्तीचा वाटा मिळावा म्हणून निवेदन घेऊन राजाकडे जात असत त्या वेळेस राजा त्यांना थोडीशी संपत्ती देत असे व राहिलेली बहुतेक स्वत:कडे ठेवित असे. परंतु मी आपणाला अगोदर सांगितल्याप्रमाणे कोणत्याही इंग्रज माणसाने ज्यूंना मदत केली नाही. अशा परिस्थितीत ज्यूंनी त्यांचा संघर्ष चालू ठेवला. ज्याला 'लोकनिष्ठा' म्हणतात त्याच्या अभावाचा हा परिणाम आहे. लोकनिष्ठा म्हणजे सर्व अन्यायाच्या विरोधात आंदोलनासाठी उभी राहाणारी कर्तव्यनिष्ठा होय! कोणावर अन्याय होतोय ही गोष्ट गौण आहे. याचाच अर्थ असा आहे की, प्रत्येकाने, मग तो त्या विशिष्ट अन्यायाखाली भरडलेला असो अगर नसो, अन्यायाखाली भरडल्या जाणाऱ्या माणसाच्या मुक्तीसाठी मदत करण्याची तयारी केली पाहिजे. विद्यमान काळातील उदाहरण म्हणून साऊथ आफ्रिकेचा आपण विचार करावा, तेथे अन्यायाखाली भरडली जाणारी जनता अर्थातच भारतीय आहे. खरे आहे ना? तेथील गोऱ्या लोकांवर अन्याय होत नाही. परंतु असे असूनदेखील

एक गोरा माणूस म्हणजे रेव्हरंड स्कॉट हा अन्याय दूर करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे. नुकतेच मी असे वाचत होतो की तेथील गोऱ्या वंशातील तरुण मुले-मुली साऊथ आफ्रिकेतील भारतीय लोकांच्या मुक्ती आंदोलनात सहभागी होत आहेत. यालाच 'लोकनिष्ठा' म्हणतात. आपणाला धक्का बसावा यासाठी मी हे सांगत नाही. परंतु काही वेळा मला असे वाटते की, आपण खरोखरच फार विसराळू आहोत. आपण साऊथ आफ्रिकेतील अन्यायासंबंधी बोलत आहोत. मी स्वत:शीच काही वेळेला या गोष्टीचे आश्चर्य करतो की, विलीनीकरण व अन्य गोष्टींच्या विरोधात बोलणाऱ्या आपणासारख्या लोकांकडे प्रत्येक खेड्यात साऊथ आफ्रिका नाही काय? आपल्या प्रत्येक खेड्यात साऊथ आफ्रिका आहे. आणि असे असूनदेखील एखादा सवर्ण जातीतील माणूस वर्गीकृत वर्गाची समस्या घेऊन लढताना मला क्वचितच दिसतो. येथे असे का घडते? कारण येथे लोकनिष्ठा नाही. ''मी आणि बहुमतवाल्यांचा माझा देश याच एका विश्वामध्ये मी गुरफटलेला आहे.'' जर अशा पद्धतीच्या गोष्टी घडल्या तर अन्यायाखाली चिरडल्या जाणाऱ्या अल्पसंख्यांकांना अन्यायाचे निवारण करण्याच्या हेतूसाठी इतरांच्यापासून मदत मिळणार नाही. याच गोष्टीमुळे लोकशाही धोक्यात आणणारी बंडाची मनोवृत्ती बळावेल.

शेवटी सभ्य गृहस्थहो, आणि महिलांनो, या ठिकाणी मला निमंत्रण देण्यापाठीमागे आपला काय हेतू किंवा प्रेरणा होती याची मला कल्पना नाही. मला या गोष्टीची शंका नाही की ज्या विषयासंबंधी मी आपणासमोर बोललो आहे तो विषय या देशासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे, आपली सर्वसाधारण धारणा आहे की आपणास स्वातंत्र्य मिळाले आहे. ब्रिटिश निघून गेले आहेत. लोकशाहीला पोषक असे संविधान मिळालेले आहे आणि अर्थातच, आपणास यापेक्षा जास्त काय हवे आहे? यापेक्षा जास्त काही न करता आपला कार्यभाग संपलेला आहे असे समजून आपण आता विश्रांती घेतली पाहिजे, संविधान तयार झालेले असल्यामुळे आपला कार्यभाग संपलेला आहे अशा प्रकारच्या शिष्टपणाच्या भावनेविरूद्ध मला आपणास ताकीद देणे भाग आहे. कर्तव्य संपलेले नाही, त्याला आता कुठे सुरुवात झाली आहे. तुम्हाला याचे स्मरण ठेवावे लागेल की, लोकशाहीचे रोपटे सर्वच ठिकाणी वाढत नाही. ते अमेरिकेत वाढले, ते इंग्लंडमध्ये वाढले. काही प्रमाणात ते फ्रान्समध्ये वाढले. खरोखरंच इतर ठिकाणी काय घडले हे पाहाण्यासाठी ह्या उदाहरणातून आपणास काही प्रमाणात धैर्य प्राप्त होईल. तसेच आपणापैकी काही लोकांना हे

स्मरण असेल की, पहिल्या महायुद्धाचा परिणाम म्हणून आणि ऑस्ट्रिया-हंगेरिया साम्राज्याचे विभाजन म्हणून विल्सनने स्वयंनिर्णयाच्या आधारावर ऑस्ट्रियापासून स्वतंत्र असे वेगवेगळे छोटे देश निर्माण केले. त्याची सुरवात लोकशाही संविधानाने व लोकशाही शासनाने झाली. आणि त्यांच्या संविधानात मूलभूत अधिकारांचा समावेशदेखील होता. हे मूलभूत अधिकार व्हर्सासच्या शांतता तहाने त्यांच्यावर बंधनकारक केले होते. माझ्या मित्रांनो, त्या लोकशाहीचे काय झाले हे आपणास ठाऊक आहे काय? लोकशाहीचा अंश तरी त्या ठिकाणी पाहावयास मिळतो काय? त्या सर्व संपलेल्या आहेत. त्या सर्व नष्ट झालेल्या आहेत. काही दुसरी विद्यमान उदाहरणे विचारात घ्या. सीरियामध्ये लोकशाही शासन होते. फारच थोड्या वर्षानंतर तेथे लष्कराची क्रांती झाली. सीरियाचा प्रमुख कमांडर तेथील राजा झाला व लोकशाही लोप पावली. दुसरे उदाहरण घ्या. इजिप्तमध्ये काय घडले? तेथेसुद्धा सन १९२२ पासून सतत ३० वर्षे लोकशाही शासनव्यवस्था होती. परंतु एकाच रात्रीत फरूकला राज्यसत्ता सोडावी लागली व नजीब इजिप्तचा हुकूमशहा झाला. त्याने लगेच तेथील संविधान नष्ट केले.

ही सर्व उदाहरणे आपल्या डोळ्यांसमोर आहेत आणि म्हणून मला असे वाटते की, 'आपल्या भवितव्यासंबंधी आपण फारच सावध आणि फारच समजुतदार राहिले पाहिजे. आपली लोकशाही सुरक्षित ठेवण्यासाठी आपल्या मार्गातील काही दगडधोंडे व शिला दूर करण्याच्या कामी आपण काही ठाम कार्यक्रम घेणार आहोत किंवा नाही याचा आपणास गंभीरपणे विचार करावा लागेल. मी आपणासमोर मांडलेल्या काही विचारांमुळे आपणामध्ये जर काही जागृती निर्माण झाली असेल व या समस्यांबाबत आपण गाफील राहून चालणार नाही असे आपणास वाटत असेल तर माझे कर्तव्य मी पार पाडले आहे असे मला वाटते.'

**संदर्भ :**

''लोकशाहीच्या यशस्वी कामकाजाच्या पूर्वावर्ती शर्ती,'' डॉ. बाबासाहेब आंबेडकर - लेखक आणि भाषणे : खंड १८ : भाग ३ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे. भाग ३ : १९४६ ते १९५६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, २००२, पृ. क्र. ३२५-३३९.

## INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY

## OTHER PUBLICATIONS

*Marathi Monthly:*

*ARTHABODH-PATRIKĀ*,
(Subscription Rs. 100/- per year)

*Books and Booklets:*

1. *Bhāratāteel Lok-Sankhyā Wādhichā Prashna: Santati-Niyamanāchee Jaruree Wa Tyāteel Yash,* (The Problem of Population Growth in India: The Need for Family Planning and its Success) (in Marathi) by Kumudini Dandekar, Pp. 60, Rs. 30/-.

2. *Compulsory Primary Education - Opportunities and Challenges,* Second Edition, (in English and Marathi), by Jayakumar Anagol, Pp. 54 and 61, Rs. 30/-.

3. *Shodh Ghetay Tay Shikshan,* (To Searches is Education), (in Marathi), by Ramesh Panse, Pp. 67, Rs. 50/-.

4. *Kartā-Karvitā, Adhunik Mendu-Sanshodhan va Aple Jeevan,* by Ramesh Panse, Rajyashree Kshirsagar, Anita Belhekar-Deshmukh, Pp. 242, Rs. 350/-.

5. *Governance, Supervision and Market Discipline: Lessons from Enron* by Jayanth R. Varma, Pp. 87, Rs. 100/-. Reprint from (*Journal of Indian School of Political Economy,* Vol. XIV, No. 4, October-December 2002)

6. *Poverty in India,* (Reprint 2008), by V.M. Dandekar and N. Rath, Reprinted by Books for Change Bangalore, Pp. vi+140, Price Rs 200/-

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथलयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलाकडे व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## अर्थबोधपत्रिका मासिक
## वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २००/- रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/- रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/- रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८००/- रुपये** |

**The Bank details for NEFT are as under :**

- Bank Name : **Vidya Sahakari Bank S.B. Road, Pune 411016.**
- Account Name : **Indian School of Political Economy**
- Bank Account No. : **200403130004208**
- NEFT/RTGS No. : **SVCB0003004**
- IFSC Code : **SVCB0003004**

# वाचनीय पुस्तके

**प्राचीन भारत : इतिहास आणि संस्कृती**

**लेखक : डॉ. गो. बं. देगलूरकर,**

**प्रकाशक : श्री. चिंतामणी पराग पुरंदरे – अपरांत, पुणे,**

**तृतीय आवृत्ती – मार्च २०२२, पृष्ठे – १४ + ४८६, मूल्य : रुपये – ५००/–**

अखंड व अविरत वाहणाऱ्या काळाचे निखळ सोयीसाठी आपण भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ अशा तीन खंडांत वर्गीकरण करत असतो. यांतील वर्तमानकाळ हा असतो सांधा – भूतकाळाला भविष्यकाळाशी जोडणारा. त्यांमुळे, वर्तमान हा कायमच भूतकाळाच्या खांद्यावर उभा असतो तर, वर्तमानाच्या कुशीतूनच भविष्यकाळ जन्म घेतो. त्यांमुळे, आजचा भारत समजावून घ्यायचा तर, 'भारतवर्ष'नावाचे भू–राजकीय–सांस्कृतिक एकक आजवर कसे साकारत आलेले आहे, याचे, अगदी तपशीलवार जरी नाही तरी, पुरसे आकलन असणे अगत्याचे ठरते. ज्येष्ठ मूर्तीतज्ज्ञ आणि पुरातत्त्वज्ज्ञ डॉ. गो. बं. देगलूरकर यांचा हा बहुमोल ग्रंथ म्हणजे, भारतवर्षाच्या जडणघडणीचा थेट प्राग्‌ैतिहासिक काळापासून वेचक, उद्‌बोधक, चिकित्सक व विश्लेषक आलेख रेखाटणारा संशोधनपरिप्लुत असा संपन्न दस्तऐवज होय. असा आलेख सिद्ध करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या साधनसामग्रीच्या वैविध्याचे तसेच अशी सामग्री संदर्भस्त्रोत म्हणून वापरण्यादरम्यान घ्याव्या लागणाऱ्या दक्षतेसंदर्भात प्रा. देगलूरकर यांनी ग्रंथाच्या प्रारंभीच केलेले विवेचन अतिशय मार्मिक व मूलग्राही असेच आहे. या भूमीवर निरनिराळ्या कालखंडांत, वेगवेगळ्या प्रांतात कारकिर्द गाजवून गेलेल्या विविध राजवटींचे व राजघराण्यांचे बारीकसारीक बारकाव्यांनिशी केलेले विवेचन हा या ग्रंथाचा सर्वांत महत्त्वाचा गाभा होय. भारतवर्षाचे जगातील अन्य मानवसमूह तसेच संस्कृतींशी प्रस्थापित झालेले अनुबंध, भारतीय संस्कृतीच्या भारताच्या भौगोलिक सीमांबाहेर झालेल्या सुदूर विस्ताराचे विविध आयाम, या भूमीवर बाह्य शक्तींची होत आलेली आक्रमणे आणि या नानाविध घटकांच्या सघन–सखोल आंतरक्रियांद्वारे साकारलेले भारतीय संस्कृतीचे बहुविध रूप यांचा या ग्रंथात चितारण्यात आलेला विश्लेषक पट विलक्षण वाचनीय आहे. उत्क्रांतीच्या या प्रदीर्घ प्रवासाच्या टप्प्यांचे प्रतिबिंब पडलेली हत्यारे, नाणी, शिल्पे, प्रस्तरलेख, वास्तू यांच्या छायाचित्रांनी सदर ग्रंथाचे अंतरंग वेधक तर बनवले आहेच परंतु, त्यांद्वारे ग्रंथगत विवेचनाचा रसास्वाददेखील अधिक रुचकर बनतो.

**RNI Regn. No. MAHMAR/2002/9806**
**Published and Posted at Model colony Post Office Pune,**
**On 10th of each month**

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■ अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग-व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■ इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राकिय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे – ४११ ०३०. येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**